म.ग्रं.स. ठाणे
विषय
स.क्र.



REFBK-0023223

शं.रा. दे

## श्री. शं. रा. देवळे यांची पुस्तके

आपले देव, आपली दैवते
भाग १/२/३ ( आवृत्ती संपली )
भाग ४/५ किंमत प्रत्येकी रु. ३-५०


श्री लेखन वाचन भांडार
१००४ बुधवार पेठ, पुणे २

भू-प्रवास
693
23223



# महाराष्ट्रातील किल्ले

REFBK-0023223

प्रस्तावना लेखक :

प्रा. गणेश हरी खरे

कार्याध्यक्ष, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

श्री लेखन वाचन भांडार

१००४ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.

# गडकोट

" संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश. परचक्र येताच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उध्वस्त होतो...या करता ज्यास राज्य पाहिजे, त्यांनी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राण-संरक्षण, असे पूर्ण चित्तात आणून कोणाचे भरवश्यावर न राहाता, आहे त्याचे सरक्षण करणे व नूतन बाधण्याचा हव्यास स्वत:च करावा, कोणाचा विश्वास मानू नये..."

— आज्ञापत्र

मुद्रक

य गो जोशी
आनद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

प्रकाशक :

कृ ग ढोकळ
श्रीलेखन वाचन भाडार,
१००४ बुधवार पेठ
पुणे ४११ ००२

© श. रा देवळे
श्रीविठ्ठल सदन
२३ आनदबाग नवी पेठ,
पुणे ४११ ० ३०

आवृत्ती पहिली :
छत्रपती शिवाजी महाराजांची ३०१ वी
पुण्यतिथी दि. १९ एप्रिल १९८१
हनुमान जयती : शके १९०३

किंमत पंधरा रुपये

# सुरुवातीला थोडेसे

रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रात वर्णन केलेले आणि शिवकालात असलेले किल्ल्यांचे महत्त्व आता उरले नसले तरी जुना इतिहास आणि स्फूर्तिदायक स्थळे म्हणून त्यांची माहिती असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने किल्ले आहेत तथापि शिवाजी महाराजांच्या जीवनात ज्यांना विशेष महत्त्व आले असे निवडक किल्ले या पुस्तकात घेतले आहेत. डोंगरी किल्ले आणि जलदुर्ग यांच्या बरोबर भुईकोट किल्ल्याची माहिती असावी म्हणून नगरचा किल्ला वर्णिला आहे, तर एक वेगळ्याच धर्तीचा किल्ला म्हणून देवगिरीचा समावेश या पुस्तकात केला आहे.

माझे प्राथमिक शाळेतील शिक्षक गुरुवर्य कृष्णाजी गणेश देशमुख यांनी १९२९ साली आम्हां विद्यार्थ्यांची कार्ले-भाजे-लोहगड अशी सहल काढली. त्या वेळी म्हणजे वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी डोंगरी किल्ला मी प्रथम पाहिला. याच सुमारास दुसरे गुरुजी श्री. मारुती केशव मोडक यांनी मला सिंहगड किल्ला दाखविला. यामुळे मला किल्ले पाहण्याची आवड निर्माण झाली. यानंतरच्या सुमारे पन्नास वर्षांत मी महाराष्ट्रातील अनेक किल्ले पाहिले. कधी माझ्या विद्यार्थ्यांच्या सहली नेल्या, कधी माझ्या मित्रांबरोबर गेलो. कधी किल्ले बारकाईने पाहून होत, तर कधी वरवर जाऊन येणे होई

१९५९ सालच्या सुमारास पुणे आकाशवाणी केंद्रासाठी मी आणि माझे मित्र श्री. म वि सोवनी यांनी ' या दगडा फुटल्या जिभा ' असे किल्ल्यांवर तीनचार लेख लिहिले. १९७४ साली त्या वेळच्या शिक्षणसंचालक डॉ सौ चित्रा नाईक, ग ल डोकळ आणि श्री. ना ध. पाटील यांच्या उत्तेजनाने लोकशिक्षण मासिकात काही किल्ल्यांवर लेख लिहिले. ' स्थळ–वर्णन आणि इतिहास ' असे त्या लेखाचे स्वरूप होते त्यात आवश्यक ती भर घालून ' महाराष्ट्रातील किल्ले ' हे पुस्तक तयार झाले. याच्या प्रकाशनात अनेक विघ्ने आली. १९७८ साली माझ्या एक हितचिंतकांकडून या पुस्तकाचे संपूर्ण

# गडकोट

" संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश. परचक्र येताच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उध्वस्त होतो.. या करता ज्यास राज्य पाहिजे, त्यांनी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राण-संरक्षण, असे पूर्ण चित्तात आणून कोणाचे भरवश्यावर न राहाता, आहे त्याचे संरक्षण करणे व नूतन बांधण्याचा हव्यास स्वत:च करावा, कोणाचा विश्वास मानू नये .."

— आज्ञापत्र


मुद्रक :
य गो जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

प्रकाशक :
कृ. ग. ठोकळ
श्रीलेखन वाचन भांडार,
१००४ बुधवार पेठ
पुणे ४११ ००२



© श. रा. देवळे
श्रीविठ्ठल सदन
२३ आनंदबाग नवी पेठ,
पुणे ४११ ० ३०.



आवृत्ती पहिली :
छत्रपती शिवाजी महाराजांची ३०१ वी
पुण्यतिथी दि. १९ एप्रिल १९८१
हनुमान जयंती शके १९०३

किंमत पंधरा रुपये

# सुरुवातीला थोडेसे

रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रात वर्णन केलेले आणि शिवकालात असलेले किल्ल्यांचे महत्त्व आता उरले नसले तरी जुना इतिहास आणि स्फूर्तिदायक स्थळे म्हणून त्यांची माहिती असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने किल्ले आहेत. तथापि शिवाजी महाराजांच्या जीवनात ज्यांना विशेष महत्त्व आले असे निवडक किल्ले या पुस्तकात घेतले आहेत. डोंगरी किल्ले आणि जलदुर्ग यांच्या बरोबर भुईकोट किल्ल्याची माहिती असावी म्हणून नगरचा किल्ला वर्णिला आहे, तर एक वेगळ्याच धर्तीचा किल्ला म्हणून देवगिरीचा समावेश या पुस्तकात केला आहे

माझे प्राथमिक शाळेतील शिक्षक गुरुवर्य कृष्णाजी गणेश देशमुख यांनी १९२९ साली आम्हां विद्यार्थ्यांची कार्ले-भाजे-लोहगड अशी सहल काढली. त्या वेळी म्हणजे वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी डोंगरी किल्ला मी प्रथम पाहिला. याच सुमारास दुसरे गुरुजी श्री मारुती केशव मोडक यांनी मला सिंहगड किल्ला दाखविला यामुळे मला किल्ले पाहण्याची आवड निर्माण झाली. यानंतरच्या सुमारे पन्नास वर्षांत मी महाराष्ट्रातील अनेक किल्ले पाहिले. कधी माझ्या विद्यार्थ्यांच्या सहली नेल्या, कधी माझ्या मित्राबरोबर गेलो कधी किल्ले वारकाईने पाहून होत, तर कधी वरवर जाऊन येणे होई

१९५९ सालच्या सुमारास पुणे आकाशवाणी केंद्रासाठी मी आणि माझे मित्र श्री. म वि सोवनी यांनी ' या दगडा फुटल्या जिभा ' असे किल्ल्यांवर तीनचार लेख लिहिले. १९७४ साली त्या वेळच्या शिक्षणसंचालक डॉ सौ चित्रा नाईक, ग ल. ठोकळ आणि श्री. ना. ध. पाटील यांच्या उत्तेजनाने लोकशिक्षण मासिकात काही किल्ल्यांवर लेख लिहिले, ' स्थळ–वर्णन आणि इतिहास ' असे त्या लेखाचे स्वरूप होते. त्यात आवश्यक ती भर घालून ' महाराष्ट्रातील किल्ले ' हे पुस्तक तयार झाले. याच्या प्रकाशनात अनेक विघ्ने आली. १९७८ साली माझ्या एक हितचिंतकांकडून या पुस्तकाचे संपूर्ण

हस्तलिखितच गहाळ झाले. पण मी ते पुनः सिद्ध केले. अनेक हितचिंतकांच्या आणि मित्रांच्या उत्तेजनाने आज ते प्रकाशित होत आहे. ते लिहिताना मला अनेक ग्रंथकारांच्या आणि विशेषतः श्री ग. ह खरे व शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या पुस्तकांचा उपयोग झाला. श्री गजाननराव खोले, प्रा. प्र के. घाणेकर आणि माझे विद्यार्थी–मित्र श्री ए. स गदो यांनी मला उत्तेजन दिले आणि साहाय्य केले. कोणी पत्रद्वारे माहिती पुरविली तर कोणी आपल्या संग्रहातील फोटो दिले. श्री सालकर, श्री म. वि. सोवनी, श्री. ग. वि. देशपांडे या चित्रकार मित्रांनी पुस्तकाच्या सजावटीसाठी साहाय्य केले. आनंद मुद्रणालयाचे श्री दादासाहेब आणि माधवराव जोशी यानी सुबक छपाई केली. भा. इ. स मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. ग ह. खरे यांच्यासारख्या जाणत्या इतिहासज्ञाचा आशीर्वाद प्रस्तावनेच्या रूपाने मिळाला. श्री दादासाहेब ठोकळ आणि त्यांचे चिरंजीव श्री. कृ ग. ठोकळ यांनी मोठ्या हौसेने हे पुस्तक प्रकाशित केले या सर्वांचा मी आभारी आहे.

'महाराष्ट्रातील किल्ले' हे पुष्कळ दिवस मनात असलेले माझे पुस्तक आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३०१ व्या पुण्यतिथीच्या दिवशी प्रकाशित होत आहे, याचा मला आनंद वाटतो. सर्व सामान्य वाचकांना, विद्यार्थ्यांना, आणि किल्ले पाहायला जाणारांना तेथील स्थानांची आणि ऐतिहासिक घटनांची कल्पना असावी हा माझा मुख्य हेतू माझ्या या पुस्तकाने अल्पस्वल्प प्रमाणात जरी पूर्ण झाला तरी मला समाधान वाटेल

श्रीविठ्ठलसदन, २२ आनंद बाग,<br>
नवी पेठ, पुणे ४११०३०<br>
३०१ वी शिव पुण्यतिथी<br>
दिनांक १९ एप्रिल १९८१

श. रा देवळे

# प्र स्ता व ना

महाराष्ट्रात मुस्लिमपूर्वकाळापासून कित्येक किल्ले होते. कित्येक किल्ले मुस्लिम सत्ताधाऱ्यानी व शिवछत्रपतींनी नव्याने उभारले व जुन्यांचे जीर्णोद्धार केले. असे सुमारे पाचशे किल्ले महाराष्ट्रात आहेत.

इतिहासात आलेल्या माहितीमुळे उत्सुक होऊन किंवा पर्यटनाच्या हौसेने अलीकडे शेकडो लोक जमतील तेवढे किल्ले पाहण्यास जातात कित्येकजण तर रायगडासारख्या काही दुर्गांच्या भक्तिभावाने वाऱ्याही करतात. पण अशा भक्ति-भावाने वाऱ्या करणाऱ्यांपैकी निदान अर्धे लोक तरी असे असतील की ज्यांना त्या विशिष्ट दुर्गाविषयी वर्णनात्मक व ऐतिहासिक माहिती विचारली की ते गडबडतील; त्यांना ती माहिती साधार तर मुळीच सांगता येणार नाही. पर्यटकांपैकी काही मात्र असे असतात की त्यांना दोन्ही प्रकारच्या माहितीची आवश्यकता भासते.

महाराष्ट्रात इग्रजी राज्य होऊन फारशी वर्षे लोटली नाहीत, तोच येथे स्वदेशाभिमानाच्या एकाहून एक मोठया लाटा उत्पन्न होऊ लागल्या. पैकी लोक-मान्यांनी उत्पन्न केलेली लाट फारच प्रभावी ठरली। तथापि त्या पूर्वीच्या एका क्षीण लाटेतून कै. गोगटे यांचे ' महाराष्ट्र देशातील किल्ले ' हे द्विखंडात्मक पुस्तक प्रकाशित झाले. लोकमान्य टिळकांनी शिवछत्रपतींची राजधानी रायगड यावर त्यांची समाधी असल्यामुळे विशेष लक्ष केंद्रित केले. त्यासाठी त्यांनी व त्यांच्या अनुयायांनी एक निधीही उभारला तो निधी शिवाजी-रायगड स्मारक मंडळाच्या रूपाने कार्यतत्पर आहे.

हळू हळू नवीन स्वदेशाभिमानी व पर्यटनोत्सुक लोकांनी रायगडासारखे जे अनेक किल्ले महाराष्ट्रात आहेत ते पहाण्यास सुरवात केली. आता महाराष्ट्रात ज्यांनी पन्नासच्या आसपास किल्ले पाहिले असतील अशी शंभर माणसे सहज निघावीत

असा अदमास आहे. ही संख्या आता वाढतच जाईल; त्याप्रमाणेच पहावे किल्ल्यांची संख्याही वाढत जाईल याविषयी शंका नाही.

गेल्या चाळीस वर्षांच्या काळात महाराष्ट्रातील किल्ल्यांपैकी रायगड, राजगड, पुरंदर, प्रचडगड, विशाळगड, सिंहगड अशा पाच सहा किल्ल्यांवर पुस्तके झाली आहेत तथापि इतिहासप्रेमी व पर्यटक यांची उत्सुकता लक्षात घेता याहून अधिक किल्ल्यांवर पुस्तके व्हावयास पाहिजेत हे स्पष्टच आहे. असा एक प्रयत्न श्री. शभूराव देवळे यांनी ' महाराष्ट्रातील किल्ले ' या पुस्तकाच्या रूपाने केला आहे आणि तो स्वागत करण्यासारखा आहे

पाश्चात्य देशात जुन्या किल्ल्यांवर रचना, तिचा परिणाम आणि किल्ल्यांचा इतिहास यावर कितीतरी चांगली पुस्तके तयार झाली आहेत. अगदी अलीकडे ' सिडने टॉय् ' याने ' कॅसल्स इन् इंग्लड ' व ' स्ट्रॉंग होल्ड्स इन् इंडिया' अशी दोन पुस्तके वरील पद्धतीने प्रकाशित केली आहेत. त्यांत इतिहास कमी, पण रचना व वर्णने अधिक आणि तीही आराखडे व चित्रे देऊन सजविलेली अशी आहेत. मला वाटते, रचना आणि इतिहास या दोघांचीही उत्तम सांगड घालून अद्ययावत् माहितीने भरलेली पुस्तके प्रकाशित करणे हे अधिक ज्ञानवर्धक होईल पण त्यासाठी लागणारा पैसा सामान्य माणसापाशी असणे अवघड असते तेव्हा अशी पुस्तके प्रसिद्ध करणे जरी ज्ञानवर्धक ठरले, तरी ती अलीकडल्या दहापाच वर्षांत प्रकाशित होतील, असे वाटत नाही. त्यामुळे श्री. देवळे यांनीं लिहिलेल्या पुस्तकाची आवश्यकता होतीच, ती अंशतः का होईना या पुस्तकाच्या प्रकाशनाने पूर्ण होत आहे.

एकाच पुस्तकात महाराष्ट्रातल्या सर्व किल्ल्यांची वर्णने घालणे व त्यांचा इतिहासही आणणे हे फारसे शक्य होणार नाही. म्हणून वर्णनासाठी कोणत्या किल्ल्यांची निवड करायची हा प्रश्न पुढे येणे स्वाभाविकच आहे या बाबतीत इतरांची मते श्री. देवळे यांच्या सारखीच असतील, असे समजण्याचे कारण नाही तथापि देवळे यांना त्यातल्या त्यात जे महत्त्वाचे किल्ले वाचकांच्या समोर अगोदर यावे, असे वाटले, अशा पचरा किल्ल्यांची वर्णने त्यांनी येथे केली आहेत. ती वर्णने स्पष्ट व्हावी म्हणून काही चित्रेही समाविष्ट केली आहेत. पुढील आवृत्तीत या सर्व किल्ल्यांचे नकाशे आणि रेखाचित्रांऐवजी छायाचित्रे घालून हे पुस्तक त्यांनी सजविले तर ते अधिकच आकर्षक होईल. तथापि


त्यांनी जे पुस्तक तयार केले आहे, तेही वर उल्लेखिलेल्या दोन्ही प्रवृत्तींच्या ांना उपयुक्त वाटेल.

या निमित्ताने मला आणखी एक अवश्य सुचवावेसे वाटते. आपणाकडील बहुतेक इतिहासाभ्यासी महाराष्ट्रातील किल्ले पाहून संतुष्ट राहतात, पण मला असे आवर्जून सांगावेसे वाटते की लोक ज्याप्रमाणे महाराष्ट्रातील किल्ले पहातात, त्याप्रमाणे त्यांनी महाराष्ट्राबाहेरचे किल्लेही पाहून त्या विषयी वर्णनात्मक व इतिहास-कथनात्मक पुस्तके लिहिली, तर तेही आवश्यक आहे. मी स्वतः ाल्हेर, जिंजी व आणखी इतर किल्ले यांची वर्णनात्मक व ऐतिहासिक माहिती े दोनचार लेख लिहिले; पण वर्तमानपत्री लेख माणूस विसरतो. पुस्तक-ाने लिहिलेले अधिक काळ टिकते. तेव्हा अशा किल्ल्यांचीही माहिती पुस्तक-रूपाने प्रकाशित व्हावी, कोणीतरी हेंही काम करावे, असे सुचवून ही प्रस्तावना संपवितो.

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे ३०.
रामनवमी, दि. १२-४-८१

—ग. ह. खरे

693
23223



## अनुक्रम :



☐ गडकोट : ( आज्ञापत्र ) २
☐ सुरुवातीला थोडेसे : श. रा. देवळे ३
☐ प्रस्तावना : प्रा. ग. ह. खरे ५
१. शिवनेरी : शिवरायांचे जन्मस्थान ९
२. प्रचंडगड ( तोरणा ) : गरुडाचे घरटे १८
३. प्रतापगड : अलौकिक पराक्रमाचे स्थान २६
४. पुरंदर : संभाजीराजांचे जन्मस्थान ३७
५. राजगड : शिवरायांची पहिली राजधानी ४७
६. पन्हाळा : सिद्दीच्या हातावर तुरी ५७
७. विशाळगड : बाजीप्रभूंचे स्मरणस्थान ७०
८. सिंहगड : तानाजीच्या पराक्रमाचे स्मारक ८१
९. रायगड : शिवरायांची राजधानी ९१
१०. लोहगड : मावळातील एक किल्ला ११२
११. सिंधुदुर्ग : शिवरायांची मूर्ती असलेला किल्ला १२०
१२. जंजिरा : अजिंक्य जलदुर्ग १३१
१३. नगर : प्रचंड भुईकोट किल्ला १४५
१४. सज्जनगड : समर्थांचे विश्रांतिस्थान १५५
१५. देवगिरी : वेगळ्याच धर्तीचा किल्ला १६८
☐ किल्ल्यांचे मार्ग १७५
☐ संदर्भ ग्रंथ १७६


☐ ☐

# १ : शिवनेरी शिवरायांचे जन्मस्थान

महाराष्ट्रात शेकडो किल्ले आहेत काही जमिनीवरचे म्हणजे भुईकोट, काही डोंगरावरचे म्हणजे डोंगरी, तर काही समुद्रातले म्हणजे जजिरे डोंगरी किल्ल्यातही काही बेताच्या उचीवर असलेले, काही खूप उच्च असलेले, तर काही चढायला अतिशय दुर्गम, कठीण ! या वेगवेगळ्या किल्ल्याना कोणत्या ना कोणत्या कारणाने महत्त्व आले आहे पण या सर्व किल्ल्यात शिवनेरी किल्ल्याचे स्थान आगळे आहे. हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या शिवरायाची ती जन्मभूमी बस्स, एवढे पुरे आहे शिवनेरीचे महत्त्व आणखी वेगळ्या शब्दात काय सागायचे !

\ शिवनेरीच्या भोवतालचा प्रदेशही विलक्षण आहे त्याच्या



दुरून दिसणारा शिवनेरी किल्ला

पश्चिमेला भीमाशंकर हे ज्योतिर्लिंग, तर उत्तरेला अष्टविनायकातील लेण्याद्रीचा गणपती पूर्वेला ओझरचा गणपती, तर वायव्येला नाणेघाटातला कुकडेश्वर अशा या पवित्र ठिकाणाच्या कोंदणात शिवनेरी किल्ला उभा ठाकला आहे भोवतालातून मीना, पुष्पावती, कुकडी इत्यादी नद्या वाहतात

पुण्याच्या उत्तरेस सुमारे शंभर किलोमीटरवर (साठ मैलांवर) जुन्नर हे तालुक्याचे ठिकाण आहे जुन्नर हे गाव फार पूर्वीच्या काळापासून व्यापारी मार्गावरील ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. पश्चिमेला नाणेघाटावरून एक मार्ग देशावर येतो हा जुन्या काळचा रहदारीचा रस्ता जुन्या काळी चौल, कल्याण, सोपारा वगैरे बंदरातून आलेला माल नाणेघाटातून देशावर येत असे त्यामुळे या मार्गावरील जुन्नरला मोठे महत्त्व होते. शिवनेरी हा या मार्गाचा रक्षक किल्ला

जुन्नरच्या पश्चिमेला अडीच किलोमीटर (दीड मैल) गेले म्हणजे शिवनेरीचा पायथा लागतो पायथ्यापासून किल्ल्याकडे पाहिले की पूर्व-पश्चिम पसरलेल्या एखाद्या अजस्र पेटीसारखा तो दिसतो शिवनेरीच्या आणि त्याच्या आसपासच्या डोंगराना अनेक लहानमोठी भोकशी दिसतात प्राचीन काळी बौद्ध भिक्षूना राहण्यासाठी खोदलेल्या या लहान लहान गुहा आहेत डावरी रस्त्याने गड चढू लागलो म्हणजे जवळ जवळ अर्धा डोंगर चढल्यावर एक दरवाजा लागतो त्याच्यापुढे शे-दीडशे पावलांवर दुसरा दरवाजा आहे त्याचे नाव ' परवानगी दरवाजा या दरवाजाच्या कमानीवर शरभाची चित्रे आहेत शरभाच्या पायात हत्ती पकडले आहेत तसेच एका पायात गंडभेरुंड आहे

परवानगी दरवाजातून पुढे गेले म्हणजे एकावर एक दोन तीन

मजबूत बांधणीचे प्रचंड बुरुज दिसतात. शिवनेरीच्या पूर्व, दक्षिण, आणि उत्तर बाजूच्या डोंगराचे कडे तुटलेले आहेत. त्यामुळे तिकडे तटबंदीची आवश्यकता नाही. फक्त पश्चिमेकडील बाजूच चढायला सोपी आहे. या दिशेलाच तेवढी तटबंदी केलेली आहे.

'परवानगी' दरवाजापासून थोडे पुढे गेले की आणखी दोन दरवाजे लागतात. एक 'हत्ती दरवाजा' आणि दुसरा 'पीर दरवाजा'. पीर दरवाजा अधिक सुबक बांधणीचा आहे. येथून



शिवाई देवीचे मंदिर, शिवनेरी

पुढील वाट थोडी अवघड आहे  या वाटेने पुढे गेल्यावर उजव्या बाजूला शिवाई देवीचे मदिर लागते  जवळच पाढऱ्या चाफ्याची झाडे दिसतात

शिवाई देवीचे मदिर एका कडयाजवळ काहीसे डोंगराच्या पोटात आहे  डोंगराच्या एका बारीक लेण्यात देवीची स्थापना झाली आणि नतर पुढील सभामडप उभारला, असे झाले असावे  सभामडप थोडा बसक्या बाधणीचा आहे  मदिरात अष्टभुजा देवीची सगमरवरी रेखीव मूर्ती दिसते. ती अलीकडल्या काळातील आहे  या सगमरवरी मूर्तीच्या शेजारी शेंदूर आणि कुकू लावलेला देवीचा एक उभट तादळा आहे. ही बहुधा जुनी मूर्ती असावी  देवीपुढे मस्तक टेकून आणि डोळे मिटून नमस्कार करीत असताना आपले मन ऐतिहासिक काळात जाते आणि एक वेगळेच चित्र डोळ्यासमोर उभे राहते  देवीला नमस्कार करून जिजाबाई नवस बोलत आहे, 'हे भवानीमाते, हे शिवाईदेवी, तुझ्या कृपेन मला मुलगा होऊ दे  मी त्याला तुझ नाव ठेवीन ' हे चित्र दिसते न दिसते तोच क्षणात आपल्या मिटल्या डोळ्यासमोर दुसरे चित्र उभे राहते  छोटयाशा शिवरायाला देवीच्या पुढयात ठेवून जिजाबाई देवीची प्रार्थना करीत आहे, ' हे माते, या छोटया बालकावर नेहमी तू आपली कृपादृष्टी ठेव '



शिवाई देवीची जुनी मूर्ती, हिच्याजागी आता नवीन मूर्ती बसविली आहे

डोळ्यापुढे ही चित्रे तरळत असतानाच आपण देवीचे दर्शन घेऊन पुढे निघतो. यानंतरच्या चढावरचे दोन दरवाजे ओलांडून आपण पुढे गेलो की 'अबरखाना' लागतो. अबरखाना म्हणजे धान्य साठवण्याची जागा. येथे तळघरात धान्य साठवण्यासाठी बांधलेल्या खोल्या आढळतात.

अबरखान्यावरून आपण पुढे जाऊ लागतो. एका बाजूला डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी अशी ही वाट. या काहीशा रुंद वाटेवर उजव्या बाजूला जमिनीलगत काही बांधकाम दिसते. हे कसले बांधकाम आहे म्हणून आपण जवळ जाऊन पाहावे, तर दिसतात गंगा-जमुना टाकी. दोन्ही टाकी जमिनीच्या पोटात खोदली आहेत. दोन्ही जवळ जवळ सारख्या लांबीरुंदीची असून एकमेकांना जोडलेली आहेत. त्यातील स्वच्छ पाण्यात वरील छताचे प्रतिबिंब पडल्याने ती उथळ भासतात, पण ती खोल आहेत. टाक्यांतील पाणी स्वच्छ, नितळ आणि थंडगार आहे. उन्हाळ्यात किल्ला पाहायला येणाऱ्या लोकांना तर ते अधिकच थंड वाटते आणि समाधान देते. टाक्यांच्या वरचे आच्छादनाचे छत खाली येऊ नये म्हणून त्याला आत चार दगडी खांबांचे आधार दिले आहेत.


शहाजीराजे आपल्या घोडदळासह दौड करीत चालले होते. पाठीशी मोगलांचे लष्कर भिडलेले. शहाजीराजे जुन्नरपाशी आले, त्या वेळी मातोश्री जिजाबाईंचे पोट दुखू लागले. अगदी पालखी-तून प्रवास करणेही अशक्य झाले. मग शहाजीराजांनी रायभान नाईक या आपल्या विश्वासू माणसाजवळ मोहोरेची अंगठी दिली आणि त्याच्याबरोबर जिजाबाईसाहेबांना शिवनेरीवर आपले व्याही विश्वासराव या किल्लेदाराकडे पाठविले. ते स्वतः पुढे निघून गेले.

विश्वासरावांनी जिजाबाईंची चांगली काळजी घेतली. या

प्रसगाचे वर्णन रवींद्र परमानंद या शिवकालीन कवीने आपल्या शिवभारत ग्रथात पुढीलप्रमाणे केले आहे 'गडावरील वाड्यातील एका सुरक्षित खोलीत जिजाबाईच्या बाळतपणाची व्यवस्था करण्यात आली होती. भितींना चुनकळीचा पाढरा रग दिला होता त्यावर मगलसूचक स्वस्तिके रेखाटली होती छताच्या कडेला मोत्याच्या झालरी लावल्या होत्या. पचपल्लव आणून ठिकठिकाणी खोचले होते कलशात पाणी भरून ठेवले होते, जमिनीवर पाढऱ्या मोहऱ्या टाकल्या होत्या. सगळीकडे मगल दीप पाजळले होते . वृद्ध आणि कुशल सुइणी जवळ उभ्या होत्या. विश्वासू, अनुभवी आणि उत्तम हातगुणाचे वैद्य जवळ हजर होते'

'अशा स्थितीत दि १९ फेब्रुवारी १६३० फाल्गुन वद्य तृतीया, शुक्रवारी सूर्यास्तानतर थोड्या वेळाने जिजाबाई प्रसूत होऊन त्याना मुलगा झाला'

शिवजन्माचा हा अपूर्व सोहळा ज्या भूमीवर घडला तो



शिवजन्मस्थानावरील जीर्णोद्धार केलेली वास्तू

शिवनेरीचा भाग व त्या वेळच्या जुन्या वाड्याचे अवशेष येथे भोवताली दिसतात याच जागी काही वर्षांपूर्वी शिवजन्मस्थानाचे स्मारक बांधण्यात आले आहे हे स्मारक म्हणजे एक भक्कम दगडी अशी दुमजली इमारत आहे इमारतीवर गेल्यानंतर भोवतालचा लांबवरचा प्रदेश दिसतो या छोट्या इमारतीजवळच आता बाग आहे तेथे जिजाबाई आणि बालशिवाजी यांचा पुतळाही बसवला आहे.

शिवनेरी हा महाराष्ट्रातला एक जुना किल्ला महाराष्ट्रातला अग्रपूजेचा मान असलेला किल्ला. सुमारे 'अडीच हजार वर्षां-पासूनच्या इतिहासाचा तो साक्षी आहे शिवनेरीवर आढळणाऱ्या निरनिराळ्या खुणांवरून याबद्दल अंदाज करता येतो


(शिवनेरीच्या कुशीत सुमारे पन्नास लेणी खोदलेली दिसतात त्यापैकी दहा लेण्यात अशोकाच्या वेळच्या ब्राह्मी लिपीत खोदलेले शिलालेख आढळतात] छत्तीसाव्या लेण्यात पुढील लेख आढळतो

यवन्स

चितर गडानम्

भोजन मटपो

देवधम्मसधे



शिवनेरीवरील क्रमांक ४८ च्या लेण्यातील लेख

म्हणजे सर्व लोकांच्या कल्याणाकरिता वीरसेन या धार्मिक व्यापाऱ्याने हे चैत्यघर धर्मादाय केले आहे.

बौद्ध काळापासूनच्या ऐतिहासिक स्मृती शिवनेरीवर आढळतात बहुतेक अवशेष काळाच्या ओघात नष्ट झाले पण ऊन, वारा, पाऊस आणि काळ या सर्वांच्या तडाख्यातून वाचून अद्याप तग धरलेले काही अवशेष आढळतात त्यात दरवाजे, काही टाकी, तटबंदीची मांडणी, हनुमान, गणपती वगैरे काही मूर्ती हे यादव-कालीन अवशेषही आहेत. आजही ही पडकी वास्तुशिल्पे शिवनेरी-च्या यादवकालीन वैभवाची साक्ष पटवून देतात.

सुलतानशाहीतही शिवनेरीला चांगला मान मिळाला. शिवनेरी बहामनी राज्यात असताना अहमदनगरच्या निजामशाहाने जुन्नरची राजधानी म्हणून निवड केली आणि राजधानीतला श्रेष्ठ किल्ला म्हणून या किल्ल्याचा गौरव झाला दरवाजावरील विशिष्ट प्रकारच्या कमानी, इदगा म्हणजे प्रार्थनास्थान; अंबरखाना, हमाम-खाना ( स्नानगृह ) वगैरे इमारती याच काळातील आहेत

नंतर पुणे, सुपे, चाकण वगैरे भाग नगरच्या निजामशाहाने शहाजीराजांना जहागीर दिला. याच वेळी शिवाई देवीच्या कृपेने जिजाबाईंना येथे शिवाजी झाला परंतु नंतर बालशिवाजी येथे न राहता पुण्यास गेला

मोगल आणि मराठे यांच्या धामधुमीत एकसूत्रीपणाने शिवनेरी कधीच कोणाच्या ताब्यात राहिला नाही या काळात शिवनेरीवर मोगलांचाच अमल जास्त होता. शेवटी सतराशेसोळामध्ये छत्रपती शाहू राजांनी तो मोगलांकडून जिंकून घेतला पेशवाईतील शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव हा पेशवा होण्यापूर्वी शिवनेरीलाच राहात होता त्यानंतर गादीवर बसण्यासाठी तो पुण्याला गेला शेवटी याच बाजीरावाने सन अठराशेअठरामध्ये हा किल्ला मेजर एल्ड्रिज या गोऱ्या इंग्रजाच्या ताब्यात दिला.

इंग्रजांच्या काळात शिवनेरीला तुरुंगाचे स्वरूप आले. इंग्रजांनी पिवळ्या चिनी कैद्यांना येथे आणून ठेवले होते. या काळात शिवनेरी कधी नगरच्या बंडखोर कोळ्यांचे आश्रयस्थान बनला. तर कधी तेथे इंग्रजी फौजेचा तळ पडला

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि शिवनेरी-च्या माथ्यावरून स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी येथे मोठा उत्सव झाला

असे आहे छत्रपती शिवरायाचे जन्मस्थळ–किल्ले शिवनेरी !

□ □

# २ : प्रचंडगड ( तोरणा ) गरुडाचे घरटे


( महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक किल्ले प्रसिद्धीस आले, त्यात तोरणा किल्ल्याला एक वेगळेच महत्त्व आहे तोरणा हे या किल्ल्याचे पूर्वीचे नाव याला शिवरायानी नाव दिले -- प्रचंडगड शिवाजी महाराजाच्या पहिल्या मोठ्या विजयाचा मानकरी म्हणजे हा तोरणा किल्ला )



दुरून दिसणारा प्रचडगड

तोरणा किल्ला पुण्याच्या नैऋत्येस नीरा नदीच्या उगमाजवळ आहे. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवरून नैऋत्येकडे पाहिले की हा किल्ला दिसतो लकडी पुलावरून सिंहगडच्या उजव्या हातासही तोरणा दिसतो. हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे चौदाशे मीटर (४६०६ फूट) उंच आहे. किल्ल्याची ही उंची व त्याच्या माचीचा विस्तार यामुळेच बहुधा त्याला प्रचडगड हे नाव दिले असावे

पुणे ते नसरापूर आणि नसरापूर ते वेल्हे या रस्त्याने गेल्यास आपण तोरण्याच्या थेट पायथ्याशी जातो नसरापूर पुण्याच्या दक्षिणेस आहे नसरापूरवरून जाणारा रस्ता पश्चिमेला वळून वेल्ह्यास जातो वेल्ह्याच्या नैऋत्येस गडाच्या चढाला सुरुवात होते.



तोरणा किल्ल्याचे
देखणे प्रवेशद्वार

गड चढताना एकामागोमाग एक असणाऱ्या टेकड्या ओलांडाव्या लागतात मध्येच कोसळलेल्या कड्यामधून पायवाट गेलेली आहे. येथून चढताना आधारासाठी वाटेच्या दोन्ही अंगांना गज ठोकलेले दिसतात. या वाटेवरून पुढे गेलो की आपण 'बिनी दरवाजा'पाशी पोहोचतो

राजगडाच्या बाजूनेही तोरण्यावर यायला वाट आहे ती अवघड नाही, पण ओसाड आणि निर्मनुष्य आहे.

बिनी दरवाज्यातून आत गेल्यावर आपल्याला परत कोठी दरवाजा ओलांडावा लागतो या दरवाजातून आत गेल्यावर डावीकडे तोरणजाई नावाच्या देवीचे देऊळ आहे त्याच्या पुढे गेल्यावर 'तोरण आणि खोकड' ही पाण्याची दोन टाकी लागतात आणखी थोडे चढल्यावर आपण बालेकिल्ल्यावर पोहोचतो.

बालेकिल्ल्यावर मेंगाईचे देऊळ आहे देवळात मेंगाईची मूर्ती आहे देवळाची स्थिती तितकीशी चांगली नाही. पूर्वी नवरात्रात मेंगाईचा मोठा उत्सव व्हायचा. त्या वेळी कथा आणि गोंधळ यांचे कार्यक्रम होत असत श्रावण महिन्यातही देवीचा उत्सव असे. मेंगाईच्या समोर 'दिवाणघर' आहे. जवळच उच-



झुंजारमाची, तोरणा

कटयावर तोरणेश्वर शंकराचे देऊळ आहे देवळासमोर दीपमाळ आहे येथून झुंजारमाचीकडे जाताना गडावर सती गेलेल्या स्त्रियांच्या स्मारकाचे दगड वाटेत आहेत

बालेकिल्ल्याच्या पठाराचा विस्तार फारसा नाही पण येथून लांबवरचा प्रदेश पाहता येतो. एका बाजूला सिंहगड, खडकवासले, पुणे, पुरंदर हे भाग दिसतात, तर दुसऱ्या बाजूला भाटघर धरण आणि रायगड हे दिसू लागतात तिसऱ्या बाजूने महाबळेश्वराचा डोंगर व प्रतापगड हा प्रदेश पाहता येतो

गडाला 'झुंजार माची आणि 'बुधला माची' अशा दोन माच्या आहेत यापैकी झुंजार माची ही विस्ताराने फार मोठी नाही; पण तिच्यावरून उतरून जाणे अवघड आहे कड्याच्या अगदी निमुळत्या भागावरून झुंजार माचीवर चालत जावे लागते. दोन्ही बाजूच्या खोल दऱ्या पाहून डोळे फिरतात. या माचीवरून गडाच्या दोन्ही बाजूंवर लक्ष ठेवता येते. तसा अवघड प्रसंग आलाच तर तेथून मारा करणेही शक्य होते म्हणून हिचे नाव झुंजार माची ।

येथून बुधला माचीवर जाण्यापूर्वी कोकण दरवाजा' ओलांडावा लागतो या दरवाज्याचे तोंड कोकणच्या बाजूला आहे म्हणून त्याचे नाव कोकण दरवाजा येथून आपण बुधला माचीवर येतो बुधला माचीचा विस्तार मोठा आहे. तिची लांबी व रुंदी सुमारे तीन-तीन किलोमीटर (सुमारे दोन-दोन मैल) आहे तिच्या माथ्यावर बुधल्याच्या आकाराचा उंचवटा आहे येथे 'हत्ती माळ 'आहे त्याशिवाय तीन टाकी आहेत. बुधल्याच्या आकाराचा उंचवटा ओलांडला की माचीला दोन सोंडा फुटलेल्या दिसतात एक जाते दक्षिणेकडे, तर दुसरी पश्चिमेकडे दक्षिणेला गेलेली

साड सरळ राजगडापर्यंत गेलेली दिसते.

इ स १६४५ मध्ये रायरेश्वराच्या देवळात बालशिवाजी-राजानी देशमुख-देशपांड्यांचा जमाव जमवला. हजार-बाराशे मावळे त्या वेळी उपस्थित असावेत. या सगळ्या मंडळींनी हिंदवी स्वराज्य स्थापण्याची शपथ घेतली स्वराज्य निर्माण करायचे तर एखादा किल्ला हाती असायलाच पाहिजे शिवाजी महाराजाचे लक्ष तोरण्याकडे वळले., तोरणा त्या वेळी विजापूरकराच्या ताब्यात होता गडावर विजापूरकराची फारशी शिबंदी नव्हती तेव्हा महाराजानी सामोपचाराने किल्ला मिळतो का, ते पाहायचे ठरवले त्यानी किल्लेदाराची भेट घेतली किल्ला विजापूरच्या सुलतानाकडे होता खरा, पण किल्लेदार मराठाच होता. त्याला शिवाजी राजाचे विचार पटले. तो शिवाजी राजाना मिळाला त्याने विजापूरकराची सत्ता झुगारून दिली गडावरचे हिरवे निशाण त्याने खाली उतरविले हिंदवी स्वराज्याचा भगवा झेंडा येथे डौलाने फडकू लागला. शिवाजी महाराजाचा पहिलाच प्रयत्न यशस्वी झाला

गड आपल्या ताब्यात आल्यावर शिवाजी महाराजानी गडाची पाहणी सुरू केली. गडाचा ठिकठिकाणी ढासळलेला तट बांधून काढण्याचे ठरले तटाचे डागडुजीचे काम सुरू झाले आणि स्वराज्याचे भाग्य उदयाला आले ! खणता खणता भूमिगत धन सापडले परमेश्वराने स्वराज्याला दिलेला हा जणू आशीर्वादच ! मोजता येणार नाही एवढी संपत्ती ! सोन्याची नाणी, चिपा, चांदीचे गोळे अशी संपत्ती तेथे सापडली शिवाजीमहाराजानी या पैशातून गडाची तटबंदी पूर्ण केली. नवीन शस्त्रास्त्रे खरेदी केली. शिवाय राजगड हा गडही बांधला. असा हा शुभशकुनी गड !

पुढे मिर्झाराजे जयसिंह आणि शिवाजी महाराज याच्यात तह झाला त्या वेळी शिवाजी महाराजानी तेवीस गड मोगलाना देऊन बारा गड आपल्याकडे ठेवले त्यात तोरणा स्वत.कडे ठेवला होता १६७१–७२ साली पाच हजार होन खर्चून शिवाजी महाराजानी गडाचा जीर्णोद्धार केला

शिवाजी महाराजाच्या मृत्यूनंतर स्वत औरगजेब मोठी फौज घेऊन दक्षिणेत आला आपल्या सगळ्या शक्तीनिशी औरगजेबाने मराठी राज्य नष्ट करण्याचा निश्चय केला औरगजेबाच्या ताब्यात किल्ल्यामागोमाग किल्ले जाऊ लागले सभाजी महाराजाचा वध झाला या सुमारास तोरणा मोगलाच्या ताब्यात गेला इ स १६९० मध्ये तो शंकराजी नारायण सचिव याने परत घेतला पण पुढे परत मोगलानी तो जिकून आपल्या ताब्यात ठेवला त्यानतर इ स १६९४ पूर्वी मराठ्यानी हा गड मोगलाकडून पुन्हा जिकला आणि त्यावर आबाजी विश्वनाथ प्रभू याची नेमणूक केली

पुढे इ स १७०४ मध्ये तोरण्याच्या परिसरात औरगजेब बादशाहाचे तबू उभे राहिले मोगलानी हा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला मोगल सैन्यातील हमीदुद्दीनखान हा कमरेला दोर र आपल्या साथीदारासह किल्ल्यावर आला बरीच हाणा-ताली दोन्ही बाजूचे वीर शर्थीने लढले, पण अखेर तोरणा ाव बादशाहाच्या ताब्यात गेला त्याने या गडाचे नाव ' फुतूहुलघैब असे नवे नाव दिले हा किल्ला जिकल्या-बादशाहाने हमीदुद्दीनखानाला खास पोषाख आणि दीड ी मनसब दिली

नर छत्रपती शाहू महाराज जेव्हा सातारला राज्य करू

कि ..

लागले त्या वेळी (इ. स १७०९ च्या सुमारास) गडाच्या व्यवस्थेसाठी त्यानी तीन हजार रुपयाची तरतूद केल्याचा एक उल्लेख सशोधकाना मिळतो इ स १८१२ मधला एक ताळेबंदाचा कागद मिळतो. त्यावरून त्या काळी गडावर निरनिराळ्या प्रकारचे एकूण २१५ नोकर होते असे दिसते

कालान्तराने मराठी राज्य गेले आणि इग्रजाचे राज्य सुरू झाले, तरीही तोरणा अर्ध-स्वराज्यात राहिला; कारण त्याचा समावेश भोर सस्थानात झाला होता भारत स्वतंत्र झाल्यावर हा किल्ला पूर्ण स्वराज्यात समाविष्ट झाला. या अर्थाने विचार करता तोरणा किल्ला फार भाग्यवान आहे. तो काही वेळा मोगलाच्या ताब्यात गेला असला तरी शत्रूकडे जास्त काळ राहात नसे मराठे लगेच तो परत आपल्या ताब्यात आणीत. इ स. १६४६ पासून तो एका अर्थाने स्वराज्यातच आहे. म्हणूनच वाटते की, या किल्ल्यावर शिवाजी महाराजानी जेव्हा स्वराज्याचे निशाण चढविले तो मुहूर्त फार चागला असला पाहिजे

तोरणा किल्ला भोर सस्थानात होता, त्या वेळी त्यावर आठ-दहा माणसे राहात असत. शिवरायाच्या स्वराज्याच्या काळात हीच सख्या दीडशे ते दोनशे होती यावरून कालानुसार गडाचे महत्त्व कसे कमी कमी होत गेले, ते दिसून येते.

तोरण्याबद्दल लिहिताना एका इग्रज लेखकाने म्हटले आहे, 'सिंहगडास जर सिंहाची गुहा म्हटले तर तोरण्यास गरुडाचे घरटे म्हटले पाहिजे.' खरोखरच आपले पूर्वज सिंहासारखे पराक्रमी व गरुडासारखे शत्रूवर झडप घालणारे होते या तोरणा किल्ल्यास इ स १८८० मध्ये डग्लस नावाच्या एका साहेबाने भेट दिली. तो म्हणतो, "या भागात हिंडता हिंडता आम्ही सह

तोरणा पाहाण्यास गेलो. शिवाजीने जिंकलेला हा पहिला मोठा किल्ला होय, हे आपण सदैव ध्यानात ठेवले पाहिजे. या किल्ल्याभोवती त्याने मराठी राज्याचा पसारा वाढविला. ज्या मराठी राजाने मोगल बादशाहाचे आसन हालविले, त्याचे हे उगमस्थान होय. या ठिकाणी एके काळी कितीतरी लढाया झाल्या. पण आज येथे काय दिसत आहे ? जिकडे तिकडे दगडाचे ढीगच्या ढीग पडले आहेत ! आणि पडक्या इमारतींवर खूप उंच गवत वाढले आहे ! " ते दृश्य पाहून साहेबाचे हृदयही भावनांनी हेलावले. मग मराठी माणसाचे अंतःकरण हा किल्ला पाहून भरून येईल, यात नवल ते काय ?

□ □

# ३ : प्रतापगड अलौकिक पराक्रमाचे स्थान

महाबळेश्वरच्या उच्च उच्च पठारावर आपण उभे राहून चहू-बाजूला दृष्टी फेकली, म्हणजे सह्याद्री हे काय जबरदस्त प्रकरण आहे, हे आपणाला समजते. आर्थर सीट, लॉड्विक पॉइंट, बॉम्बे पॉइंट, एल्फिन्स्टन पॉइंट ही सारी महाबळेश्वरच्या पठारावरची टोके आहेत. या पठाराच्या टोकाच्या उभ्या भिंती निसर्गाने कातीव केल्या आहेत. एखाद्या पटाशीने लाकूड तासून घ्यावे, तशा सरळ तीन-तीनशे मीटर उभ्याच्या उभ्या कापलेल्या आहेत तळाशी घनदाट अरण्यानी भरलेल्या मोठमोठ्या दऱ्या. एका दरीतून कृष्णा, दुसऱ्या दरीतून वेण्णा, तर तिसरीतून कोयना, अशा दऱ्यादऱ्यातून झुळझुळ वाहणारे जलप्रवाह आहेत या प्रवाहाच्या दोन्ही बाजूना लहान मोठ्या उंचनिंच टेकड्याच टेकड्या आहेत नागाच्या चालीप्रमाणे सरसर वळणे घेत हे प्रवाह या टेकड्याच्या पायातून वहात असतात; आणि बाराही महिने हिरव्यागार वृक्षवेलीचा शोभिवत हिरवागार शालू अंगावर वेढून बसलेल्या असतात या सगळ्या प्रदेशाचे नाव आहे ‘ जावळी ’. उंचावरच्या पठारावरून पाहताना हा देखावा रम्य दिसतो पण उरात धडकी भरवणारा हा जावळीचा प्रदेश आहे. शिवाजी महाराजानी हा जावळीचा भाग पाहिला आणि लगोलग तो स्वराज्याला जोड-ण्याचा निश्चय केला त्यानी जावळी जिंकली जावळीतून खाली कोकणात उतरण्याच्या रस्त्यावर एक छोटासाच, नाक वर करून रखवालदाराच्या ऐटीने बसलेला भोरप्याचा डोंगर आहे. राजांनी तो पाहिला आणि लगोलग त्याला त्यानी तटबंदीची

चिलखते चढवली झोकात एक किल्ला उठवून दिला. नाव दिले 'प्रतापगड' पुढच्याच वर्षी हे नाव सार्थ ठरले. या बाळाने आपला प्रताप दाखवून साऱ्याला चकित करून सोडले



प्रतापगडाचे एक दृश्य

पुण्याहून सुमारे एकशेवीस किलोमीटरवर (पच्याहत्तर मैल) महाबळेश्वर आहे तिथून पश्चिमेला सुमारे साडेसतरा किलोमीटर-वर (अकरा मैल) प्रतापगड मुंबईकडूनही प्रतापगडावर जाता येते मुंबईहून महाडला जायचे पुढे महाड–महाबळेश्वर रस्त्यावर वाटेत प्रतापगड लागतो प्रतापगडावर जायला थेटपर्यंत गुळगुळीत डांबरी रस्ता आहे त्यामुळे पोटातले पाणीसुद्धा न हालता आराम-शीरपणाने प्रतापगड पाहून येण्याची सोय झाली आहे.

प्रतापगडाचे नाव इतिहासात गाजले ते अफझलखानाच्या वधामुळे अफझलखानाचा वध हा शिवाजीमहाराजांच्या आयुष्यातला एक महान आणि महत्त्वाचा प्रसंग आहे

अफझलखान विजापूर दरबारातील एक बलाढ्य सरदार. राक्षसासारखा क्रूर पहाडासारखा उंच. जबरदस्त ताकद असलेला.

'शिवाजीला जिवत धरून आणीन वा त्याचे डोके उडवून ते घेऊन विजापूरला परत येईन ' अशी प्रतिज्ञा करून तो शिवाजीवर चालून आला तोफखाना, हत्ती, घोडदळ, पस्तीस हजार फौज एवढी जय्यत तयारी करून आला वाई गाव त्याच्या जहागिरीचा तिथे तो ठाण माडून राहिला येथून शिवाजीच्या नाड्या आव-ळायच्या आणि त्याला पकडायचे असा त्याचा बेत होता शिवाजी-महाराज यावेळी राजगडावर होते. राजगडापासून पुरदरपर्यंतच्या उघड्या प्रदेशात खानाच्या सैन्याबरोबर लढणे महाराजाना कठीण होते महाराज हे पुरतेपणी जाणून होते. शक्तीने निभाव लागत नाही, तेव्हा युक्तीने काम साधता येते. महाराजानी तेच केले. त्यानी खानाची ताकद विभागायचा डाव माडला. त्याला फौजे-पासून अलग करायचा घाट घातला. गनिमीकाव्याने कार्यभाग साधायचे निश्चित केले अशा वेळी महाराजाना आठवला नेमका प्रतापगड नुकताच तो बाधून झाला होता कोरा करकरीत होता. त्यालाच स्वराज्याच्या कामी कौल लावायचे महाराजानी ठरवले

यासाठी महाराजानी किती धूर्तपणे, कुशलतेने पवित्रे घेतले ! स्वत कडे त्यानी कमीपणा घेतला आपण भयभीत झाल्याचा देखावा केला. ' आपण माझ्या वडिलासारखे ' असे म्हणून खानाला मोठेपणा दिला महाराजाच्या या जाळ्यात हळूहळू खान अडकत गेला त्याने महाराजाच्या भेटीसाठी प्रतापगडावर येण्याचे कबूल केले वाईहून निघून महाबळेश्वराची पर्वतराग चढून ती ओलाडा-यची, मग प्रतापगडाच्या पायथ्याशी पोचायचे होते हत्ती, तोफा इत्यादी अवजड युद्धसामग्री खान या डोंगराळ मुलखातून कसा नेणार ? खानाला ती वाईलाच ठेवावी लागली. जेमतेम दहा

हजार फौज बरोबर घेऊन खान प्रतापगडाच्या पायथ्याशी पोहोचला.

पावसाळा सपून गेला होता. मार्गशीर्षाचे दिवस होते. कोयना नदीच्या उघड्या पडलेल्या पात्रातच तंबू आणि राहुट्या ठोकून शिवाजीमहाराजानी खानाच्या दहा हजार फौजेच्या मुक्कामाची सुरेख व्यवस्था लावली त्याच्या रोजच्या खाण्यापिण्याकडे, इतर सुखसोयींकडे जातीने लक्ष दिले. गडाच्या चढणीच्या निम्म्या अतरावर एक टेकडी होती त्या टेकडीच्या माथ्यावर खानाच्या भेटीकरता महाराजानी राजशाही ऐश्वर्याने नटलेला एक खास शामियाना उभा केला. शत्रूला गाफिल ठेवून त्याला आपल्या कबजात आणायचा युद्धशास्त्रातला एक अवघड डाव महाराजानी अगदी बरोबर साधून घेतला होता

याच वेळी त्यानी बचावाचीही पुरेपूर तयारी केली होती. त्यानी प्रतापगडाच्या चढणीच्या सर्व वाटावर मोठमोठी झाडे तोडून आडवी टाकून दिली. दगडधोंड्याच्या राशी उभारून वाटा बद करून टाकल्या एक राजमार्ग तेवढा खुला ठेवला या उघड्या मार्गावरील झाडाझाडाच्या गर्द फाद्यातून त्यानी शस्त्रसज्ज मावळे लपवून ठेवले भेटीच्या तबूपासून गडाच्या मुख्य दरवाजापर्यंतच्या दोनशे मीटरच्या मार्गावर हलकारे, जासूद, चोपदार इत्यादि नाना-मीषानी पाचपाच पावलावर लोक वावरत होते ते सगळे लहान-सहान हत्यारानी सज्ज होते. प्रतापगडाहून बाहेर पडण्यासाठी तीन मार्ग होते नैऋत्येकडचा पारघाटाचा मार्ग त्या घाटाच्या तोंडाशी चार हजार शिपायासह मोरोपत पिंगळे थाबले होते. वायव्येच्या मार्गावर कुडेसर या गावी नेताजी पालकर आपल्या घोडदळाला घेऊन उभा होता; तर महाबळेश्वरी जाण्याच्या

घाटातील अवघड जागी बाबाजी भोसले यांनी आपले मावळे दडवून ठेवून वाट अडवली होती या साऱ्या लोकांना योग्य तो खुणेचा इशारा देण्यासाठी बुरुजावर कर्णेवाले ठेवले होते प्रत्यक्ष भेटीत यश मिळाले तर त्यांनी वेगळा आवाज काढावा अप-यश आले तर वेगळा आवाज द्यावा, असे संकेत ठरवले होते त्या आवाजाबरोबर तोफा उडणार होत्या त्याचेही असेच योग्य तो इशारा देणारे बार व्हायचे होते. थोडक्यात म्हणजे काहीही झाले तरी प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या खानाच्या फौजेतील एक माणूससुद्धा परत माघारी जाता कामा नये, एवढी पक्की व्यूह-रचना महाराजांनी अगदी बेमालूमपणे केली होती.

या साऱ्या तयारीचा परिणाम काय झाला, प्रत्यक्ष भेटीचा निकाल काय लागला, ते महाराष्ट्रातील प्रत्येकालाच ठाऊक आहे. पण या महत्कार्यात प्रतापगडाने मात्र अगदी अद्भुत अशी काम-गिरी बजावली आणि एक लहानसा गडदेखील शत्रूची घमेंड जिरवून यश आपल्या बाजूला कसे खेचून आणतो, हे साऱ्या जगाला दाखवून दिले प्रतापगडावर घडलेली ही एकच ऐतिहासिक घटना ! परंतु तिने प्रतापगडाला इतिहासात मानाचे स्थान मिळवून दिले आहे.

शिवशाहीच्या आणि पुढे पेशवाईच्या काळातसुद्धा प्रताप-गडावर काही इतिहास घडविणाऱ्या, खास उल्लेख करण्यासारख्या अशा घटना घडल्या नाहीत नाही म्हणायला उत्तर पेशवाईत सखारामबापू बोकील या वृद्ध मुत्सद्द्याला आपल्या कैदेतील बरा-चसा काळ प्रतापगडावर काढावा लागल्याचे नमूद आहे

एक गोष्ट मात्र खरी की इतर गडापेक्षा प्रतापगडाचे वैशिष्ट्य काही आगळेच आहे महाराष्ट्राची, छत्रपतींची कुलस्वामिनी



भवानीमंदिराचा परिसर, प्रतापगड

भवानीदेवी हिचे वास्तव्य याच गडावर आहे. या देवीची स्थापना मुद्दाम हौसेने शिवाजी महाराजांनीच गडावर केली. आपली कुलदेवी तुळजाभवानी दूर विजापूर राज्यात असल्यामुळे मनाला वाटेल तेव्हा तिच्या दर्शनास जाणे शक्य होत नसे, याचे महाराजाना वाईट वाटे. तेव्हा देवीनेच दृष्टात देऊन प्रतापगडावर आपली प्रतिमा वसविण्यास महाराजाना सांगितले. मग महाराजांनी मुद्दाम नेपाळपर्यंत माणसे पाठवली. गडकी शिळा आणवून देवीची सुरेख मूर्ती घडवून घेतली. गाभारा, सभामडप, दीपमाळा इत्यादींनी युक्त असे भव्य मंदिर निर्माण केले त्यात देवीची प्राणप्रतिष्ठा केली तिच्या नित्य खर्चासाठी त्यानी भरपूर इनामे करून चोख व्यवस्था लावली. (पुढे राज्याभिषेकाच्या वेळी प्रथम प्रतापगडावर जाऊन महाराजानी देवीची महापूजा बांधली आणि तिला एक सोन्याची छत्री अर्पण केली.)

प्रतापगडाची उंची पायथ्यापासून माथ्यापर्यंत असेल तीनशे साडेतीनशे मीटर घेराने सुद्धा डोंगर तसा लहानसाच आहे पण त्याचे अचूक महत्त्व जाणून शिवाजी राजांनी इ स. १६५६ मध्ये जावळी घेताच तिथे गड उभारण्याचे ठरवले. गड बांधण्याची कामगिरी त्यानी आपले प्रधान मोरोपंत पिंगळे याच्याकडे सोप-



शिवाजी महाराजांचा पुतळा, प्रतापगड

विली ते कुठल्याही अवघड आणि दुर्गम ठिकाणी गड-बांधणीच्या कामात वाकबगार होते. राजगड किल्लाही त्यानीच बांधून दिल ।



अफजल बुरूज

होता. त्यांनी या डोंगरावर सुरेख गड बांधला. सर्व बाजूंनी सुमारे दहा-बारा मीटर उंचीची तटाची भक्कम भिंत उभारली. गडाचे एकुलते एक महाद्वार अशा अवघड जागी दुबेळक्यात बांधले, की जवळ जाईपर्यंत दरवाजा कुठे आणि कसा आहे याचा

पत्ताच लागू नये ! एवढ्याशा जागेतच त्यानी बालेकिल्ल्याची सजावटही केली त्याला बुरुजानी तटबंदी आणि राखीव दरवाजा केला. आत शंभू महादेवाचे देऊळ उभारले आणि त्याच्या समोरच राजाचा राजवाडा बांधून घेतला.

आज आपण प्रतापगड पाहायला गेलो की मोटारीत बसून आपणास थेट गडावर जाता येते. (१९५७ साली भारताचे पतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू प्रतापगडावर आले होते) त्याच्यासाठी हा नवा राजमार्ग तयार झाला त्याच्या आधी दळणवळणाच्या आणि अर्ध्या कच्च्या पायऱ्याच्या वेड्यावाकड्या मार्गानेच गड चढावा लागे. पण तसा गड चढतानाच खरी मजा येई अफझल-खानाची पालखी याच वाटेने वर गेली ती खाली परतली मात्र नाही ! ती ऐतिहासिक पायवाट आता या नव्या राजमार्गामुळे पार बुजून गेली आहे गडावरची तटबंदी शाबूत आहे पण इतर वाडे वगैरे केव्हाच जमीनदोस्त झाले आहेत बाल्लेकिल्ल्यातील राज-वाड्याच्या जागी आता सुंदर फुलानी नटलेले शोभिवंत उद्यान बहरले आहे त्यात मध्यभागी चौथऱ्यावर शिवाजी महाराजांची भव्य अश्वारूढ प्रतिमा स्थापन केलेली आहे. याच प्रतिमेच्या अनावरणाकरिता पंडित जवाहरलाल नेहरू गडावर आले होते भवानीदेवीच्या मंदिरातही आता विजेची सोय झाली आहे त्यामुळे देवीचे प्रसन्न दर्शन केव्हाही घडू शकते)

[illegible] पडला, तेथच त्याची कबर बांधण्यात आली आहे ही कबरही शिवाजी[illegible]

खर्चाची व्यवस्थाही त्यांनी लावून दिली आहे मुसलमान बांधवांनी भरपूर देणग्या दिल्यामुळे आज तर या कबरीची अतिशय उत्कृष्ट निगा राखण्यात येते जिकडे तिकडे संगमरवरी फरसबंदी केली



अफझलखानाची कबर, प्रतापगड

आहे छताला हंड्या-झुंबरे लटकलेली आहेत. रेशमी मखमली गलेफांनी आच्छादिलेल्या, फुलांच्या माळांनी सजविलेल्या दोन भव्य कबरी आहेत. (अफझलखान आणि त्याचा शरीररक्षक सय्यद बंडा याच्या या कबरी आहेत.


आज प्रतापगडावर पाहाण्यासारखी अशी ही एवढीच ठिकाणे राहिली आहेत. त्यामुळे तासाभरात तटावरून फिरत फिरत प्रदक्षिणा पुरी होते. पण तटावरून सभोवतालचा देखावा मोठा आकर्षक आणि स्फूर्तिदायक दिसतो. (तीनशे वर्षांपूर्वीची ती ठिकाणे, त्या त्या वेळी घडलेले प्रसंग मनासमोर उभे करतात; आणि शिवरायाचे चातुर्य, त्याची मुत्सद्देगिरी, त्याची धूर्तता, त्यांचा पराक्रम, हे सारे ठसठशीतपणे प्रत्ययास आणतात.)

□ □

# ४ : किल्ले पुरंदर संभाजी राजांचे जन्मस्थान

पुरंदर हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा किल्ला आहे हा किल्ला खूप जुना आहे. जुना म्हणजे अगदी यादवाच्याही पूर्वीचा.

पुण्यातून सासवडला जायचे. सासवडपासून गडाचा पायथा सुमारे अकरा किलोमीटर (म्हणजे सात मैल) आहे पुणे ते पुरंदर हे अतर सुमारे चाळीस किलोमीटर (म्हणजे पचवीस मैल) आहे पंचविसाव्या मैलावर पुणे-पुरंदर रस्ता सपतो आणि गडाचा चढाव सुरू होतो. सासवडहून पुरदरकडे जाताना वाटेत




दुरून दिसणारा पुरदर

सोजीरवड आणि तेलिणीचा माळ ही ऐतिहासिक स्थळे लागतात दिलेरखानाशी झालेल्या युद्धात मुरारबाजी पडला तो तेलिणीच्या माळावर


गडाच्या पायथ्याशी पूर गाव आहे. या पूर गावाजवळ बना-तील नारायणेश्वराचे मदिर आहे. या मदिरात चागदेवकालीन शिलालेख आहेत. या मदिराभोवती पूर्वी निरनिराळ्या वृक्षानी

गजबजलेले वन होते त्यामुळे याला नाव पडले बनातील नारायण.



बनातील नारायणेश्वर मदिर, पूर पुरंदर

पूर गावातून पुरदरला जाण्यासाठी दोन रस्ते आहेत. एक पूर गावातून गेलेला पूर्वीचा मार्ग आणि दुसरा इग्रजानी तयार केलेला राजमार्ग या राजमार्गाने गेलो की आपण माचीच्या महाद्वारात येऊन पोहोचतो



माचीचे महाद्वार, पुरदर

हा दरवाजा मोठा आहे पेशवाईच्या काळात माचीला एकंदर पाच दरवाजे होते त्यातला आज फक्त हा एकच दरवाजा शिल्लक आहे

माचीच्या पूर्व आणि पश्चिम टोकाना उत्कृष्ट चिरेबदी तलाव आहेत पूर्वेचा जो तलाव आहे, त्याचे नाव राजाळ तलाव आणि पश्चिमेस जो आहे त्याचे नाव पद्मावती तलाव या पद्मावती तलावापाशी पूर्वी पद्मावतीचे मदिर होते असे म्हणतात आज हे मदिर दिसत नाही पद्मावती तलाव आणि राजाळ तलाव हे दोन्ही तलाव शिवाजी महाराजानी बाधले.

माचीवर पुरदरेश्वराचे स्थान आहे शिवाजी महाराजानी गड आपल्या ताब्यात घेतल्यावर श्रीपुरदरेश्वर आणि श्रीकेदारेश्वर या जागृत देवस्थानाच्या पूजा, नैवेद्य, नदादीप, श्रावणमासाचा अभिषेक आणि महानैवेद्य याची व्यवस्था करून दिली.


माचीकडून भैरवखिडीकडे जाताना रस्त्याजवळ नरवीर मुरारबाजी याची स्मृती जागृत ठेवण्यासाठी त्याचा आवेशपूर्ण पुतळा नुकताच बसविला आहे

माची पाहून झाली की पुरदरेश्वराजवळून बालेकिल्ल्यावर जायला रस्ता आहे बालेकिल्ल्यात प्रवेश करताना प्रथम एक लहानसा चढाव चढून जावा लागतो हा चढाव सपला की मग खडकात खोदलेल्या काही पायऱ्या लागतात त्यापुढे लाब-रुद घडीव दगडाच्या पधरा वीस पायऱ्या आहेत ही वाट नागमोडी आहे वाटेची उत्तर बाजू तटबदीने सुसज्ज आहे येथून माचीवर मारा करता येतो दरवाज्याजवळ तटाची उची जास्त आहे. आपण दरवाजाच्या अगदी जवळ जाईपर्यंत दरवाजा दिसत नाही याचे नाव सरदरवाजा. सरदरवाजाकडे जाण्यासाठी वाट

थोडीशी वळते, तिथे तटाखाली एका कोनाड्यात महाराची देवी लक्ष्मीआई ठाण माडून बसली आहे

सरदरवाजातून प्रवेश करताच एक निमुळती टेकडी लागते. हिचे नाव कदकडा टेकडी या टेकडीच्या टोकावर भव्य बुरुज आहे. या बुरुजावर उभे राहून ईशान्येकडे दृष्टी वळवली की दिसतो पुरंदरचा भाऊ वज्रगड

सरदरवाजाच्या पुढे एक जोडदरवाजा आहे. त्याचे नाव बिनीदरवाजा बिनीदरवाज्यापासून पश्चिमेस निघाले की प्रथम लागतो तो वावटा बुरुज (निशाणी बुरुज) या बुरुजावर



शेंद्र्याबुरुज, पुरंदर

कल्ल्याचे निशाण असे येथे तीन्-चार तोफा ठेवण्याची व्यवस्था आहे. यानंतर महरवाचा बुरुज लागतो तो शेंड्या, शेंदरी किंवा शेंद्र्या बुरुज.

यानतर लागतो तो हत्ती बुरुज. याचा आकार हत्तीच्या डोक्यासारखा आहे म्हणूनच याला हत्ती बुरुज हे नाव पडले. यापुढचा कोकण्या बुरुज या कोकण्या बुरुजाला एक चिरेबंद खोली

आहे. या खोलीचा उपयोग बंदिवान ठेवण्यासाठी होई या बुरुजा-वरून निसर्गसौंदर्य फारच छान दिसते. हत्ती बुरुज आणि कोकण्या-बुरुज येथून सिंहगड, राजगड आणि रोहिडा हे गड दिसतात कोकण्या बुरुजाच्या पुढे शेवटचा बुरुज लागतो तो फत्ते बुरुज. गडावर शत्रूचे चोरटे हल्ले होत ते दक्षिण बाजूने. निर्वाणीचा हल्ला झाला तर तो याच बाजूने होई. तसेच शत्रूने गडाला वेढा दिल्यावर गडावर रसद आणली जायची ती याच मार्गाने त्यामुळे हा बुरुज फार महत्त्वाचा होता

फत्ते बुरुजाच्या समोरच बोरसुसर नावाचे टाके आहे या टाक्या-तील पाणी जिवत आहे तसेच ते सिंहगडावरील देवटाक्यासारखे चवदार आणि गुणकारी आहे.

फत्ते बुरुज सोडून पुढे जाताच गडाचा दक्षिण दरवाजा लागतो. या दरवाजासमोरच केदार टेकडी आहे तिच्या वर केदारेश्वराचे देवालय आहे त्यामुळे या दरवाजाला केदार दरवाजा असे म्हण-तात या दरवाजाच्या समोरच मोठी माची दिसते पूर्वी या माचीवर वस्ती होती वेळप्रसंगी गडावर चोरट्या मार्गाने रसद यायची ती केदार दरवाज्यातून तसेच पळून जाण्याची वेळ आली तर याच दरवाजातुन पळून जायचे मिर्झाराजा जय-सिंगाच्या स्वारीच्या वेळी गडावरील कबिले हलविण्यात आले ते याच दरवाज्यातून आणि वेढा देणाऱ्या सैन्याच्या डोळ्यात धूळ फेकून गडाला रसद पुरविण्यात आली तीही येथूनच


या दरवाज्यातून पुढे गेले की समोर दिसते ती केदार टेकडी. चालत पुढे जात असता वाटेत म्हसोबा दिसतो या म्हसोबाजवळच एक पाण्याचे टाके आहे त्याचे नावही म्हसोबाचे टाके. हे टाके पुढच्या बाजूने सीमेंटने बांधून काढले आहे. टाक्याच्या मागच्या

बाजूला कोरलेल्या खोल्या आहेत. याचा उपयोग कैदी ठेवण्यासाठी होत असे खोलीपुढे टाके असल्याने कैद्याला पहारेकऱ्याचा डोळा चुकवून जाता येत नसे.

पाण्याची टाकी सगळ्याच गडावर असतात, पण पुरंदरवर तेला-तुपाची टाकीसुद्धा आहेत. केदारकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेस एकमेकास लागून असणारी दोन टाकी दिसतात यामधील जे मोठे टाके आहे, त्यात तेलाचा साठा केला जात असे तर लहान टाक्यात तुपाचा !

या टाक्याच्या समोर, म्हसोबाच्या टाक्याच्यावर एक दगडी इमारत दृष्टीस पडते ही पूर्वीची दारूगोळ्याची कोठी दारू-गोळ्यावर तर गडाच्या सरक्षणाचा भार. तेव्हा काही झाले तरी आतील दारूगोळ्यास इजा पोहोचू नये म्हणून दारूगोळ्याची कोठी अगदी काळजीपूर्वक बांधलेली. त्यामुळे इतकी वर्षे झाली तरी ती अद्याप टिकून आहे याच्या आसपास दोन–चारशे पावलात कोणतीच इमारत नाही, ही कोठीसुद्धा अशा ठिकाणी आहे की त्यावर कोठूनच मारा होऊ नये चार हजार मोठे दगडी कुलपी गोळे, बावीस-तेवीस खडी दारू, पाच खडी शिसे गडावर सदैव तयार असे

म्हसोबाच्या टाक्यापासून केदार टेकडीचा चढाव सुरू होतो. टेकडीच्या माथ्यावर केदारेश्वराचे मंदिर आहे. केदारेश्वराचे देऊळ साध्या बांधणीचे पण मजबूत आहे हे देऊळ महादाजी पुरंदरे यानी बांधले. केदारलिंगावर पूर्वीच्या राजवटीत उत्कृष्ट देऊळ नसावे. शिवाजी महाराजानी श्रीकेदारेश्वराची नित्य पूजा, नैवेद्य, नंदादीप आणि श्रावण मासाचा अभिषेक ही व्यवस्था लावून दिली. आजही ही व्यवस्था चालू आहे महाशिवरात्रीस येथे यात्रा भरते



श्रीकेदारेश्वर मंदिर,
पुरंदर

बालेकिल्ल्याचे दोन भाग आहेत. हे भाग जसे एकमेकाना लागून आहेत तसे ते एकमेकापासून वेगळे आहेत यापैकी एका भागात अपाय झाला की त्याची झळ दुसऱ्यास लागते पण या रचनेमुळे दोन फायदे होतात. एक म्हणजे शत्रूला अडथळा होतो आणि दुसरा म्हणजे स्वसरक्षणासाठी वेळ मिळतो. बालेकिल्ल्याचा तट संपला तरी तटाच्या आत सपाट भाग नाही टेकड्या आहेत. त्यामुळे तटाच्या आत शत्रू आला तरी त्याचा प्रतिकार करता येणे शक्य होते.

बालेकिल्ल्यावर महत्त्वाच्या तीन टेकड्या आहेत. एक कद-कडा टेकडी, दुसरी राजगादी आणि तिसरी केदार टेकडी.

राजगादी ही केदारेश्वराच्या टेकडीपेक्षा अगदी थोडीशीच उच्च आहे या राजगादीवरच शिवाजी महाराजाचा वाडा होता शाहू महाराजानी सुरुवातीच्या काळात पुरदरवरून कारभार केला. त्या वेळी हा वाडा होता पुढे केव्हा तरी तो पडला पेशवाईत मात्र एकही इमारत येथे बाधली गेली नाही राजगादीचा माथा

केदारापेक्षा सुमारे साठ सेंटिमीटर्स (म्हणजे एक दोन फूट) उंच आहे. अशा स्थितीत तेथे इमारत बांधणे हा केदारेश्वराचा अपमान होतो. म्हणून त्याने एकही इमारत राजगादीवर टिकू दिली नाही, असा लोकांचा समज आहे.

पुरंदरचा शेजारी वज्रगड ! पुरंदर आणि वज्रगड यामध्ये फक्त सुमारे अर्धा ते पाऊण मीटरची (म्हणजे दोन तीन फर्लांगाची) एक खिंड आहे. पुरंदर म्हणजे इंद्र. इंद्राच्या हातातील



वज्रगड किंवा रुद्रमाळ

वज्र म्हणून याचे नाव वज्रगड पडले असावे. तसेच गडावर रुद्रेश्वर नावाचे शिवालय होते. त्यावरून रुद्रमाळ हे नाव पडले असावे. या डोंगरावर गड बांधण्याची कल्पना निजामाच्या काळात जन्माला आली आणि ती निजामाच्या काळातच पूर्ण झाली असावी.

पुरंदरच्या आग्नेयेस सुमारे अडीच किलोमीटरवर (म्हणजे सुमारे दीड मैलावर) वुधला नावाची एक टेकडी आहे. हा बहुधा गडाचा भाग असावा. याचा टेहळणीसाठी उपयोग होत असे. गडावरील नाजुक ठिकाणी येथून मारा होत असे. एका इंग्रज अधिकाऱ्याने ही गोष्ट ओळखून गड ताब्यात घेताना प्रथम ही

टेकडी ताब्यात घेतली येथून दारूगोळ्याच्या कोठारावर मारा केला आणि गड जिंकला.

पुरदरला फक्त मराठेशाहीतच महत्त्व नव्हते, तर मुसलमानाच्या काळात आणि त्यापूर्वीच्या काळातही पुरदरला महत्त्व होते. या गडाने बहमनी राज्य, निजामशाही, आदिलशाही आणि मोगलाई या चारही पातशाह्यांची सेवा केली. पधराव्या शतकाच्या अखेरीस किल्ला निजामशाहीच्या ताब्यात गेला सुमारे शभर वर्षे तो त्याच्या ताब्यात होता. शहाजीला पुणे आणि सुपे प्रांताची जहागीर मिळाली, त्यावेळी पुरदर त्याच्या ताब्यात आला. पण त्याचा कारभार मात्र निजामी सरकारकडेच होता. महादाजी नीलकठराव नावाचा कर्तबगार माणूस गडाचा कारभार पाही. शिवाजीराजानी फत्तेखानाशी पुरदरवरूनच मुकाबला केला आणि त्याचा पराभव करून सासवड–बेलसरपर्यंत त्याचा पाठलाग केला.

सुरुवातीचे काही दिवस महाराजानी पुरदरवरूनच कारभार केला त्यानी नेताजी पालकरला गडाचा किल्लेदार, तसेच स्वराज्याचा सरनौबतही बनवले. शिवाजी महाराज आपल्या कुटुबासह येथे राहत होते सभाजीचा जन्म येथेच झाला महाराज जावळीवर चालून गेले ते पुरदरावरूनच शाहिस्तेखान स्वराज्यावर चालून आला, त्यावेळी पहिल्यादा तो पुरदरच्या रोखाने आला होता पण त्याचा पराभव होऊन तो परत गेला नतरच्या पुण्याच्या दोन-अडीच वर्षांच्या मुक्कामात परत त्याने पुरदरचे नाव म्हणून काढले नाही

मिर्झा राजा जयसिगाने स्वराज्यावर स्वारी केली प्रथम पुरदरच्या रोखाने तो आला. दिलेरखानाने पुरदरला वेढा दिला पधरा दिवसांत त्याने रुद्रमाळ उर्फ वज्रगड जिंकला तेथून त्यान

माचीवर हल्ला केला आणि पुरंदरची माची ताब्यात घेतली. आता दिलेरखान अगदी गळयाशी आला होता त्याला मागे रेटणे आवश्यक होते. गडावर मुरारबाजी नावाचा सरदार होता. त्यानें निवडक सातशे लोक घेतले आणि दिलेरखानावर हल्ला केला. मुरारबाजीने त्याला मागे रेटत रेटत तेलिणीच्या माळा-पर्यंत नेले तेथे जगी लढाई झाली आणि तीत मुरारबाजी दिलेरखानाच्या हातून मारला गेला. शिवाजी महाराजानी आपली ताकद ओळखून मिर्झा राजा जयसिंगाशी तह केला, तेवीस किल्ले मोगलाना दिले आणि बारा किल्ले स्वत कडे ठेवले मोगलाना दिलेल्या तेवीस किल्ल्यात पुरदर मोगलाकडे गेला

शिवाजी महाराज आग्रा येथून सुटले आणि महाराष्ट्रात परत आले. त्यानी आपला गेलेला मुलूख परत घेण्याचा सपाटा लावला. तानाजीने सिंहगड घेऊन या मोहिमेचा आरभ केला सिंहगड घेतल्यानतर एका महिन्याच्या आतच तानाजीचा भाऊ सूर्याजी मालुसरे याने पुरदर जिकून स्वराज्यात आणला

१७७८ मध्ये पेशवे आणि इग्रज सरकारमध्ये पहिली लढाई झाली या लढाईची समाप्ती पुरदरच्या तहाने झाली हा तह पुरदर येथे पेशव्यातर्फे सखारामबापू व नाना फडणीस आणि इग्रजातर्फे कर्नल अॅप्टन याच्यामध्ये झाला नाना फडणीस कारभारी झाल्यावर त्यानी राजधानी पुरदरहून हलवून पुण्याला नेली. इ स १८१७ मध्ये इग्रजानी पुरदर घेतला १८१७ च्या अखेरीस तो परत पेशव्याकडे आला. पण तो पेशव्याकडे फार वेळ राहू शकला नाही. १८१८ च्या आरभी इग्रजातर्फे कर्नल एल्ड्रिजने तो जिकून घेतला. १९४७ साली भारत स्वतत्र झाला आणि पुरदरवर स्वतत्र भारताचा झेंडा फडकला


# ५ : राजगड शिवरायांची पहिली राजधानी

तीनशे वर्षांपूर्वी रायगडावर छत्रपती शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक झाला तेव्हापासून रायगड ही 'स्वराज्याची राजधानी' बनली. पण स्वराज्यस्थापनेच्या पूर्वीच्या उद्योगात राजगडाला वेगळे महत्त्व होते. या काळात महाराज राजगडावर राहात तेथेच स्वराज्याच्या मसलती होत. महत्त्वाची खलबते होत मोहिमा आखल्या जात

राजगड हा पुणे जिल्ह्यात भोर तालुक्यात आहे. राजगडाला जाण्यासाठी चार-पाच मार्ग आहेत. पुण्याकडून नसरापूर-वेल्हे रस्त्याने राजगडाला जाता येते पुण्याहून रोज दोन-तीन एस टी च्या गाड्या सुटतात एस. टी. ने मार्गासनी गावाजवळ उतरून गुंजवणे या गावाकडे जायचे. गुंजवण्याच्या दक्षिणेस सुमारे दीड किलोमीटरवर (एक मैलावर) गडाचा पायथा लागतो. या बाजूने गडाचा अर्धाअधिक भाग चढून गेलो की थोडी कठीण वाट लागते. सुमारे साडेसात मीटर (म्हणजे सुमारे पचवीस फूट) उचीचा कडा खोदून अगदी लहान लहान पायऱ्या (खोबणी) तयार केलेल्या आहेत. हा अवघड भाग संपला की काही घडीव दगडांच्या पायऱ्या लागतात. त्या संपल्यावर 'गुंजवणे दरवाजा' लागतो. यानंतर आणखी दोन दरवाजे ओलांडले की आपण 'पद्मावती माची' वर पोहोचतो.

हा झाला एक मार्ग. याशिवाय एक महत्त्वाचा मार्ग पाली या गावाकडून आहे. या मार्गाने जाण्यासाठी एस टी. ने जाऊन पाब गावाजवळ उतरावे. तेथून वाजेघर, पिंप्री, पाली असे करीत

करीत या वाटेपाशी यावे पाली हे गाव गडाच्या पायथ्याशी आहे. येथून आपण गड चढून 'पाली दरवाजा'पाशी येतो



पाली दरवाजा, राजगड

पाली दरवाजा -म्हणजे गडाचा राजदरवाजा. जवळ जवळ अर्ध्या डोंगर-चढणीपासूनच या दरवाजापर्यंत भरपूर लांबरुंद आणि प्रशस्त अशा चिरेबंदी पायऱ्या मुद्दाम बांधविलेल्या आहेत. त्या चढून वर आले की गडाचे भव्य प्रवेशद्वार आहे. घोडे, हत्ती, पालख्या, मेणे या सर्वांना सुखाने येता येईल अशी ही सुरेख वाट आहे हा पूर्वापारचा राजमार्ग. या दरवाजाने आत आले की पद्मावती माचीवर खास महाराजाच्या उपयोगाच्या अनेक इमारती आहेत या इमारती मोरोपंतांनी बांधल्या. महाराजाचा राजवाडा, सदरेची जागा, दिवाणघर, अंबरखाना, पागा अशा या मुख्य

इमारती। महाराजाचा सारा वावर याच माचीवर असे. पाण्याचा खजिनाच असलेला 'पद्मावती तलाव'ही येथे बांधून काढला आहे

गडाच्या इतर भागात नगारखाना, तोफखाना, शिलेखाना असे विभाग आहेत कारभाऱ्यांच्या राहाण्याच्या जागा, गणेश, मारुती, जननी (भवानी), रामेश्वर इत्यादी देवतांची मंदिरे, सदर, कचेऱ्या, दुकाने असलेली बाजारपेठ, अशा अनेक इमारतींनी हा गड त्या काळी गजबजून गेला होता. मऱ्हाटी बाण्याचे, मराठमोळे वैभव तेथे दिमाखाने मिरवत होते. सह्याद्रीच्या डोंगरी राज्यासाठी जशी हवी होती तशीच ही राजधानी सजली होती



बालेकिल्ल्याचे प्रवेशद्वार, राजगड

पण राजगडाची खरी मिजास म्हणजे त्याचा बालेकिल्ला. तिन्ही माच्यांच्या मध्यभागी आठशे मीटर्स लांबी रुंदीचा, म्हणजे अर्धा मैल लांबी–रुंदीचा हा डोंगर एखाद्या सोंगटीसारखा ठेवला गेला सगळ्या बाजू उभ्या भिंतीसारख्या जणू तासून काढलेल्या! मोरोपंतांनी या भिंतीलाच खवाटे खोदून वर जायला शिडीसारखी वाट केली आहे खाली खोल दरी आणि समोर कड्याची उभी




बालेकिल्ला,राजगड

भित, अशा विलक्षण अवघड जगी ही वाट आहे जिवावरचे साहस करून ती वर चढून गेले की पताची खरी कमाल दृष्टीस पडते दोन्ही बाजूना अष्टकोनी बुरुज असलेले भव्य प्रवेशद्वार आपणाला बालेकिल्ल्यात नेऊन सोडते या एवढचाशा पाऊण



बाले किल्यातील जलाशय, राजगड

किलो मीटरच्या (म्हणजे अर्ध्या मैलभराच्या) आवारात खालच्या किल्ल्यातील महत्त्वाच्या सर्व गोष्टींची आवृत्ती मुद्दाम तयार केली होती. राजवाडे, कचेरीच्या जागा, कारभाऱ्याचे वाडे, बाजारपेठ, पाण्याचे तळे हे सारे त्या दुर्गम ठिकाणी कसे बाधून काढले असेल, याचे आश्चर्य करावे तितके थोडेच ! जणू काही मयासुराची करणी!



शिवाजी महाराजांची सदर १९४८ च्या पूर्वीची स्थिती आता मात्र हा भाग साफ पडला आहे

बालेकिल्ला समुद्रसपाटीपासून चौदाशे मीटर ( म्हणजे पचेचाळीसशे चौदा फूट ) उंच आहे त्यामुळे येथून भोवतालचा वराच प्रदेश दृष्टीस पडतो एका बाजूला सिंहगड, खडकवासले व फार लांबवर पुणे, पुरंदर दिसतात; तर दुसऱ्या बाजूने भाटघर, रायरेश्वराचा डोंगर ही स्थाने दिसतात .पश्चिमेस एका बाजूने रायगड तर, तर दुसऱ्या बाजूने महाबळेश्वराच्या नैऋत्येला असलेला मकरंदगडापर्यंतचा प्रदेश दृष्टिपथात येतो

खरोखर राजगडासारखा राजगडच ! मऱ्हाटी राज्याच्या राजधानीचा मान वीस वर्षे त्याने भूषविला तुळशीदास शाहिराने ' राजगड राजाचा ' अशीच तारीफ आपल्या कवनातून केली आहे. महाराजानी स्वराज्याचा उद्योग आरंभिला तो आता दिवसेंदिवस वाढत जाणार होता. स्वराज्याची जोपासना दक्षतेने करण्याची

गरज होती. त्यासाठी शिवाजीराजानी पुण्याचा लाल महाल सोडला आणि ते राजगडावर आले. कानद खोऱ्यातल्या मराठमोळ्या बायका तर जात्यावर दळताना म्हणू लागल्या, 'पुणे झाले जुने, त्याचे कौतुक आता पुरे ! आता महत्त्व आहे राजगडाचे, तोरण्याचे ! सोन्याच्या वैभवाने गड नटलेला आहे '

-पुन झाल जुन, गाऊ भोर त्या भरन्याला ।
सोनियाची ग पायरी राजगड तोरन्याला ।।

राजगड किल्ल्यावर इतिहासातील अनेक गोष्टी घडलेल्या आहेत

रायरेश्वराच्या मदिरात शिवाजी आणि त्याचे सवगडी यानी नवे हिंदवी स्वराज्य उभारण्याची शपथ घेतली त्यानतर त्यानी आदिलशहाच्या ताब्यात असलेला तोरणा किल्ला घेतला तोरणा हातीं येताच त्याच्या डागडुजीच्या कामाला सुरुवात झाली नवीन इमारतीच्या पायासाठी जमीन खणण्याचे काम सुरू झाले हातभर खोल खड्डा खणून झाला असता खणकन् आवाज होऊन पहार थाबली बघतात तो तोंड बद करून पुरलेला हडा ! जरा इकडे तिकडे खणले तर आणखीही दोन घागरी तशाच तोड बद करून दडविलेल्या मिळाल्या साऱ्याची तोंडे उघडली आत लखलखीत सोन्याच्या मोहोरा काठोकाठ भरलेल्या आढळल्या ! या धनातून आणखी एक किल्ला उभारण्याचे शिवरायाने ठरविले

तोरण्याच्या समोरच दक्षिणेला एक उच सुळक्याचा डोंगर होता त्याला मुरुबदेवाचा डोंगर म्हणत देखणा डोंगर. येथे नव्या गडाची उभारणी करावी, असे शिवरायाच्या मनात आले तोरण्याला मिळालेल्या धनातून मुरुबदेवाच्या डोंगराला तटाची चिलखते बाधायचे ठरले. किल्ल्याच्या बांधणीचे काम मोरोपत

पिंगळे याच्या देखरेखीखाली चालले हा डोंगर त्रिकोणी आकाराचा आहे मध्यभागापासून तिन्ही बाजूंना त्याला हत्तीच्या सोंडेसारखे लांबलचक फाटे फुटले आहेत. प्रत्येक फाट्याला माची म्हणतात. सुवेळा माची, सजीवनी माची आणि पद्मावती माची



सुवेळा माची, राजगड

अशी तीन वेगवेगळी नावे या फाट्याना आहेत येथे कायम वस्ती करून राहण्याची महाराजांची इच्छा आहे, असे मोरोपंताना समजले, तेव्हा मोरोपंतानी गडाची बांधणी जास्त लक्ष घालून विशेष भक्कम आणि अधिक डौलदार केली. सर्वच माच्याना उंच आणि रुंद तटबंदी करण्यात आली आणि कोठे कोठे तर चिलखत म्हणजे दुहेरी तटाची उभारणी करण्यात आली गडावर येण्यासाठी दोन मुख्य दरवाजे ठेवण्यात आले त्यापैकी मुख्य दरवाजा पद्मावती माचीच्या पश्चिमेचा. त्याचे नाव पाली दरवाजा दुसरा दरवाजा पद्मावती माची आणि आणि सुवेळा माची याच्या



देवणे प्रवेशद्वार, राजगड

मधोमध, पूर्व बाजूला ठवण्यात आला दोन्ही दरवाजे दुहेरी आहेत.

राजगडच्या पायथ्याशी जिजाबाईंनी शिवापट्टण हे गाव वसविले. सन १६५६ च्या दसऱ्याला शिवाजी आणि जिजाबाई यानी राजगडाच्या पायथ्याशी शिवापट्टण येथे सीमोल्लघनाचा मोठा समारंभ केला ठिकठिकाणच्या सरदाराना आणि लोकाना एकत्र आणले मोठा माडव घातला सर्वांच्या भोजनाची [illegible] केली. कुस्त्या, वाड्याचे खेळ, असे अनेक प्रकार या प्रसगी झाले शमीपूजनानतर सोने वाटण्यात आले या निमित्ताने लष्कराची उभारणी केली मुख्य प्रधान म्हणून शामराज नीळकठ राझेकर आणि सरनौबत ( सेनापती ) म्हणून नेताजी पालकर याच्या नेमणुका करण्यात आल्या. अशा प्रकारे राजगड राजधानी होऊन

तेथून स्वराज्याच्या हालचाली जोरात सुरू झाल्या

(खाफीखान म्हणतो, 'शिवाजी राजगडावर ताब्याचे पैसे व सोन्याचे होन ही नाणी पाडतो' यावरून राजगडावर शिवाजी आपल्या नावाची नाणी पाडू लागला होता असे दिसते.)

जयसिंग आणि दिलेरखान हे महाराष्ट्रात आले तेव्हा त्याच्या सैन्यापैकी दाऊदखान आणि रायसिंग याच्या देखरेखीखालील सैन्याने राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचून किल्ल्यावर चढाई सुरू केली राजगडावरून शिवाजीमहाराजाच्या मावळ्यानी तोफा, बदुका आणि बाण याचा जोराचा मारा केला. राजगड किल्ला कठीण आहे, हे लक्षात आले मग मोगल सैन्याने आपला मोर्चा सिंहगडाकडे वळविला

जयसिंग आणि शिवाजी राजे याचा तह झाल्यानतर शिवाजीने तेवीस किल्ले जयसिंगाच्या स्वाधीन केले आणि बारा किल्ले स्वत कडे ठेवले, त्यात राजगड शिवाजीने स्वत कडे ठेवला

सुमारे वीस ते बावीस वर्षे राजगड ही स्वराज्याची राजधानी होती त्यामुळे शिवाजीचा मुक्काम राजगडावर वारंवार असे शिवाजी महाराजाच्या कौटुबिक जीवनातील अनेक घटना राजगडावर घडल्या आहेत राजाराम महाराजाचा जन्म दि २४ फेब्रुवारी १६७० रोजी राजगडावरच झाला

आग्र्याहून सुटून शिवाजीमहाराज महाराष्ट्रात परत आले वाटेत छोटचा सभाजीला मथुरेस कृष्णाजी विश्वासराव याच्याकडे ठेवले होते पुढे कृष्णाजी विश्वासराव आणि त्याचे दोन बधू सभाजीला घेऊन राजगडावर परत आले सभाजीला सुखरूप परत आणल्याबद्दल राजगडावरच शिवाजी महाराजानी त्या विश्वासू माणसाचा सत्कार केला

संभाजी महाराजाच्या वधानंतर राजगड औरंगजेबाने जिंकून घेतला पण लवकरच रामचंद्रपंत अमात्यांनी तो परत घेतला.

राजाराम महाराज जिंजीहून महाराष्ट्रात परत आले ते राजगडालाच राजगडावरूनच त्यांनी मोगलांच्या विरुद्ध जोराच्या हालचाली सुरू केल्या

पुढे दिनांक १६ फेब्रुवारी १७०४ रोजी मोगलांनी राजगड परत जिंकला; तेव्हा 'राजगडावर किल्लेदार म्हणून जाण्यास कोण तयार आहे ?' असे औरंगजेबाने आपल्या सरदारास विचारले राजगडाचा कठीणपणा लक्षात घेऊन सर्वांनी तेथील किल्लेदारी पत्करण्यास नकार दिला. शेवटी इरादतखान नावाचा सरदार कसाबसा तयार झाला औरंगजेबाने त्याला दोनशे मोहरा, दोन घोडे, वाहण्यासाठी दोनशे बैल लागतील एवढे धान्य देऊन राजगडाला पाठविले तोही फार दिवस राजगडावर टिकू शकला नाही

अशा प्रकारे राजगड किल्ल्याला शिवशाहीत मोठे महत्त्व होते शिवरायाच्या आयुष्यातील अनेक प्रसंग या किल्ल्यावर घडले शाहूच्या काळापासून नंतरच्या काळात राजगडाचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत गेले तथापि राजगड हा किल्ला शत्रूच्या ताब्यात फार काळ राहू शकला नाही इंग्रजांच्या काळातही तो भोरच्या संस्थानिकाच्या ताब्यात होता शिवकाळात राजगडावर बंदोबस्तासाठी साडेसातशे लोक असत, पण किल्ल्याचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत होते भोरकराच्या ताब्यात राजगड असताना सारी अकरा माणसे तेथे पोट भरण्यासाठी राहात ! काळाचा महिमा असा असतो !

□ □

# ६ : पन्हाळा सिद्दीच्या हातावर तुरी

महाराष्ट्राच्या इतिहासात 'मानाचे पान' असलेला किल्ला म्हणजे पन्हाळा! पन्हाळा कोल्हापूर जिल्ह्यात कोल्हापूरच्या वायव्येस सुमारे एकवीस किलोमीटर्सवर (म्हणजे तेरा मैलावर) आहे. एस टी, मोटार, बैलगाडी, टांगा ही सर्व वाहने ज्यावर जाऊ शकतात असा हा दक्षिण महाराष्ट्रातला एकच डोंगरी किल्ला आहे. थंड हवेचे रमणीय ठिकाण म्हणून पन्हाळा प्रसिद्ध आहे.

पायथ्यापासून गडावर येण्यास तीन मार्ग आहेत. पूर्वेच्या बाजूने चार दरवाजा, पश्चिमेकडून तीन दरवाजा आणि उत्तरेकडून बाघ दरवाजा. यापैकी चार दरवाजा हा फार महत्त्वाचा दरवाजा होता इंग्रजानी बंड मोडण्याच्या निमित्ताने तो पाडून टाकला.


पन्हाळ्याच्या एस टी. बस स्टेशनपासून जवळच मोरोपंत ग्रंथालयाची इमारत आहे. याच ठिकाणी मराठी काव्याला 'आर्या' या पद्यप्रकाराची संपन्न देणगी देणाऱ्या कवी मोरोपंतांचा जन्म झाला या ग्रंथालयात आपल्याला मोरोपंताचे हस्ताक्षर पहावयास मिळते शेजारीच 'कापूरबाव' आहे येथील पाणी पन्हाळ्या-वरील लोकांना पुरविले जाते

यानंतर आपण महालक्ष्मीच्या मंदिराकडे येतो. महालक्ष्मी हे शिलाहार राजाचे कुलदैवत शिवाजी महाराज पहिल्यांदा जेव्हा पन्हाळ्यावर आले, तेव्हा अगोदर त्यानी दर्शन घेतले ते या देवीचेच! या मंदिराशेजारीच ही संध्याबाग. पूर्वी येथे विद्वान मंडळी सकाळ-सायंकाळ संध्या करीत.

यानंतर दिसतो ताराबाईंचा राजवाडा. महाराणी ताराबाईंनी

हा वाडा इ. स. १७०८ मध्ये बांधला. या वाड्यातील देवघर पाहण्यासारखे आहे. त्यात राजघराण्यातील मागील सर्व पूर्वजांच्या पादुका आहेत. या वाड्यासमोरच शिवछत्रपतींचे मंदिर आहे. त्यात छत्रपतींची पांढऱ्या संगमरवरी दगडाची, अश्वारूढ, देखणी मूर्ती आहे. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी ही मूर्ती बसविली.

या वाड्याला लागूनच नगरपालिकेची इमारत आहे. ही इमारत शाहू महाराजांनी स्वतःला राहण्यासाठी बांधली होती. या नगरपालिकेच्या मागे हॉलिडे होम्स आहेत. दिवसाला काही ठराविक पैसे भरून प्रवाशांना येथे राहता येते.



सज्जाकोठी, पन्हाळगड

येथून पुढे गेले की अगदी कड्यावर एक उंच इमारत दिसते. हिचे पूर्वीचे नाव 'सदर-इ-महल.' आता हिला 'सज्जाकोठी' असे म्हणतात. या सज्जाकोठीतच दिलेरखानाकडून परतलेल्या संभाजीराजांची व शिवाजीराजांची अखेरची भेट झाली. सज्जाकोठी दोन मजली असून वर गच्ची आहे. या गच्चीतून पन्नास ते साठ किलोमीटरच्या ( म्हणजे तीस चाळीस मैलांच्या ) टापतील


नैसर्गिक प्रदेश फारच सुदर दिसतो इब्राहिम आदिलशहाच्या काळात ही इमारत बाधण्यात आली. सिद्दी जौहरच्या वेढचात असता शिवाजी महाराज आणि त्यांचे सहकारी याची खलबते येथेच चालत

आता असच कडन पुढ गलो की लागतो 'वाघ दरवाजा' इकडच्या बाजूने गडावर येण्याचा मार्ग सोपा असल्याने येथे सरक्षणाची व्यवस्था अधिक प्रमाणात दिसते. या दरवाजाच्या दोन्ही बाजूना चक्री तोफेचे प्रचड बुरुज उभे आहेत वाघ दरवाजातून ज्या पायऱ्या खाली गेल्या आहेत त्या आपल्याला थेट 'तबक' बागेमध्ये घेऊन जातात या बागेचा आकार तबकाप्रमाणे आहे.

आपण परत वरती येऊन तटाच्या कडेने चालू लागतो. वाघ दरवाजाच्या पुडे लागतो 'दुतोंडी बुरुज' त्यापुढे हा 'दौलती बुरुज' आणि नतर लागते 'राजदिंडी' सिद्दी जौहरच्या वेढचाच्या वेळी महाराज पन्हाळचावरून निसटले ते याच राज-दिंडीतून बाहेरून पाहिले असता येथून गडात जाण्यास वाट असेल अशी कल्पनासुद्धा येत नाही येथून पुढे आलो की आपण या शेवटच्या टोकाशी येतो याला म्हणतात 'पुसाटीचा बुरुज' याचे खरे नाव आहे 'पिछाडी बुरुज' पिछाडीच्या बाजूचे रक्षण करणारा पिछाडी बुरुज या बुरुजावरून दक्षिण, पश्चिम आणि उत्तर या तिन्ही बाजूवर लक्ष ठेवता येते या पुसाटीच्या बुरुजा-वरून सध्याकाळची सूर्यास्ताची शोभा फारच सुरेख दिसते

आता आपणाला बघायचा राहिला तो बालेकिल्ला. पन्हाळ-गडाच्या उत्तर बाजूला सगळचात उच जी जागा दिसते तोच बालेकिल्ला. या बालेकिल्ल्याभोवती पूर्वी पावणेतीन मीटर खोल आणि तीन मीटर रुद (म्हणजे नऊ फूट खोल आणि दहा

फूट रुंद ) असा खंदक होता. बालेकिल्ल्यात जाण्यास एकच वाट आहे. ही वाट हुजूरपेठेतून आहे. या बालेकिल्ल्यावरच पूर्वी राजवाडा होता असे सांगतात. आता फक्त त्याचा चौथरा शिल्लक आहे. राजवाडा नसला तरी तीन अंबरखाने येथे दिसतात. या कोठ्यांची नावे आहेत गंगा, सिंधू आणि यमुना. यात वरी, नागली आणि भात यांचा संग्रह करीत. या तिन्ही कोठ्यात मिळून २५०० खंडी धान्य मावत असे. यातील ही सगळ्यात मोठी जी कोठी आहे तिचे नाव गंगा कोठी. हिचा घेर १०२००



गंगाकोठी,
पन्हाळगड

फूट आहे तर हिची उंची सुमारे दहा साडेदहा मीटर (म्हणजे ३५ फूट ) आहे. गंगा आणि यमुना या दोन कोठ्यांच्या मध्ये जी मोकळी जागा आहे तिथे जमिनीखाली एक कोठार आहे. त्यात दारूगोळा, टांकसाळ, असे विभाग आहेत. आज तेथे जायची वाट बंद झाली आहे.


असेच आपण पुढे गेलो की लागतो 'तीन दरवाजा'. यालाच 'कोकण दरवाजा' असेही म्हणत. हा दरवाजा तीन मजली आहे

याच्या मधल्या कमानीवर सुरेख नक्षीकाम आहे हे बांधकाम दगडी असून, शिशाचा रस मधे ओतून हे दगड एकावर एक बसवले आहेत. या दरवाजालगतच गोपाळतीर्थबाग आहे. याजवळच गोपाळतीर्थ आहे याचे पाणी अतिशय स्वच्छ आहे असेच थोडे पुढे गेले की 'अंधारबाव' लागते ही इमारत आहे तीन मजली. हिच्या तळात पाणी आहे मध्यभागातून अडीअडचणीच्या वेळी तटाबाहेर जाण्यास उपयोगी पडणारी चोरवाट गेली आहे. तटाच्याकडेने जाता जाता वाटेत आपणास नरसिंह खिंड, काही जुन्या तालमी, टेहळणीचे दरवाजे अशी ठिकाणे लागतात मग लागतो भालजी पेंढारकराचा बंगला येथे समोरच जांभ्या दगडात कोरलेली गुहा दिसते हीच 'पराशर गुहा.' या गुहेत पाच खोल्या आहेत. सर्वांत शेवटच्या खोलीत सुमारे दोन मीटर (म्हणजे सहा फूट) खोल अंतराची तपश्चर्येची जागा आहे.

असेच वर सपाटीवर गेले की समोर 'कालीबुरुज' दिसतो. या बुरुजाच्या खाली पूर्वी काली मातेचे देऊळ होते म्हणून याला कालीबुरुज म्हणतात. या ठिकाणी दुहेरी तट आहे या तटाखालून-च एक वाट खाली गेली आहे. या वाटेने गेलो की आपण 'रेडे-घाटीच्या बागेत येतो या बागेत रोपे तयार केली जातात येथून समोर पावनगडही दिसतो. आता आपण नागझरीकडे जाऊ या नागझरीचे पाणी स्वच्छ आहे तसेच या पाण्यात लोहही आहे. पुढे पायऱ्या लागतात या पायऱ्या संपल्या की एक घुमट दिसतो हे सादोबाचे देवालय. या देवालयाजवळच एक मोठे तळे आहे. त्याला पराशरतीर्थ किंवा 'सादोबाचे तळे' असे म्हणतात हा तलाव इब्राहिम आदिलशहाच्या कारकीर्दीत बांधला गेला, यापुढे चार दरवाजा आज हा दरवाजा शिल्लक नाही. त्याचे

काही अवशेष तेवढे पाहायला मिळतात याला चौदरवाजा असेही म्हणत असत.

आता आपण परत वर जाऊ. येथून पूर्व तटावर पाहिले असता एक उच पडकी इमारत दिसते. तिला 'कलावतिणींचा सज्जा' किंवा 'नायकिणीचा सज्जा' असे म्हणतात दुसरा इब्राहिम आदिलशहा याचे कारकीर्दीत त्याचे मनोरंजन करणाऱ्या ३० नायकिणी येथे राहात असत. समोर दिसते ती धान्यकोठीची इमारत अंबरखान्यातील धान्य या ठिकाणी आणून ते धर्मादाय वाटप केले जाई या इमारतीत नैसर्गिक चित्रकलेच्या आकृती कोरलेल्या आढळतात



संभाजीमंदिर, पन्हाळगड

यानंतर लागते संभाजीराजाचे देऊळ हे संभाजी म्हणजे कोल्हापूरचे दुसरे राजे समोरच त्यांच्या पत्नीचे–जिजाबाईचे देऊळ आहे पुढे एक सपाट मैदान लागते या जागेतच रामचंद्रपंत अमात्य यांची समाधी आहे. यानंतर लागतो सोमेश्वर तलाव. याला चोहोबाजूंनी तट आणि घाट बांधलेले आहेत. याच्या

तीरावर सोनचाफ्याची झाडे आहेत. तसेच सोमेश्वराचे मंदिर आहे. शिवाजीराजे प्रथम जेव्हा किल्ल्यावर आले तेव्हा त्यांनी या सोमेश्वरास सोनचाफ्याच्या एक लक्ष फुलाचा अभिषेक केला, असे जयराम कवीने आपल्या 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' नावाच्या काव्यात म्हटले आहे.

पन्हाळा किल्ल्याचे मूळचे नाव 'ब्रह्मगिरी.' पुढे पराशर-ऋषींच्या तपश्चर्येमुळे त्याला 'पराशराश्रम' हे नाव पडले. नंतर नाग लोकांच्या येथील वास्तव्यामुळे त्याला 'पन्नगालय' हे नाव पडले (पन्नग=नाग, आलय=घर) या 'पन्नगालयाचा' पुढे 'पन्हाळा' झाला.

पन्हाळा कोणी बांधला याबद्दल अनेक मते आहेत. भोजराजाने तो बांधला अशी बहुतेकांची समजूत आहे. पण संशोधकांच्या मते हा किल्ला त्यापूर्वी म्हणजे राष्ट्रकूट – चालुक्यांच्या काळात बांधला गेला राष्ट्रकूट राजा 'दुसरा जतिजा' हा स्वत:ला 'पनालादुर्गआद्रिसिंह' म्हणवून घेत असल्याचा उल्लेख मिळतो. याचा अर्थ हा किल्ला राष्ट्रकूटांच्या काळात बांधला गेला इ. स. ५०० ते १०५० या काळात हा किल्ला राष्ट्रकूटांच्या ताब्यात होता. त्यानंतर काही वर्षे तो चालुक्यांच्या ताब्यात होता. आजही सुमारे तीन मीटर (म्हणजे दहा फूट खोल) उकरले असता काही ठिकाणी राष्ट्रकूट–चालुक्यांच्या काळातील अवशेष मिळतात. चालुक्या-नंतर पन्हाळा शिलाहारांच्या ताब्यात गेला. दहाव्या शतकाच्या अखेरीपासून तेराव्या शतकाच्या आरंभापर्यंत तो शिलाहारांच्या ताब्यात होता. इ. स. ११८७ मध्ये शिलाहार 'राजा भोज' याने किल्ल्याची बांधणी त्या कालाच्या दृष्टीने चोख केली पन्हाळा ही त्याची राजधानी होती. यानंतर गड यादवांच्या ताब्यात गेला

मात्र खरी सत्ता मराठे पाळेगार लोकाची होती कारण यादवाना देवगिरीहून या किल्ल्याचा कारभार पाहाणे शक्य नव्हते यानतर पन्हाळा बहमनी राजाच्या ताब्यात गेला. बहमनी राज्याची फाटाफूट झाली. निरनिराळे सरदार स्वतत्र झाले. त्यानी आपापला मुलूख आपल्या ताब्यात घेतला या वेळी (१४८९) पन्हाळा विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात आला. जवळ जवळ पावणेदोनशे वर्षे तो विजापूरकराच्या ताब्यात होता. इब्राहिम आदिलशहाने केलेले बरेचसे बाधकाम आज किल्ल्यावर दिसते यानतर १६५९ साली शिवाजी महाराजानी तो आपल्या ताब्यात घेतला प्रतापगडी अफजलखानाचा वध झाला. लागलीच महाराजानी आदिलशाही मुलुखात धडक मारली. वाटेतील वाई, खटाव, मायणी अशी ठिकाणे काबीज करीत करीत महाराज पन्हाळ्याजवळ आले. त्यानी पन्हाळ्यावर हल्ला केला तो यशस्वी झाला आणि २९ नोव्हेंबर १६५९ च्या मध्यरात्री पन्हाळा स्वराज्यात आला अफजलवधानतर अवघ्या अठरा दिवसात महाराजानी पन्हाळा सर केला. गड सर झाला त्यावेळी महाराज गडाच्या पायथ्याशी होते त्यानी दिवस उजाडायची सुद्धा वाट पाहिली नाही. रात्रीच्या रात्री मशालीच्या उजेडात राजानी गड पाहिला. महाराज असेच विजयी होत गेले तर आदिलशाहीची धडगत नव्हती. आदिलशहा विचारात पडला. काही करून या शिवाजीला अडवायला हवे त्यासाठी त्याने सिद्दी जौहर या पराक्रमी हबशी सरदाराला प्रचड सैन्यानिशी महाराजावर पाठवले महाराजानी पन्हाळ्याच्या आश्रयाने सिद्दीला तोंड द्यायचे ठरविले

सिद्दीने पन्हाळ्याला वेढा घातला किल्ला ताब्यात घेण्यासाठी सिद्दी अविश्रात मेहनत करीत होता. सिद्दी जिद्दी होता पावसाळा

आला तरी सिद्दी जरासुद्धा मागे हटला नाही त्याचा वेढा जरासुद्धा सैल झाला नाही महाराज चिंतेत पडले. किल्ल्यात बसून सिद्दीला महिनोन्‌महिने झुजविणे सहज शक्य होते पण त्यासाठी महाराजाना एके ठिकाणी अडकून पडावे लागले असते आणि ते स्वराज्याला मुळीच परवडणारे नव्हते तिकडे पुण्याला शाहिस्तेखान स्वराज्यात घुसून नासधूस करीत होता गावेच्या गावे बेचिराख करीत होता एकटा नेताजी पालकर कुठे कुठे पुरा पडणार? स्वराज्य वाचविण्यासाठी महाराजाना वेढ्यातून बाहेर पडणेच भाग होते. वाटेल ते झाले तरी सिद्दीच्या सापळ्यातून निसटायला हवे होते.

महाराजानी डाव टाकला. सिद्दीशी शरणागतीची बोलणी सुरू केली एकदम बिनशर्त शरणागती ! स्वत सिद्दीच्या स्वाधीन होण्याचे महाराजानी वचन दिले ! आणि सिद्दी फसला आपल्या यशाने धुद झाला त्याचा वेढा ढिला झाला. महाराजाना तेच हवे होते. त्याच रात्री निसटायचा महाराजाचा बेत होता आई-भवानीच्या मनात असेल तर हा बेत सिद्धीस जाईल नाही तर....

आषाढी पौर्णिमेची रात्र. पावसाळी हवेमुळे चद्र काळ्या ढगाआड गेला होता महाराज आपल्या सहाशे निवडक शूर मावळ्यानिशी तयार झाले. राजदिंडी उघडली गेली राजाची पालखी दिंडीच्या बाहेर पडली. महाराज त्र्यंबकपताना म्हणाले, 'पत, आम्ही येतो. गड सभाळा ! ' पालखीबरोबर सहाशे मावळे चालू लागले त्यात बाजी प्रभू देशपाडे होते. वेढा जवळ येऊ लागला अत करणाची धडधड वाढू लागली पाय झपाझप उचलले जात होते कावऱ्याबावऱ्या नजरा आजूबाजूला भिरभिरत होत्या, कोणाही पहारेकऱ्याच्या लक्षात आले तर ? केवढे धाडस

केले होते महाराजानी! वेढा पार पडला. पालखीने आडवाट धरली आणि मावळे विशाळगडाच्या रोखाने महाराजाची पालखी पळवू लागले

नतर महाराज विशाळगडाला पोहोचले तेथून मग ते राजगडला गेले अजून सिद्दी पन्हाळ्याशी झुज घेत होता एकावेळी एका शत्रूशी झुजणे चागले असे ठरवून महाराजानी पन्हाळा सिद्दीला देऊन टाकला. त्र्यबक भास्करानी २२ सप्टेंबर १६६० ला गड खाली केला आणि पुन्हा पन्हाळा अदिलशहाच्या ताब्यात गेला यानतर स्वराज्यावर मिर्झाराजाची स्वारी झाली महाराजांना कऱ्हेपठारावर मोगलाशी तह करावा लागला या वेळी महाराजांना मोगलाच्या बाजूने आदिलशाहीविरुद्ध लढणेही भाग पडले याच काळात महाराजानी मोगलासाठी दोन हजार मराठ्यानिशी पन्हाळ्यावर स्वारी केली. पण किल्ल्यावरची माणसे जागरूक होती महाराजाचा हल्ला फसला. या लढाईत एक हजार मराठे मारले गेले महाराजानी माघार घेतली आणि उरलेल्या सैन्यानिशी त्यानी विशाळगडाचा आश्रय घेतला किल्ला आदिलशाहीच्याच ताब्यात राहिला

यानतर आग्र्याहून सुटल्यावर महाराजानी आपला गेलेला मुलूख परत मिळविण्यास सुरुवात केली पन्हाळ्याचा सल त्यांना डाचत होता त्यानी पन्हाळ्यावर मोहीम आखली अण्णाजी दत्तो व कोंडाजी फर्जंद याच्या हाती मोहिमेची सूत्रे दिली. त्याच्या साहाय्याला गणाजीमामा आणि मोत्याजीमामा रवळेकर हेही होते आणि या पठ्ठ्यानी गड घेतला! कसा? गनिमीकाव्याने! चार महिने एवढ्या अवाढव्य फौजेनिशी सिद्दीला जो किल्ला घेता आला नाही तो या मराठ्यांनी एका रात्रीत जिकला अवघ्या

साठ मावळ्यानी कोंडाजी फर्जंद, गणाजीमामा आणि मोत्याजी-मामा याच्या नेतृत्वाखाली किल्ला जिकला

युवराज संभाजीराजे मोगलाकडून परत आल्यानतर पन्हाळ्या-वरच आले. त्याना भेटण्यासाठी महाराज पन्हाळ्यावर गेले त्यानी संभाजीराजाशी वाटाघाटी केल्या. संभाजीराजे पन्हाळ्यावर सज्जाकोठीत राहात असत शिवाजी महाराजाच्या मृत्यूची बातमी संभाजीराजाना येथेच कळाली आणि येथूनच मग ते रायगडास गेले. यानतर संभाजीराजाना राज्याभिषेक झाला त्याचा बहुतेक वेळ पन्हाळा, विशाळगड आणि सगमेश्वर या भागातच गेला.

पन्हाळा हे शिवाजीराजाना व संभाजीराजाना प्रिय ठिकाण होते संभाजीराजाच्या वधानतर औरगजेबाचे सैन्य रायगडाच्या रोखाने चाल करून आले. सगळ्यानी एका ठिकाणी राहाणे शहाणपणाचे होणार नाही, हे ओळखून राजाराम महाराज आपल्या परिवारासह पन्हाळ्याच्या आश्रयाला आले पन्हाळाही मोगली सैन्याने वेढला त्यामुळे राजाराम महाराज विशाळगडाला गेले व तेथून जिंजीला गेले राजाराम महाराज दक्षिणेत गेल्यावर मोगलाना पन्हाळा जिकण्यात यश आले यानतर काही काळ मराठी राज्याचा कार-भार विशाळगडावरून चालत होता, विशाळगड काबीज करण्या-साठी औरगजेबाने काही फौज कायमची पन्हाळ्यावर ठेवून दिली होती मराठी राज्याला स्थैर्य येण्याच्या दृष्टीने पन्हाळा स्वराज्यात येणे आवश्यक होते. परशुरामपत प्रतिनिधी यानी पन्हाळ्यावर स्वारी करून मोठ्या शौर्याने तो पुन्हा जिकला पन्हाळा परत स्वराज्यात आला

१७०० साली राजाराम महाराज सिंहगडावर मरण पावले. त्यानतर करवीरचे पहिले छत्रपती शिवाजी याना विशाळगडावर

राज्याभिषेक झाला. मोगल सैन्याने अजून मराठ्याची पाठ सोडली नव्हती. १७०१ सालच्या पावसाळ्यापूर्वी औरंगजेबाने पन्हाळा सर केला, आणि मग आपला मोर्चा विशाळगडाकडे वळविला. औरगजेबाच्या मृत्यूपर्यंत (१७०७) पन्हाळा मोगलाच्या ताब्यात होता औरगजेबाच्या मृत्यूनतर मोगल किल्लेदाराने पन्हाळा मराठ्याच्या स्वाधीन केला. ताराबाई राणीसाहेबानी यानतर मराठी राज्याची राजधानी पन्हाळ्यावर हलविली राज्यकारभाराची सूत्रे आता पन्हाळ्यावरून हलविली जाऊ लागली. मराठी राज्याच्या राजधानीचा मान पन्हाळ्याला मिळाला. हा काळ पन्हाळ्याच्या आयुष्यातील भाग्याचा काळ. शिवाजी महाराजाच्या काळात रायगड जसा सजला, तसा ताराबाईच्या काळात पन्हाळा नटला, समृद्ध झाला.

औरगजेबाच्या मृत्यूनतर, मराठ्याच्यात दुही निर्माण व्हावी म्हणून मोगल बादशाहाने शाहूराजाना सोडून दिले. त्यानी मराठे सरदाराना आपल्याला सामील होण्याची आज्ञापत्रे पाठविली. करवीरकरानी त्याला विरोध केला. शाहूराजे आणि ताराबाई यांच्यात लढाईचा प्रसग आला दोघानीही फौजा जमविल्या. १७०८ सालचा दसरा होताच शाहू महाराजानी स्वारीसाठी कूच केले पन्हाळा आणि पावनगड त्यानी घेतले ताराबाई आपला मुलगा सभाजी याच्यासह रागण्याच्या आश्रयाला गेल्या शाहू महाराजानी पुढे रागण्याकडे कूच केले, पण पावसाळ्यामुळे ते पन्हाळ्यावर परतले

करवीरकराना पुढ पन्हाळा परत आपल्या ताब्यात घेतला आणि येथूनच राज्यकारभाराची सूत्रे हलू लागली. यानतर शाहू महाराज आणि सभाजीराजे यात वाटाघाटी होऊन २५ मे १७३०

रोजी वारणेचा तह झाला. या तहानुसार कोल्हापूरच्या स्वतंत्र राज्यास मान्यता मिळाली पुढे पेशव्यानी आपल्या राज्याचा विस्तार उत्तरेकडे केल्याने संघर्षाचा प्रसंग पुन्हा आला नाही. कोल्हापूरच्या राज्याला त्यामुळे बरीच स्वस्थता लाभली पुढे इ स. १७८८ मध्ये पन्हाळ्याहून राजधानी हलवून कोल्हापुरास आणण्यात आली म्हणजे १७०१ पासून १७८८ पर्यंत, जवळ जवळ सत्तर वर्षे, मधील काही काळ सोडता पन्हाळा ही करवीरकराची राजधानी होती यानंतर मात्र पन्हाळ्यावर विशेष उल्लेख करण्यासारखी घटना घडली नाही

आता एक थंड हवेचे ठिकाण म्हणून पन्हाळ्याला महत्त्व आहे. अभिमानाने मिरवावा असा इतिहास आणि निसर्गसौंदर्य यांचा जो सांगड पन्हाळ्यावर अनुभवायला मिळते ती इतरत्र सहसा मिळत नाही पन्हाळा हे मराठी माणसाला पावन वाटावे, असे एक ऐतिहासिक ‘ शिवतीर्थ ’ आहे

☐ ☐

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
693
क्र. 23223
अं-प्रवास
29/01/89

# ७ : विशाळगड बाजीप्रभूंचे स्मरणस्थान

विशाळगड हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा किल्ला आहे हा किल्ला प्राचीन आहे शिलाहार, राष्ट्रकूट, चालुक्य याच्या वेळी देखील हा किल्ला होता. गेल्या हजार वर्षांत महाराष्ट्रात झालेल्या अनेक राजकीय घडामोडी या किल्ल्याने पाहिल्या आहेत अनुभवल्या आहेत

विशाळगड कोल्हापूरच्या वायव्येला सुमारे ऐंशी किलोमीटर-वर म्हणजे सुमारे पन्नास मैलांवर आहे. हा गड सह्याद्रीपासून वेगळा आहे, साडेचार मीटर (पधरा फूट) रुंदीच्या एका पाय-वाटेने तो सह्याद्रीच्या मुख्य रांगेशी जोडला गेला आहे. त्यामुळे या गडाला सर्व बाजूंनी नऊशे मीटर (म्हणजे तीन हजार फूट) उंचीच्या कड्याची नैसर्गिक तटबंदी मिळाली आहे गडाची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे नऊशेनव्वद मीटर (म्हणजे तेहेतीसशे फूट) आहे.


गडावर जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. कोल्हापूरहून आपण रत्नागिरीकडे निघालो की, साधारण शेहेचाळीस किलोमीटरवर (एकोणीस मैलावर) मलकापूर लागते. येथून थेट पश्चिमेकडे सुमारे एकोणतीस किलोमीटरवर (अठरा मैलावर) विशालगड मोटारने प्रवास करण्यास ही वाट फारशी चांगली नाही मलका-पूरहून पुढे सोळा किलो मीटरवर (दहा मैलावर) आंबा नावाचे गाव आहे हे गाव सह्याद्रीच्या माथ्यावर आहे या गावाहून गडाकडे जायला चांगला गाडीमार्ग आहे येथून गड सुमारे एकोणीस किलोमीटरवर (म्हणजे बारा मैलांवर) आहे ही वाट

सह्याद्रीच्या माथ्यावरून असल्याने वाटेवरून जाताना आजूबाजूला सुरेख सृष्टिसौंदर्य दिसते. गडाकडे जाताना वाटेत कोमरुणवाडी, गजापूर ही गावे लागतात. पूर्वी गडावर जेव्हा ठाणे होते, तेव्हा या गजापुरात मोठी बाजारपेठ होती. या गावाजवळच एक मोठे मैदान आहे इ स. १७०२ मध्ये औरंगजेब बादशाहाने जेव्हा गडावर स्वारी केली, तेव्हा त्याच्या सैन्याचा मुक्काम येथे पडला होता. म्हणून या मैदानाचे नाव पडले बादशाहाचा माळ.

येथून पुढे गेल्यावर एक टेकडी दिसते. आपण टेकडीच्या माथ्यावर पोहोचतो, तेव्हा समोर विशाळगड दिसतो. गडाचे ते प्रचंड रूप पाहून आपण भाबावून जातो. यानंतर गोणीमूठ आणि घोणसलीचे रान अशी दोन ठिकाणे लागतात ही दोन ठिकाणे ओलांडली की आपण गडाच्या पायथ्याशी पोहोचतो

पूर्वी गडावर जायला घडीव पायऱ्याची वाट होती; परंतु पायऱ्याचे दगड आता जागोजाग निखळून पडले आहेत. त्यामुळे वाट आता पूर्वीसारखी राहिलेली नाही तरी गड चढून जायला फार वेळ लागत नाही सुमारे अर्ध्या तासात आपण किल्ल्याच्या दरवाजात जाऊन पोहोचतो गडावरून दिसणारे सभोवतालचे दृश्य पाहून मन हरखून जाते आणि किल्ला चढण्याचे कष्ट आपण विसरून जातो

आता आपण गडाच्या दक्षिण बाजूकडून गड पाहायला सुरुवात करू गडाच्या दक्षिण टोकास मारुतीचे एक लहानसे देऊळ आहे या देवालयाजवळ एक भुयार आहे. येथे पूर्वी खलबतखाना होता, असे सांगतात येथून उत्तरेकडे तोंड करून आपण चालू लागलो की थोड्या अंतरावर पाताळनगरी नावाची लहानशी दरी दिसते. या पाताळनगरीत दोन समाधी आहेत त्यापैकी पूर्वेकडील



बाजीप्रभूच्या देहनस्थानी बांधलेले स्मारक, विशाळगड

समाधीच्या चौथऱ्याचे चारी बाजूचे दगड नष्ट झाले असून वरील वृंदावन आणि खालील पायाचा चौथरा शाबूत आहे. या वृंदावनाच्या पश्चिमेस सुमारे साडेचार मीटरवर (म्हणजे पधरा फुटावर) दुसरी एक समाधी असून ती सुस्थितीत आहे यातील पूर्वेची समाधी बाजी प्रभू देशपांडे यांची आणि दुसरी त्याचे बधू फुलाजी देशपाडे याची आहे, असे मत पन्हाळ्याचे इतिहास-सशोधक श्री. मु. गो गुळवणी यानी व्यक्त केले आहे

या पाताळनगरीवरून आपण जरा उजव्या बाजूला गेलो की शकराचे देवालय लागते हे देवालय अमृतराव प्रतिनिधी यानी बाधले. देवालयाची ही जागा गडावरील सर्वांत शात आणि रम्य

अशी जागा आहे. आजूबाजूस गर्द झाडी, समोर बारा महिने पाणी असलेला एक छानसा झरा, झऱ्याखाली एक चिरेबंदी दगडाचा हौद आणि त्यावर खोदलेली लहान लहान कुंडे असा या देवळाचा परिसर आहे




मुंढा दरवाजा, विशाळगड

गडाची चढण संपते तेथे दरवाजाजवळ एक मोठा चौथरा दिसतो एखादी लहानशी टेकडीच जणू या चौथऱ्याला 'रण-मंडळ' असे नाव आहे. भूपाळ तळे बांधतेवेळी त्यातून जी माती निघाली तिच्यापासून हा चौथरा झाला असे म्हणतात. हा चौथरा वेशद्वारापासून अगदीच जवळ असल्यामुळे प्रत्येक स्वारीच्या

वेळी या ठिकाणी अगदी हातघाईची लढाई होई. म्हणून या टेकडीचे नाव पडले रणमडळ हे गडावरील सर्वात उच्च ठिकाण त्यामुळे येथून सपूर्ण गड तर दिसतोच; पण कोकणपट्टीचे दृश्यही अगदी समुद्रापर्यंत मोठे सुदर दिसते.

येथून पुढे गेले की तटात एके ठिकाणी छोटासा दरवाजा दिसतो यालाच मुडा दरवाजा असेही म्हणतात. हा चोर दरवाजा. या दरवाजातून पुढे जाण्यात वाट नाही. पण गडाखालील प्रदेशा- टेहळणी करण्यास या दरवाजाचा उपयोग होतो. या




मलिक रेहानचा दर्गा, विशाळगड

दरवाजाजवळच एक बुरुज आहे या बुरुजावरून गडाच्या वाटेवर बरोबर मारा करता येत असे.

रणमडळाच्या वायव्येला थोड्या अतरावर एक दर्गा आहे या

दर्ग्याला 'हजरत पीर मलिक रैहानचा दर्गा' असे म्हणतात. मलिक रैहान नावाच्या एका साधुपुरुषाचे हे स्मारक असावे दर्ग्याच्या आतील बाजूस एक खोली असून त्यात मलिक रैहानची कबर आहे दरवर्षी येथे उरूस भरतो. त्या वेळी चार पाच हजार हिंदू आणि मुसलमान लोक येथे असतात

या दर्ग्यावरून पुढे उत्तरेला जाऊ लागले की वाटेत एक टुमदार छत्री दृष्टीस पडते. हे सतीचे वृंदावन इ स. १७०० मार्च २ रोजी राजाराम महाराज सिंहगडावर मरण पावले,



कुवार शिळा विशाळगड

राजाराम महाराजाच्या तिसऱ्या पत्नी अहिल्याबाई (अंबिकाबाई) त्यावेळी विशाळगडावर होत्या त्याना ही बातमी कळताच महाराजाच्या पागोट्याबरोबर त्या येथे सती गेल्या त्या ठिकाणी

नतर वृंदावन बांधण्यात आले आणि त्याच्या पूजेअर्चेकरिता पन्नास रुपयांची नेमणूक करून देण्यात आली १९४० मध्ये कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यानी या वृंदावनाचा जीर्णोद्धार करून हल्लीची छत्री त्या ठिकाणी बाधली

पुढे गेल्यावर निमजगा, वेताळ टेकडी, बावन सती वगैरे ठिकाणे लागतात. गडावर सती गेलेल्या बावन्न स्त्रियाची वृंदावने येथे आहेत. येथून जवळच तास टेकडी आहे ही टेकडी उच्च आहे पूर्वी येथे पहाऱ्याची चौकी असे आणि दिवसमान कळण्याकरिता येथे प्रत्येक तासाला तासाचे ठोके वाजविण्यात येत. येथून समोर दिसणाऱ्या टेकडीवर दोन सुळके दिसतात त्यातील एक मोठा व दुसरा थोडा लहान आहे. त्याला नवरा-नवरी पॉईंट म्हणतात यालाच कुवारशिळा असेही म्हणतात.

या तास टेकडीच्या पूर्वेला गडसदरचा माळ म्हणून एक ठिकाण आहे. ही गडावरील कचेरीची जागा. येथून पुढे गेले की दारूचे कोठार लागते. हे कोठार आज पडले आहे मध्ये छोटी छोटी ठिकाणे वगळली की पुढे लागतो टकमकीचा कडा हा उच्च, तुटलेला कडा देहान्त शासन मिळालेल्या लोकाचा येथून कडेलोट करण्यात येई यानतर लागतो प्रतिनिधींचा वाडा हा वाडा सतराव्या शतकाच्या अखेरीस रामचद्रपंत अमात्य यानी बाधला. वाड्याचे हे ठिकाण असे निवडले आहे की बाहेरून केलेला तोफाचा मारा वाड्यापर्यंत पोहोचू शकत नाही. पूर्वीची इमारत नादुरुस्त झाल्यावर १९३५ साली येथे हल्लीची इमारत बाधण्यात आली.

पूर्वीचा वाडा आजच्यापेक्षा मोठा होता हे वाड्याच्या मागील बाजूला पडलेल्या भिंतीवरून लक्षात येते यापुढे घोड्याची पागा

लागते ही पागा राजाराम महाराजाच्या काळात बांधण्यात आली मग लागते भगवतराव प्रतिनिधींनी बांधलेले शंकराचे देवालय. या देवालयाचे बांधकाम चिरेबंदी असून मजबूत आहे.

यानंतरचे महत्त्वाचे ठिकाण म्हणजे भूपाळ तळे याचे बांधकाम जुने आणि प्राचीन आहे सुमारे साडेचोवीस मीटर लांब आणि साडेचोवीस मीटर रुंद (म्हणजे ऐंशी फूट लांब आणि ऐंशी फूट रुंद) असे हे प्रशस्त तळे शिलाहार राजा दुसरा भोज याने बांधले हा भोज राजा आपणास 'भोज भूपाल' असे म्हणवीत असे भोज हे नाव पुढे राहिले नाही आणि भूपाल याच नावाने हे तळे ओळखले जाऊ लागले.

अमृतेश्वर आणि भगवंतेश्वर ही शंकराची देवालये गडावर आहेत तसेच एक श्रीरामाचे मंदिरही आहे हे मंदिर रणमंडळाजवळ आहे श्रीराम हे रामचंद्रपंत अमात्याचे कुलदैवत. पंतअमात्य जेव्हा गडावर राहात होते, तेव्हा त्यांनी हे मंदिर सतराव्या शतकाच्या अखेरीस बांधले. पुढे हे देऊळ पडले आज येथे विशाळगड जहागिरीतून एक लहान घुमटी बांधण्यात आली आहे.

इसवी सन एक हजार पूर्वीची गडाविषयीची माहिती मिळत नाही. तरी त्यावेळी या प्रांताचे जे चार विभाग होते, त्यापैकी खेळणा हा एक विभाग ८... आणि येथे हिंदू राजे राज्य करीत होते राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार वगैरे लोकांच्या आधिपत्याखाली हा किल्ला होता. जैनधर्माचे शिलाहार वंशातील राजाचे मुख्य ठाणे तर खेळण्यावरच होते. याच शिलाहार वंशातील पराक्रमी राजा दुसरा भोज याने आपल्या कारकीर्दीत पंधरा किल्ल्यांचा जीर्णोद्धार केला. त्यात विशाळगडाचाही समावेश होता. यानंतर यादवांनी स्वारी करून हा किल्ला जिंकला परंतु

यादवाची राजधानी देवगिरी येथून खूप दूर आणि शिवाय वाहतुकीची सोय नव्हती, त्यामुळे यादवाच्या कारकीर्दीत गडावर सांगण्यासारखा प्रसंग घडलाच नाही यानंतर मुसलमानांनी देवगिरीवर स्वारी करून यादवांना जिंकले यादवाच्या इतर मुलुखाबरोबर खेळणाही मुसलमानाच्या ताब्यात गेला परंतु प्रत्यक्ष गडावर कोणी मुसलमान आला नाही फक्त किल्लेदाराची नेमणूक दिल्लीहून होत असे

दिल्लीच्या बादशाहाच्या दक्षिणेतील सरदाराने बंड करून स्वतंत्र बहमनी राज्य स्थापले त्या वेळी खेळणा बहमनी राज्यात आला नंतर तो विजयनगरच्या साम्राज्यात आला गड विजय-नगरच्या ताब्यात आला, तरी गडावर खरी सत्ता होती प्रांतीय लोकांची– पाळेगाराची इ. स १४५३ साली बहमनी राजा दुसरा अलाउद्दीन याच्या कारकीर्दीत पराक्रमी सेनापती मलिक उत्–तुझार याने कोकण प्रांतावर स्वारी केली त्याने कोकणातील शिर्के घराण्यातील राजाचा पराभव केला आणि त्याला मुसलमान करण्याचा घाट घातला पण शिर्क्यांनी एक अट घातली. ‘ प्रथम खेळण्याचा पाडाव करून माझ्या शत्रूचा नाश करा, मग मी मुसलमान होतो. ’ खेळण्यावरील स्वारीत पाहिजे ती मदत कर-ण्याचे आश्वासन दिले मलिक त्याच्या आश्वासनाला भुलला शिर्के डोकेबाज होते. त्यांनी खेळण्याचा किल्लेदार शंकरराव मोरे याच्याशी संधान बांधले आणि डाव टाकला शिर्क्यांनी मलिकच्या सैन्याला वाट दाखविण्याचे काम पत्करले. पहिले दोन दिवस वाट दाखविली आणि मग मलिकच्या सैन्याला नेऊन घोर अरण्यात सोडून दिले शंकररावला निरोप पाठविला तो सैन्य घेऊन आला आणि अडचणीच्या जागी सापडलेल्या मुसलमानी सैन्याचा

त्यानं पार धुव्वा उडविला. सात हजार मुसलमान आणि मलिक उत् तुझार सारखा पराक्रमी सेनापती यांची कत्तल झाली. बहमनी सुलतानाला हा प्रसंग मोठा अपमानास्पद वाटला पुढे १४६९ मध्ये बहमनी सेनापती महमद गावानने या प्रांतावर स्वारी केली आणि नऊ महिन्याची चिवट झुंज देऊन गड जिंकला. या वेळी मुसलमानाचे पाय या गडाला प्रथम लागले

पुढे बहमनी राज्याचे तुकडे पडले. या भागातील सुभेदार युसुफ आदिलखान हा स्वतंत्र झाला आणि अशा रीतीने विशाल-गड आदिलशाहीत सामील झाला.

शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे स्वतंत्र राज्य स्थापले. किल्ल्याचे महत्त्व ओळखून महाराजांनी एका मागोमाग एक किल्ले घेण्याचा सपाटा चालविला. पन्हाळा घेतला, रांगणा घेतला. आणि एक दिवस खेळण्याचेही भाग्य उजाडले खेळणा स्वराज्यात सामील झाला त्यासाठी महाराजांना विशेष प्रयास करावे लागले नाहीत. महाराजांनी गडाला नवीन नाव ठेवले. खेळण्याचा आता विशाळगड झाला

मुधाळचा बाजा घोरपडे यानं शहाजीराजांचा विश्वासघात करून त्यांना कैद करण्यास मुस्तफाखानास मदत केली. तेव्हा-पासून शिवाजी महाराजांच्या मनात बाजीविषयी राग होता. इ. स. १६६०–६१ मध्ये मुधोळवर हल्ला करून महाराजांनी बाजीचा पाडाव केला. आणि सूड उगविला. मुधोळवर स्वारी करण्याची पूर्वतयारी करून महाराज निघाले, ते विशाळगडा-वरूनच.

महाराजांना मारण्यास आलेल्या अफझलखानाच्या वधाची बातमी आदिलशहाला कळायच्या आत महाराज आदिलशाही

मुलुखात घुसले आदिलशहाने सिद्दी जौहर आणि फाजलखान यांना ८०,००० फौज देऊन या कामगिरीवर पाठवले

यावेळी महाराज पन्हाळ्यावर होते. सिद्दीने गडाला वेढा दिला सिद्दी जिद्दीने गडासाठी भाडू लागला आणि गड त्याच्यापेक्षा जास्त जिद्दीने महाराजाच्या नेतृत्वाखाली सिद्दीशी झुंजू लागला पण काही उपयोग होईना. सिद्दी माघार घेईना वाटेल तितके दिवस लढायची सिद्दीची तयारी होती आणि सिद्दीला झुजवत ठेवण्याची महाराजाची तयारी होती पण गडावर अडकून पडायला महाराज राजी नव्हते. तिकडे शाहिस्तेखान मराठी प्रातात घुसून लुटालूट करीत होता

आदिलशाहीच्या टोळचा मराठी मुलूख उध्वस्त करीत होत्या. एकटा नेताजी पालकर त्याना कोठवर तोंड देणार ? महाराजही वेढचात अडकून या सकटावर तोडगा काढण्यास असमर्थ होते. त्यासाठी सिद्दीच्या वेढचातून बाहेर पडायला हवे. त्याशिवाय अन्य मार्ग नव्हता.

त्यासाठी राजानी तहाचा नवा डाव टाकला. तह करायला मी स्वत येतो, असा निरोप राजानी पाठविला आणि सिद्दी यशाने धुद झाला.

गडाचा वेढा ढिला झाला रात्र झाली मध्यरात्र झाली. गडाच्या दरवाज्यातून महाराजाची पालखी बाहेर पडली. महाराज तह करायला चालले ? छे, छे, महाराज चालले सिद्दीपासून दूर. कुठे ? विशालगडाला ! महाराजाबरोबर फक्त सहाशे मावळे होते. पण सारे आपल्या राजासाठी जिवावर उदार झाले होते.

राजाची पालखी पळू लागली. आडवाटेने गडाचा रस्ता कापू लागली सिद्दीला तिकडे बातमी कळली. महाराज निसटले. सिद्दी

चडफडला सतापला. पण आता त्याचा काही उपयोग नव्हता. आता एकच उपाय शिल्लक होता – पाठलाग.

जोहरचा जावई सिद्दी मसूद महाराजाच्या पाठलागावर निघाला महाराज वाटेवर एका खिंडीपाशी आले. पाठीमागून मसूद येत होता आता मसूदपासून महाराजाना वाचवायचे कसे? इच्छा आहे तेथे मार्ग आहे. महाराजाबरोबर हिरडस मावळातील शूर शिलेदार बाजी प्रभू देशपांडे होते. ते पुढे आले. त्यांनी महाराजाना तीनशे मावळे घेऊन पुढे जाण्यास सांगितले आणि स्वत. बाजी प्रभू तीनशे मावळ्यानिशी मसूदला अडवायला खिंडीत उभे ठाकले महाराजांना वाचवायला बाजीने मोठ्या शर्थीने खिंड लढविली

इकडे महाराज विशालगडापाशी आले. पण विशाळगड तरी कुठे मोकळा होता जसवंतराव पालवणीकर आणि सूर्यराव सुर्वे यानी गड वेढला होता. पण आता मावळ्यानी आपला पराक्रम पणाला लावला. आतापर्यंतची बाजी जिंकली होती. आता शेवटच्या टप्प्यासाठी हार खाणे नाही. महाराजानी वेढा फोडला आणि महाराज गडावर पोहोचले.

आपण गडावर पोहोचल्यावर इशारा म्हणून महाराजानी तोफेचे आवाज केले बाजीने ते आवाज ऐकले. याच आवाजासाठी बाजी प्राण कानात आणून लढत होता. तोफेचे आवाज ऐकले आणि बाजी पडला महाराजासाठी त्याने आपला देह ठेवला. बाजी-प्रभूने आपल्या पराक्रमाने आणि स्वामिभक्तीने ती खिंड पावन केली.

नंतर सिद्दीने विशालगडाला वेढा घातला. पण दुर्गम आणि अजिंक्य विशालगडापुढे सिद्दीचे काही चालले नाही. तो परत

गेला हा पराजय विजापूरकराना झोंबला विजापूरचा बादशाहा स्वत महाराजावर चालून आला त्याने पन्हाळा घेतला, पावनगड घेतला पण विशालगड आणि रागणा तो घेऊ शकला नाही. इतक्यात कर्नाटकात बड झाल्याने त्याला ही मोहीम अर्धवट सोडून परत विजापुरी जावे लागले. अशा प्रकारे पन्हाळगडावर अडकलेले महाराज विशालगडामुळे वाचले

पन्हाळा मराठ्याच्या ताब्यात नसल्याने महाराजानी विशाल-गडावरच आपले प्रमुख ठाणे ठेवले होते त्यामुळे देश आणि कोकण या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी मोहिमा करणे महाराजाना शक्य झाले बाजी घोरपड्याबरची स्वारी आणि वाडीकर सावताच्या वरची स्वारी या स्वाऱ्याच्या वेळी जर विशालगड महाराजाच्या ताब्यात नसता तर महाराज हे विजय इतक्या सहजतेने मिळवू शकले नसते

इ स १६६२ मध्ये शिवाजीराजानी शहाजीराजाना आपला मुलुख दाखविण्यासाठी नेले होते त्या वेळी याही गडावर त्याना आणले होते. इ स १६७३ मध्ये विशाळगडावर मोठे सैन्य जमवून मार्च महिन्यात मराठ्यानी पन्हाळा जिकून परत स्वराज्यात आणला इ स. १६७१–७२ मध्ये विशाळगडाच्या डागडुजीकरता पाच हजार रुपये खर्च केले आणि गड रामचद्रपत अमात्याच्या ताब्यात दिला

इ स १६८० मध्ये शिवाजी महाराज निधन पावले. सभाजी राजे गादीवर आले. सभाजी महाराजाचा बराचसा काळ पन्हाळा, विशाळगड, संगमेश्वर या भागात गेला या काळात मोगल सैन्य सभाजी महाराजाच्या मार्गावर होते पण मोगलाना विशाळगड जिकता आला नाही सभाजी महाराजाचा बराच काळ या

किल्ल्यात गेला सरक्षणाच्या दृष्टीने किल्ला मजबूत व्हावा, यासाठी त्यानी दोन दरवाजे आणि बुरुज आपल्या काळात बाधले.

इ. स १६८९ मध्ये सभाजी महाराजाचा भीमाकाठी वडू–तुळापूरला वध झाला या वेळी राजाराम महाराज, येसूबाई-साहेब आणि बालराजा शाहू वगैरे मडळी रायगडावर होती. औरगजेबाचे सैन्य गडावर चालून येत होते सर्वांनी एकदम वेढ्यात अडकून पडू नये म्हणून राजाराम महाराजानी आपल्या परिवारासह पन्हाळ्याचा आश्रम घेतला पन्हाळ्यालाही मोगलाचा वेढा पडला तेव्हा ते विशाळगडावर आले विशाळगड हा त्या वेळी सर्वांत बळकट किल्ला समजला जात होता

रायगड घेतल्यावर झुल्फिकारखानाने आपला मोहरा राजाराम महाराजाकडे वळविला मोगलाच्या पाठलागापासून सुटका करून घेण्यासाठी राजाराम महाराजानी दक्षिणेत निघून जायचा बेत केला इकडे मोगलांनी पन्हाळा घेतला, पण विशाळगड घेणे त्याना जमले नाही.

इ स. १६९१ मध्ये विशाळगडावर कोल्हापूरचे पहिले छत्रपती शिवाजी याचा जन्म झाला. पत वेळोवेळी गडाखाली उतरून प्रातात स्वाऱ्या मारून बेगमीही करीत आणि प्रातही राखीत राजाराम महाराजाचे कबिले विशाळगडावर असल्याने विशाळ-गडावर औरगजेबाचे सरदार वारवार हल्ले करीत पण विशाळ-गडाने त्याना दाद दिली नाही. विशाळगड आता महाराष्ट्रातील राज्यव्यवस्थेचे केद्र बनले होते पण गडाभोवतालचा मुलूख मोगलाच्या ताब्यात ! त्यामुळे पत अमात्यांची कोडी झाली होती. परशुराम पतप्रतिनिधींनी ही कोंडी फोडली त्यांनी पन्हाळ्यावर हल्ला करून मोठ्या शौर्याने तो जिंकला आणि मग मराठी सत्ता

पुन्हा वाढू लागली या सगळ्याचे मूळ विशाळगड ! औरंगजेबाने विशाळगडावर हल्ला करण्याचा बेत केला; पण रामचंद्रपंतांनी गडावरील राजघराण्यातील सर्व मंडळी जिंजीला हलविल्यावर औरंगजेबाने आपला बेत रद्द केला.

इ. स १६९२–९३ मध्ये जंजिऱ्याच्या हबशांनी गडाला वेढा देण्याचा प्रयत्न केला. पण पराभूत होऊन त्यांना परत जावे लागले. आता महाराष्ट्राला धनी कोणी नव्हता. शाहू महाराज बादशाहाच्या अटकेत तर राजाराम महाराज जिंजीला ! तरीसुद्धा औरंगजेब संपूर्ण महाराष्ट्र काबीज करू शकत नव्हता विशाळ-गडावरून पंत अमात्य आणि परशुराम पंतप्रतिनिधी औरंगजेबाच्या सैन्याला रोखत होते स्वराज्याची ज्योत विझू नये म्हणून प्राण-पणाने झुजत होते

राजाराम महाराजांना पकडले, तर संपूर्ण स्वराज्य जिंकता येईल, या कल्पनेने औरंगजेबाने जिंजीचा वेढा नेटाने चालविण्यास सुरुवात केली आता राजाराम महाराजांना जिंजीतून बाहेर पडणे आवश्यक होते इकडे पंत अमात्यांच्या हाती थोडा मुलूख आला होता राजाराम महाराज युक्तीने वेढ्यातून निसटले मोगलांची फौज मागे लागली असतानासुद्धा राजे विशाळगडास येऊन पोहोचले. आठ वर्षांच्या वनवासानंतर विशाळगडावर राजाराम महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली

यानंतर राजकारणाच्या सोयीसाठी राजांनी आपला मुक्काम पन्हाळ्यावर हलविला. मात्र विशाळगडावरचे ठाणे हलले नाही. ताराबाई राणीसाहेब वगैरे मंडळी अजून गडावरच होती. राजाराम महाराजांनी आपल्या काळात गडावर खूप दुरुस्त्या केल्या.

कोठया बांधल्या. पागा बांधली: किती मोठी ? बारा हजार घोडे बांधता येतील एवढी मोठी पागा !

राजाराम महाराजाच्या मृत्यूनंतर मोगल सैन्याने सातारा जिंकला. त्यामुळे पन्हाळ्याचे ठाणे पुन्हा विशाळगडावर आले. इ स १७००–१७०१ मध्ये राजारामाचे वडील पुत्र याना करवीरचे पहिले छत्रपती म्हणून विशालगडावर अभिषेक करण्यात आला आणि त्याच्या नावाची ग्वाही महाराष्ट्रात फिरवण्यात आली.

मोगल सैन्याने अजून मराठ्यांचा पिच्छा सोडला नव्हता. १७०२ मध्ये औरंगजेबाने पाऊण लाख सैन्यानिशी विशाळगडाला वेढा घातला. तत्पूर्वी त्याने मराठ्याची रसद तोडून टाकण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न केले होते गडावर मराठ्याचे नेतृत्व करीत होते परशुराम पतप्रतिनिधी ! त्यानी काही औरगजेबाची मात्रा चालू दिली नाही मराठी सैन्याची रसद बद होण्याऐवजी मराठ्याच्या छोटया छोटया टोळ्या मोगलाची रसद तोडून मराठ्याना पुरवू लागल्या चार महिने झाले तरी बादशाहाला गड घेता येईना शेवटी त्याने भेदनीतीचा अवलब केला आणि गडावर प्रवेश मिळविला शत्रु गडात शिरणार हे पाहिल्यावर मग प्रतिनिधीनी तहाची बोलणी सुरू केली. मराठे सरदार आणि सैनिक याना कसलाही त्रास न देण्याचे बादशाहाने कबूल केले. अखेर दिनाक १७ जून १७०२ रोजी मोगलाचे निशाण गडावर लागले मराठ्यानी दुसरे दिवशी गड खाली केला. औरंगजेबाने गडाचे नाव बदलले आणि सक्करलाला असे ठेवले. उदितसिंगाला गडावर बदोबस्तासाठी ठेवून बादशाहा परत निघून गेला

यानंतर सुमारे पाच वर्षे हा विशाळगड मोगलाकडे होता.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी उदितसिंगाकडून तो सामोप-चाराने मिळविला.

यानंतर मात्र ताराबाई साहेबांनी करवीरची राजधानी पन्हाळ्यावर नेली आणि त्या तिकडेच राहू लागल्या, परशुराम पंतप्रतिनिधी मात्र गडावरच राहत परंतु ही स्थिती फार दिवस टिकली नाही

मराठी राज्यात दुफळी माजावी म्हणून बादशहाने शाहू महाराजांना सोडून दिले. बादशहाच्या अपेक्षेप्रमाणे घडले शाहू आणि ताराबाई यांची आपापसात भांडणे सुरू झाली शाहू महाराजांनी पन्हाळा घेतला. पावनगड घेतला. विशाळगडचे अमलदारही गड शाहू महाराजांना देण्यास तयार झाले गडाची कामगिरी आपल्याकडेच ठेवून त्यांनी गड शाहू महाराजांच्या स्वाधीन केला.

परशुराम पंतप्रतिनिधी ताराबाईंच्या पक्षाचे म्हणून शाहू महाराजांनी त्यांना बंदिवासात ठेवले होते. पण कोल्हापूर प्रांत हाती आल्यावर परशुरामपंतांसारखा मुरब्बी माणूस आपल्याकडे हवा, असे त्यांना वाटू लागले त्यांनी प्रतिनिधींना मोकळे केले त्यांना त्यांचे पूर्वीचे प्रतिनिधीपद देऊ केले. तसेच त्यांच्या इच्छे-प्रमाणे विशाळगडही त्यांना दिला.

परशुरामपंतांनी आपला वडील मुलगा कृष्णाजी याच्या नावे गड करून दिला कृष्णाजीने विशाळगड आपल्या ताब्यात घेतला आणि लगेच तो ताराबाईंच्या पक्षात जाऊन मिळाला. यामुळे गड विनासायास करवीरकराकडे आला. या कृत्याला परशुराम-पंतांची फूस असावी असे वाटून शाहू महाराजांनी त्यांना पुन्हा बंदिवासात टाकले

पुढे परशुरामपंताचा दुसरा मुलगा श्रीपत याने कृष्णाजी खटावकरावरील स्वारीत दाखविलेल्या पराक्रमाने खूष होऊन शाहू महाराजानी त्याला काय पाहिजे ते मागण्यास सांगितले. त्याने आपल्या घराण्याला प्रतिनिधिपद मिळावे आणि विशाळगड कृष्णाजीकडेच राहावा अशा मागण्या केल्या. शाहूने त्या मान्य केल्या, परशुरामपंताना प्रतिनिधिपद दिले आणि विशाळगडाचाही वेढा उठविला

यापुढे राजकारणाचे केंद्र सातारा आणि पुणे येथे झाल्याने विशाळगडावरील प्रतिनिधींच्या अमलाला कोणी परकीयानी विरोध केला नाही विरोध केला तो स्वकीयानी । १७४८ मध्ये कोकणातील सरदार आंग्रे याने छत्रपतींच्या मुलखाला त्रास देण्यास सुरुवात केली गंगाधरपंत प्रतिनिधी याने पंत अमात्य आणि सावंतवाडीकराचे साहाय्य घेऊन त्याचा बंदोबस्त केला गंगाधर-पंताच्या मृत्यूनतर आंग्रे यानी पुन्हा उचल खाल्ली १८५३ मध्ये त्यानी सरळ विशाळगडला वेढा घातला त्यावेळच्या अमृतराव प्रतिनिधीनी सातारचे प्रतिनिधी जगज्जीवनराव याचे साहाय्य घेऊन आंग्रे याचा पुरा पराभव करून त्याना पिटाळून लावले.

यानंतर गडावर उल्लेख करण्यासारख्या घटना घडल्या नाहीत. इ स. १८४३ साली करवीरचा राज्यकारभार पाहण्यास इंग्रजातर्फे दाजी कृष्ण पंडित याची मुख्य कारभारी म्हणून नेमणूक झाली. त्यामुळे गडकरी असंतुष्ट झाले. त्यानी बंड पुकारले आणि सामान-गड, भूधरगड वगैरे गडाचा आश्रय घेऊन इंग्रजाशी लढण्यास सुरुवात केली बंडाचा प्रसार इतर किल्ल्यावर जसा झाला तसा विशाळगडावरही झाला. बंडाचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रजानी लष्कराचा वापर केला यावेळी इतर गडाबरोबर इंग्रजी लष्कराने

हाही गड ताब्यात घेतला आणि बंडखोरानी या किल्ल्याचा आश्रय परत घेऊ नये म्हणून किल्ल्याची अभेद्य तट दी सुरुग लावून आणि तोफा डागून पाडून टाकली.

गडाचा नाश करेपर्यंत पतप्रतिनिधींचे ठाणे गडावरच होते. त्यावेळी गडावर बाराशे पायदळ, शंभर घोडेस्वार आणि अठरा तोफा असा सरजाम होता नंतर मात्र प्रतिनिधींनी आपले ठाणे मलकापुरास हलविले

अशा प्रकारे विशाळगड हा इतिहासात नावाजलेल्या किल्ल्यापैकी एक आहे. अडचणीच्या प्रसगी तर त्याने मराठ्याच्या राजधानीचे काम बजावले आहे महाराष्ट्राच्या इतिहासातील अनेक थोर व्यक्तींचा सबध या गडाशी आला आहे.

किल्ल्याचे जुने वैभव आता राहिले नाही, पण त्याचे नैसर्गिक वैभव आणि ऐतिहासिक महत्त्व अजून कायम आहे आणि ते तसेच कायम राहाणार आहे. मग साऱ्या अगामी भयंकर दऱ्या आणि विक्राळ सोंडा असलेला हा विशाळगड हौशी आणि इतिहासप्रेमी प्रवाशाचे मन आकर्षून घेईल यात नवल ते काय ?

□


# ८ : सिंहगड तानाजीच्या पराक्रमाचे स्मारक

आपल्याकडे रेडिओ तर घरोघर झाले आहेत. पण आता करमणुकीचे तसेच ज्ञानदानाचे एक नवीन साधन आले आहे ! ते म्हणजे टेलिव्हिजन. टेलिव्हिजनचे मोठे केंद्र मुंबईला आहे पण पुण्याजवळही एक केंद्र झाले आहे. ते आहे सिंहगडावर ! तेथे एक उंचच उंच मनोरा उभारला आहे. इतका उंच की त्याच्या टोकावर माणूस उभा राहिला तर तो दिसणारही नाही ! त्यामुळे पुण्यात आणि पुण्याच्या आसपासच्या गावात टेलिव्हिजन सुरू झाला आहे टेलिव्हिजनचा मनोरा पाहण्यासाठी हल्ली सिंहगडावर खूप सहली निघतात सिंहगड हे आता पुन्हा एक नवे आकर्षण बनले आहे.




पुणे दरवाजा, सिंहगड

पुण्याच्या नैऋत्येस मुठा नदीच्या खोऱ्यात सिंहगड किल्ला आहे. त्याची समुद्रसपाटीपासून उंची सुमारे तेराशे मीटर (म्हणजे सुमारे ४३०० फूट) आहे पुण्याहून डोणजे गावावरून गडाच्या पायथ्यापर्यंतचे अंतर सुमारे चोवीस किलोमीटर (म्हणजे पधरा मैल) आहे. या बाजूने वर गेले असता पुणे–डोणजे दरवाजा लागतो या मार्गाने एका आत एक असे तीन दरवाजे असून सर्वांत वरचा दरवाजा अगदी जुना–म्हणजे यादवकालीन असावा असा


दारूखाना, सिंहगड

संशोधकाचा अंदाज आहे. तिसऱ्या दरवाजातून आत गेल्यावर उजव्या हातास असणारी इमारत म्हणजे दारूखाना होय. किल्ल्याच्या मध्यभागी असलेल्या बालेकिल्ल्यावर कोंढाणेश्वर महादेवाचे जुने देऊळ आहे तेथून जवळच अमृतेश्वर भैरवाचे मंदिर आहे या देवळाच्या थोडेसे वर–उत्तरेस तानाजीचे स्मारक आहे तेथे आता तानाजीचा पुतळा बसविला आहे. पुतळ्याभोवताली लोखंडी कठडा आहे येथेच माघ वद्य नवमीला म्हणजे तानाजीच्या पुण्यतिथीच्या वेळी मोठा उत्सव साजरा होतो या शिवाय राजारामाचे स्मारक, तानाजी वर चढून आला तो

डोणागिरीचा कडा, कल्याण दरवाजा, वगैरे स्थळे पाहाण्या-सारखी आहेत.



नरवीर तानाजीचे स्मारक, सिंहगड

सिंहगड हे नाव उच्चारले की त्याच्या माडीवर कायमची निद्रा घेत असलेल्या तानाजी मालुसरे या नरवीराची आठवण होते, शिवाजीराजाना हा गड मिळाला; पण त्याना त्याचा 'सिंह' गमवावा लागला तेव्हापासून या गडाला सिंहगड हे नाव दिले, अशी खूप जणाची समजूत आहे. पण ती चूक आहे तानाजीच्या हल्ल्याच्या कितीतरी आधी या किल्ल्याचे सिंहगड हे नाव होते

महाराष्ट्राच्या मुलखातले जुन्यात जुने असे जे शिवनेरी, पुरंदर वगैरे किल्ले आहेत त्यापैकीच सिंहगड हा एक आहे सिंहगड केव्हा बांधला गेला याचा पुरावा मिळत नाही. सिंहगडाबद्दलचा जुन्यात जुना जो कागद आहे तो इ. स. १३५० मधला म्हणजे सुमारे सव्वासहाशे वर्षांपूर्वीचा ! 'इसामी' नावाच्या कवीने 'शाह–नामा–इ–हिंद' म्हणून ऐतिहासिक महाकाव्य फारसीमध्ये रचले आहे. त्यातील दोनशे तेविसाव्या प्रकरणामध्ये मुहम्मद तुघलकाने कुंधीयाना (कोंडाणा) किल्ल्यास घातलेल्या वेढ्याची हकीकत आहे त्यावेळी नागनायक नावाच्या कोळी राजाचा सिंहगडावर ताबा होता. आठ महिने त्याने किल्ला लढवला पण धान्य संपल्यावर उपासमार टाळण्यासाठी त्याला किल्ला सोडावा लागला.

पुढे निजामशाहीच्या काळात, पंधराव्या आणि सोळाव्या शतकात साऱ्या निजामशाहांनी संकटाच्या प्रसंगी या गडाचा आश्रय घेतला. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी राजे भोसले यांना भीमा आणि नीरा यामधील मुलखाची जहागिरी मिळाली, तेव्हापासून या गडावर मराठी माणसाची ये-जा सुरू झाली शहाजीराजांना आदिलशाहीतून निजामशाही, निजामशाहीतून मोगलाई मोगलाईतून परत आदिलशाही अशी खूप धावपळ करावी लागली पण त्यांनी सिंहगड सोडला नाही त्यांचा खास कारभारी दादोजी कोंडदेव हा सिंहगडाचा वहिवाटदार होता. (१६३३ ते १६४७) दादोजींनी सिंहगडाच्या पायथ्याशी शिवापूर बसविले तेथे आमराया तयार केल्या. शिवाजी तीन वर्षांचा असताना सिंहगडाच्या आश्रयाला आला होता शिवाजीच्या काळातच सिंहगडाजवळील पुनवडीचे पुणे झाले.

पुणे हे महत्त्वाचे शहर; आणि सिंहगड पुणे प्रांतात मोक्याच्या जागी त्यातूनही तो किल्ला भक्कम आणि चढायला कठीण! त्यामुळे ज्याचा त्याचा सिंहगडावर डोळा सिंहगड आणि पुरंदर ज्याच्या ताब्यात, त्याच्या ताब्यात पुणे अशी स्थिती होती शिवाजीमहाराजानी सिंहगड ताब्यात घ्यावा आणि पुन्हा काही कटकटी होऊन शत्रूने त्याचीच मागणी करावी, असे वारंवार होई विजापूर दरबारने जेव्हा शहाजीराजाना कैद केले तेव्हा त्याच्या सुटकेसाठी त्यानी पुरंदर–सिंहगडाची मागणी केली. आपल्या वडिलाच्या सुटकेसाठी राजाना गड सोडावा लागला पण प्रसग निभताच पुन्हा त्याचा कबजा राजानी केला

त्यानतर शाइस्तेखानाची स्वारी आली. खुद्द शाइस्तेखानावर हल्ला करायला महाराज गेले ते सिंहगडावरूनच आणि शाइस्ते-खानाची बोटे तोडून ते परत आले ते सिंहगडाच्याच आश्रयाला. या वेळी शिवाजीमहाराजानी युक्ती केली त्यानी बैलाच्या शिगाना पेटते पलिते बाधून त्याना कात्रजच्या डोंगरात सोडले हे बैल बावरून इकडे तिकडे धावू लागले शाइस्तेखानाच्या सैन्याने राजाऐवजी या बैलाचाच पाठलाग केला! दुसऱ्या दिवशी शाइस्तेखानाचे सैन्य सिंहगडावर चालून आले, पण त्याचे काही चालले नाही

शाइस्तेखानाची अशी फजिती झाल्यामुळे औरंजेब बादशाहाने मिर्झाराजे जयसिग या मुत्सद्दी आणि चतुर सेनापतीला महाराजा-वर धाडले. त्याने कुशलतेने सैन्याची रचना करून शिवाजी-राजाना पेचात पकडले आणि त्याच्याकडून तेवीस किल्ले बळका-वले त्यात पुरदर–सिंहगडचा मान तर पहिला! दुसरा उपाय नाही, हे पाहून राजानी हा तह मान्य केला. सिंहगडचा कब्जा


स्वत. महाराजानी जयसिंगाचा मुलगा कीरतसिंह याच्याकडे दिला. यानतर दोन-तीन महिन्यांनी मिर्झाराजा जयसिंह स्वत सिंहगडा-वर आला होता. गडावर एक रात्र राहून, तेथील अधिकाऱ्यांना गडाच्या बदोबस्ताबद्दल सूचना देऊन तो परत गेला

मग मात्र जे अद्भुत पर्व घडले ते तानाजी मालुसरे याचे. दि. ४ फेब्रुवारी १६७० च्या रात्री झालेल्या सग्रामात शत्रूचा पराभव करीत करीत तानाजीने आपला देह ठेवला. पुढे १९०८ च्या आधी सावरकरानी या प्रसगावर ' धन्य शिवाजी, तो रणगाजी, धन्यचि तानाजी ' असा पोवाडा रचला. त्या काळी तो पोवाडा ज्याच्या त्याच्या तोडी झाला आणि अखेर स्वातन्त्र्यसैनिकाना स्फूर्ती देणारा हा पोवाडा ब्रिटिश सरकारने जप्त केला पुढे स्वातन्त्र्याच्या काळात त्यावरील जप्ती उठली तानाजीने आपल्या पराक्रमाने स्वराज्यप्रेम, स्वामिनिष्ठा, स्वार्थत्याग या साऱ्यांचा आदर्श लोकापुढे ठेवला. गेली सुमारे तीनशे वर्षे तानाजीचा हा पराक्रम मराठ्याना स्फूर्ती देत आला आहे. सिंहगडाचे ' सिंहगड नाव तानाजीने सार्थ केले आहे.

शिवाजीराजाच्या मृत्यूनतर खुद्द औरगजेब बादशाहा तीन लक्ष फौजेनिशी महाराष्ट्रात कायमचा तळ देऊन राहिला. मराठी राज्याची वाताहात झाली मराठे आणि मोगल याच्यात पाठशिवणी-चा खेळ सुरू झाला हल्ला करून मोगल सिंहगडाचा कब्जा घेत मोगलाचे निशाण गडावर चढे, की दुसऱ्या दिवशी परत मराठे गणिमीकाव्याने गड आपल्या ताब्यात घेत आणि गडावर मराठ्याचे भगवे निशाण डौलाने फडकू लागे ! अशी सिंहगडाच्या माल-कीची अदलाबदल वारवार होई. तानाजीच्या पराक्रमानतर तेवीस वर्षांनी नावजी बलकवडे नावाच्या शूर माणसाने अगदी तानाजी-

त्याच पद्धतीने गड जिंकला आणि इतिहासाची पुनरावृत्ती झाली.

पुढे संभाजीची पत्नी येसूबाई आणि मुलगा शाहू यांना औरंगजेबाने कैद केले. छत्रपती राजाराम महाराज जिंजीला गेले. तेथून सात वर्षांनी राजाराम महाराज सिंहगडावर परत आले ते जणू कायमची विश्रांती घेण्यासाठीच! दिनांक ३ मार्च १७०० रोजी राजाराम महाराज सिंहगडावर कैलासवासी झाले येथे त्यांचे स्मारक आजही चांगल्या स्थितीत आहे.



छत्रपती राजाराम-
महाराजांचे स्मारक,
सिंहगड

पेशव्यांच्या काळात पुण्याला महत्त्व आले हळूहळू मराठी साम्राज्याची सारी सूत्रे पुण्याला आली मग सिंहगडाचे महत्त्वही आपोआप वाढले परचक्राच्या वेळी सुरक्षित असे आश्रयस्थान म्हणून वेळप्रसंगी सिंहगडाचा वापर करण्यात आला. सन १७६२ मध्ये निजाम औरंगाबादेवरून जाळपोळ करीत पुण्याला आला. यावेळी गोपिकाबाई पेशवे आणि त्यांचा मुलगा नारायणराव यांनी खाशा स्वाऱ्या महत्त्वाची पोथ्यापुस्तके, इतर संपत्ती आणि पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ती घेऊन सिंहगडाच्या आश्रयाला गेल्या.


या धामधुमीत नारायणरावाचे लग्न सिंहगडावरच उरकण्यात आले. नतरही खडर्याच्या लढाईच्या वेळी आणि तळेगावदाभाडे व वडगाव येथ झालेल्या इग्रजावरोबरच्या लढाईच्या वेळी सावधगिरी म्हणून पर्वतीवरील देवदेवेश्वराची चादीची, पार्वतीची व गणपतीची सोन्याची अशा मूर्ती आणि जामदारखान्यातील जडजवाहिर सिंहगडावरच पाठविण्यात आले होते

खडकीच्या लढाईनतर दुसऱ्या बाजीरावाने घाबरून जाऊन १८४७ मधील १७ नोव्हेंबरला सिंहगडाचा आश्रय घेतला. पेशव्यावरोबरच पुण्यातील इतर व्यापाऱ्याचीही सपत्ती संरक्षणासाठी सिंहगडावर पाठविण्यात आली सिंहगडाच्या संरक्षणासाठी जास्त शिबंदीही गडावर आणण्यात आली होती. येथून दुसरा बाजीराव पेशवा इग्रजाकडे मुबईला गेला, पण गडावरील लोकानी पेशव्याच्या गैरहजेरीतही गड लढविण्याचा निर्धार केला सातशे गोसावी आणि पाचशे अरब मिळून हजार–बाराशे माणसे गडावर होती. त्यानी गड लढविण्याची तयारी केली. इंग्रजानी गडाची चारही बाजूनी नाकेबंदी करून वेढा आवळला. जवळजवळ चार हजार तोफगोळे उडविले. गडावरील शिबदीनेही या वेढ्याला धैर्याने तोड दिले. त्यानी चार महिने लढा दिला. पण अखेर त्याना झुजणे अशक्य झाले. भगव्या निशाणाऐवजी गडावर पाढरे निशाण फडफडले आणि मग गडावर इंग्रजी बावटा लागला

तारखाचा योग तरी पहा कसा ! तानाजी मालुसरे यानी शके १५९१ मधील माघ वद्य नवमीला आपल्या अतुल पराक्रमाने सिंहगड मोगलाच्या ताब्यातून सोडवून स्वराज्यात आणला तर त्यानतर बरोबर दीडशे वर्षांनी त्याच माघ महिन्यातील नवमीला गडावरचा भगवा झेंडा जाऊन तेथे इंग्रजाचा बावटा फडफडू

लागला ! त्या वेळी सिंहगडावर सुमारे पन्नास लक्ष रुपयांची संपत्ती होती ती जशीच्या तशी इंग्रजांना मिळाली

स्वराज्य गेले. काळ बदलला. लढण्याची जुनी शस्त्रे मागे पडली नवीन साधने वापरात आली. या सगळ्या बदलात किल्ल्याचे महत्त्व कमी झाले सिंहगडावरील वस्ती उठून गेली इमारतींची पडझड सुरू झाली. या काळातही इ स. १८८९ मध्ये लोकमान्य टिळकांनी आपले विश्रांतीस्थान सिंहगडाच्या माथ्यावर केले. ते मधून मधून गडावर जाऊन राहात, गडावरील देवटाक्यातील पाण्याने त्यांच्या प्रकृतीला आराम वाटे. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांची महत्त्वाची भेटही सिंहगडावर झाली आहे.



कल्याण दरवाजा, सिंहगड

पुढे आणखी काही वर्षे गेली भारत स्वतंत्र झाला स्वतंत्र भारताचे तिरंगी निशाण सिंहगडावर फडकू लागले. स्वातंत्र्यकाळात

सिंहगड एक प्रेक्षणीय स्थळ बनले. आता अनेक विद्यार्थी सहलीच्या निमित्ताने सिंहगडावर जातात. तानाजीचे स्मारक, राजाराम महाराजांचे स्मारक, तानाजी घोरपडीच्या साहाय्याने चढलेला अवघड कडा, सूर्याजीने सैन्यासह आत प्रवेश केला तो कल्याण दरवाजा, तानाजी आणि उदयभानू यांची हातघाईची लढाई झाली ती जागा, दारूगोळ्याचे कोठार, आरोग्यदायक पाण्याचे देवटाके, लो. टिळकाचा बंगला आणि आता नवीन बांधलेला टेलिव्हिजनचा उच्च उच्च मनोरा इत्यादी ठिकाणे लक्षपूर्वक पाहातात. गडावरून आजूबाजूला नजर टाकली तर सौंदर्याने नटलेली सृष्टी दिसते. सह्याद्रीच्या माथ्यावर असलेले अनेक किल्ले दिसतात. त्या मनोहर दृश्याने मन आनंदाने फुलून जाते.

आता सरकारी योजनेप्रमाणे सिंहगडावर राष्ट्रीय उद्यान होणार आहे मग तर सिंहगडला आणखीनच शोभा येईल आणि प्रवाशांची संख्याही वाढेल. असे आहे महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान सिंहगड!

□ □

# १ : रायगड शिवरायांची राजधानी

सन सोळाशे चौऱ्याहत्तरमधला जून महिना त्या दिवशी साऱ्या महाराष्ट्रात जिकडे तिकडे आनदी-आनद उसळला होता महाराष्ट्र-भर प्रत्येक किल्ल्याकिल्ल्यावर नौबती वाजत होत्या, तोफा उडत होत्या, साखर वाटली जात होती, कारण मराठ्याचे नवे राज्य उदयाला येत होते महाराष्ट्राला स्वत चा राजा मिळाला होता, स्वत चे सिंहासन मिळाले होते. मुसलमानांच्या गुलामगिरीतून महाराष्ट्र त्या दिवसापासून मुक्त झाला होता शालिवाहन राजाच्या नंतर, देवगिरीच्या यादव राजाच्या नतर शेकडो वर्षांनी आज प्रथमच महाराष्ट्राच्या राजाला राज्याभिषेक होत होता. काशीहून विद्वान पडित गागाभट्ट मुद्दाम त्यासाठी महाराष्ट्रात आले होते. महाराष्ट्रातील जनतेचे आवडते, शूर शिवाजीराजे भोसले सोन्याच्या सिंहासनावर बसून छत्रचामरे धारण करीत होते.

राज्यारोहणाच्या सोहळ्यासाठी भव्य मडप उभारला होता मंडपाच्या प्रवेशद्वारावर हत्ती झुलत होता नगारखान्यात नगारा झडत होता हजारो स्त्री-पुरुष नागरिक नटून थटून गर्दी करून हा समारभ पाहण्यासाठी पहाटेच्या पहिल्या प्रहरातच आले होते. राजासाठी बत्तीस मण वजनाचे सोन्याचे सिंहासन मुद्दाम तयार करवून घेतले होते त्याला जागजागी हिरे, माणके, अनेक रत्ने जडवली होती गगा, सिंधू, सरस्वती, यमुना, नर्मदा, गोदावरी आणि कावेरी या सात महानद्याचे उदक सोन्याच्या कलशामधून भरून आणले होते इतरही अनेक नद्याचे तसेच समुद्राचेही जल अभिषेकासाठी आणले होते. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शके १५९६

शनिवार दि. ६ जून सन १६७४ या दिवशी पहाटेस राज्याभिषेकाचा कार्यक्रम सुरू झाला. राजांनी मगलस्नान करून श्रीमहादेव आणि कुलदेवता भवानी याची पूजा केली उपाध्ये व विद्वान सत्पुरुष ब्राह्मण याना वदन करून ते अभिषेकाच्या सुवर्णचौकावर बसले त्या वेळी अष्टप्रधानानी व थोरथोर ब्राह्मणानी मत्राच्या गजरात ठिकठिकाणाहून आणलेल्या जलानी राजाच्या डोक्यावर अभिषेक केला गागाभट्टानी मस्तकावर छत्र धरले. नतर राजानी नवी वस्त्रे व अलंकार धारण केले आणि सर्व पूज्य मंडळीना नमस्कार करून ते सिंहासनावर आरूढ झाले. त्याच क्षणी मगल वाद्ये वाजू लागली. दरबारातील सर्व लोकानी गुलाल आणि सोन्याची फुले उधळून एकमुखाने प्रचड जयजयकार केला "सिंहासनधीश्वर छत्रपती श्री शिवाजी महाराज की जय!"

हा स्फूर्तिदायक सोहळा डोळे भरून ज्याने पाहिला तो इतिहासाचा जागता साक्षीदार आज तीनशे वर्षांनंतरही तसाच ताठ उभा आहे त्याचे नाव किल्ले रायगड या तीनशे वर्षांच्या काळात रायगडाने कितीतरी आनदाचे आणि दु खाचे प्रसग पाहिले मराठी राज्याचा उदय जसा रायगडाने पाहिला, तसा मराठी राज्याचा अस्तही रायगडाने पाहिला टकमक टोकावरून अनेकाचे होणारे कडेलोट त्याने पाहिले. छत्री हातात धरून अलगदपणे हवेतून पायथ्याशी उतरणारा सेवक त्याने पाहिला. हिरकणी गवळणीने सरळ उभाच्या उभा कडा उतरल्याचेही त्याने पाहिले. असे एक ना दोन शेकडो प्रसंग रायगडाने मुकेपणाने पाहिले. आणि आजही त्याला भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला रायगड मुकेपणानेच ते ते प्रसग जणू काही सजीव करून दाखवितो. म्हणूनच रायगडावर

जायचे आणि रायगडाचे दर्शन घ्यायचे

रायगड किल्ला कोकणात सह्याद्रीच्या पश्चिमेस आहे. आज तो नव्या रायगड जिल्ह्याच्या महाड तालुक्यात मोडतो. महाड-पासून मोटारने थेट रायगडाच्या पायथ्यापर्यंत जाता येते. महाड पासून कोंझर या गडाच्या पायथ्याच्या गावापर्यंत चांगला प्रशस्त मोटार रस्ता आहे. कोंझरपासून प्रत्यक्ष गडाचा पायथा पाचाड या गावाशी येतो आता कोंझर–पाचाड हाही रस्ता मोटारीने जाण्याजोगा झाला आहे. जसजसे आपण रायगडाच्या पायथ्या-जवळ जाऊ तसतसा त्याचा भव्यपणा, प्रचंडपणा नजरेत अधिकच भरतो. सह्याद्रीवर असणाऱ्या शेकडो किल्ल्यांपैकी एक तोरणा किल्ला सोडला तर रायगडाशी बरोबरी करू शकेल असा दुसरा कोणताही गड आढळणार नाही. तोरणासुद्धा राजधानीच्या दृष्टीने जरूर असलेल्या ऐसपैसपणाच्या बाबतीत रायगडाहून उणाच पडतो. हा गड जितका उंच, जितका भव्य, जितका प्रचंड आहे, तितकाच दुर्गम—जिंकण्यास कठीण असाही आहे. त्याला इंग्रज इतिहासकारांनी गरुडाच्या घरट्याचीच उपमा दिलेली आहे

राज्याभिषेकासाठी आलेला इंग्रज वकील जॉर्ज ऑक्झेंडन हा किल्ला चढताना आश्चर्यचकित झाला होता. तो म्हणाला, “केवळ फितुरी झाली तरच हा किल्ला जिंकता येईल ” पुढे तर राय-गडावर गेल्यानंतर याच ऑक्झेंडनने प्रवेशद्वारी झुलणारे हत्ती पाहिले, तेव्हा त्याच्या आश्चर्याचा कळस झाला! ज्या एका लहानशा चिंचोळ्या, महाकठीण अशा पायवाटेने गडावर जायचे, त्या वाटेशिवाय गडावर जायला दुसरी वाटच नाही. अशा परि-स्थितीत हे हत्ती वर आलेच कसे, या विचाराने त्याची मती गुंग होऊन गेली. आजही रायगड तसाच आणि तितकाच अवघड आहे.

पाचाड या पायथ्याच्या छोट्या गावापासून रायगडाचा प्रत्यक्ष चढाव सुरू होतो. वेड्यावाकड्या वळणाच्या चढत जाणाऱ्या पायवाटेने आपण 'खूब लढा' बुरुजापाशी येतो. हा बुरुज ओलांडून एका कड्याच्या पायथ्याशी असणाऱ्या लहानशा पाय-



हिरकणी बुरूज, रायगड

वाटेने आपणास सरळ सुमार अर्धा मैल चालावे लागते. डाव्या बाजूला गडाची भीतिदायक उतरण तर उजव्या बाजूला भिंती-सारखा काळाकभिन्न आणि उंचच उंच असणारा कडा ! क्षणा-क्षणाला असे वाटते की कड्याची भिंत आपल्या अंगावर कोसळणार ! डोक्यावर हिरकणी बुरुजाचे टोक उभे आहेत वाटते, तर समोर अजस्र टकमक टोक आभाळातून खाली झेप घेत आहे असे दिसत असते. स्वराज्याशी बेइमानी करणाऱ्यांना येथून

कडेलोटाची शिक्षा दिली जात असे.

हिरकणी टोकावरचा बुरुज जशी मातृप्रेमाची साक्ष देतो, तशीच शिवरायाच्या सावधवृत्तीची साक्ष देतो जीव मुठीत धरून वाटचाल केल्यावर मग एकदम ही पायवाट प्रशस्त होते. दगडी बांधीव पायऱ्या दिसू लागतात. आणि मग उजव्या बाजूस वळताच दोन प्रचंड राक्षसासारख्या बुरुजामध्ये असणारा महादरवाजा दृष्टीस पडतो. या बुरुजाची उंची तर सुमारे एकवीस मीटर (म्हणजे सत्तर फुटाएवढी) आहे. हा महादरवाजा खरोखरच



टकमक टोक, रायगड

शनिवारवाड्याच्या दिल्ली दरवाजासारखा प्रचंड आहे दोन्ही बाजूंना पहाऱ्याच्या चौक्या आहेत. डाव्या बाजूला बांधून काढलेली तटाची भिंत आहे. हा दरवाजा ओलांडला की आपण गडाच्या आतल्या भागात येतो. परंतु चढण अजून संपत नाही प्रत्यक्ष वरच्या इमारतीपाशी जाण्यासाठी आणखी सुमारे एक किलोमीटरची (म्हणजे पाऊण मैलाची) वाट पार करावी लागते

महाद्वारातून येणाऱ्या या वाटेने आल्यावर पहिली इमारत

लागते ती म्हणजे मदारशाचा दर्गा किंवा कबर आग्र्याच्या मुक्कामात शिवाजी महाराजांचे पाय चेपणारा सेवक, प्रसिद्ध मदारी मेहेतर याची ती कबर आहे, असे मानतात. या कबरी-जवळच खडकातून कोरून काढलेला एक तलाव आहे. आज त्यात पाणी नाही. तो कोरडाच आहे त्याला 'हत्ती तलाव' असे नाव आहे खरोखरच मोकळेपणाने हत्तीने जलक्रीडा करावी एवढा तो प्रशस्त आहे ही कबर ओलांडून पुढे आले की 'रायगड जिल्हा लोकल बोर्डाची धर्मशाळा' म्हणून प्रवाशाची सोय करणारी प्रशस्त इमारत आहे. आत विजेचे दिवे आहेत. भाड्याची व अथरूण–पांघरुणाची सोय आहे। या धर्मशाळेनजीक आहे रायगडचा प्रसिद्ध गंगासागर तलाव. सुमारे नव्वद ते शंभर मीटर (म्हणजे तीनशे साडेतीनशे फूट) लांबीरुंदीचा हा तलाव देहभान विसरायला लावणारा आहे राज्याभिषेकाच्या वेळी आणलेले गंगेचे आणि सागराचे तीर्थ ओतून त्याचे गंगासागर हे नाव सार्थ केले आहे गंगासागराच्या दक्षिणेस अष्टकोनी बांधणीचे सुरेख दगडी मनोरे आहेत. त्याचे तीन मजले आज शाबूत आहेत प्रत्येक अंगाने पाहण्यासाठी कमानी महि-रपीच्या खिडक्या आहेत. या मनोऱ्याच्या मागेच शिवाजी महा-राजाच्या राजवाड्याची अजस्र भिंत आहे. या भिंतीच्या कडेला वर जाण्यासाठी 'पालखी दरवाजा' म्हणून प्रवेशद्वार आहे. राजवाड्याचा तट चढून आलो, की महाराजाच्या राजवाड्याचे अवशेष सगळीकडे दिसू लागतात उजव्या बाजूला राणीवसा म्हणून सहा महाल बांधलेले होते. महालासमोरच्या जागेत राजवाड्याच्या विविध महालाचे आणि कचेऱ्याचे चौथरे दिसतात आणि या चौथऱ्याच्या पूर्वेस प्रशस्त जागेत मध्यवर्ती ठिकाणी


असलेला चौथरा आणि छत्रपतींच्या सिंहासनाची जागा होय! छत्रपतींचे सिंहासन! डोळे मिटून क्षणभर भूतकाळात गेले तर



राजप्रासादाचे मनोरे व गंगासागर तलाव, रायगड

सुवर्णसिंहासनावर शिवाजी महाराज बसले आहेत, अष्टप्रधान छत्रचामरे ढाळताहेत, झुंबरांचा लखलखाट आहे, मांडलिक नजराणे देत आहेत आणि सारे प्रजाजन 'सिंहासनाधीश्वर छत्रपती श्रीशिवाजी महाराज की जय!' अशी अत्यानंदाने ललकारी देत आहेत! त्यात आपणही आपला आवाज मिसळून 'शिवाजी महाराज की जय!' असा जयजयकार करून थांबून आणि डोळे उघडून सभोवार पाहू लागतो तो ते सारे दृश्य वितळून गेलेले असते आणि प्रत्यक्षात दिसतात ते उघडे–बोडके, छिन्न–विछिन्न, भगलेले–


मळलेले, दगडाचे अवशेष! भयाण वाऱ्यात, उन्हा-पावसात, वाऱ्या–वादळात उभे असलेले झिजत झिजत जाणारे दगड पण ते इतराना नुसतेच पाषाण आहेत तर मराठी मनाला ते प्रत्यक्ष सिंहासनाप्रमाणेच वद्य आहेत कोणीही मराठी मनुष्य पादत्राणे काढून या जागेला मनोभावे वंदन करून तेथील माती कपाळाला लावल्याशिवाय राहणारच नाही



दरबारहॉलचे प्रवेशद्वार, रायगड

सिंहासनाच्या पुढेच दरबारच्या अवाढव्य मंडपाची प्रशस्त मैदानी जागा आहे आणि त्याच्यापुढे अगदी समोरच दरबार मंडपाचे भव्य प्रवेशद्वार असणारी नगारखान्याची इमारत. ही

इमारत अद्यापही पुष्कळ शाबूत आहे. येथून पुढे प्रशस्त राजरस्ता आहे, तो बाजारपेठेतून जातो बाजारपेठ म्हणजे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या दुकानांचे पुरुषभर उंचीचे दगडी चौथऱ्याचे अवशेष आहेत बाजारपेठेतून जाण्याऐवजी उजव्या हाताने खाली जाणाऱ्या पायवाटेवर प्रथम कुशावर्त तलाव आणि



वाघदरवाजा, रायगड

महादेवाचे मंदिर आहे. कुशावर्ताजवळ शिवाजी महाराजांच्या पत्नी काशीबाई साहेब यांचे नाजुक वृंदावन आणि सोयराबाईसाहेब यांच्या वृंदावनाचा दगडी चौथरा आहे या वाटेने तसेच

खाली गेलो तर आपण वाघदरवाज्याशी पोहोचतो. तेथून खाली उतरणे फारच अवघड आहे.



आल्या वाटेने परत वर आले की आपणास होळीचा माळ लागतो १९७४ साली शिवछत्रपतींच्या तीनशेव्या राज्याभिषेक दिनी झालेल्या महोत्सवाच्या प्रसंगी बसविलेला शिवाजी महाराजाचा पुतळा आहे. बाजारपेठेतून पूर्वेकडे वाटचाल करीत आपण

जगदीश्वराच्या प्रशस्त मंदिरापाशी पोहोचतो. मंदिराच्या सभो-



जगदीश्वराचे मंदिर, रायगड

वती तटबंदी आहे. तटबंदीला भव्य दरवाजा आहे हिरोजी इंदलकर यांनी महाराजांच्या आज्ञेने रायगडावर अनेक नव्या इमारती आणि प्रासाद यांची उभारणी केली त्यातच हा जगदीश्वराचा प्रासाद तो बांधल्याबद्दलचा एक शिलालेखही चांगल्या

स्थितीत येथे कोरला आहे

जगदीश्वराच्या देवालयासमोरच आहे, ते रायगडावरचे परम पवित्र स्थळ–म्हणजे शिवाजी महाराजांची समाधी महाराष्ट्राच्या या पहिल्या छत्रपतीचे चिरकालीन निद्रास्थल. श्रीशिवाजी स्मारक समितीने या स्थळावर अष्टकोनी बांधणीची एक सुरेख मेघडंबरी छत्री बांधली आहे हे काम दिनांक ३ एप्रिल १९२६ रोजी पूर्ण झाले या समाधीनजिकच एका उंच चौथऱ्यावर एका कुत्र्याची पाषाणमूर्ती आहे असे सांगतात की शिवाजी महाराजांच्या या इमानी मूक सेवकाने महाराजांच्या चितेच्या ज्वाला भडकलेल्या दिसताच त्यात उडी मारून आत्मसमर्पण केले



शिवाजीमहाराजांच्या दहनस्थानी उभारलेली छत्री

श्रीशिवाजी महाराजांची समाधी म्हणजे प्रत्येक मराठी माणसाचे तीर्थयात्रेचे एक वंदनीय ठिकाण ! त्यामुळेच रायगडाचे महत्त्व द्विगुणित झाले आहे याशिवाय रायगडावर इतर पाहण्या-

सारखे अवशेष अनेक आहेत; पण सर्वांत भावनोत्कट म्हणजे वरील दोनच स्थळे–सिंहासन आणि समाधी त्यांचे दर्शन घेण्यासाठी प्रत्येक मराठी माणसाने आयुष्यात एकदा तरी रायगडची वारी करायलाच हवी

संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रायगडाला पूर्वीचे वैभव पुन्हा कधी लाभलेच नाही तिकडे दिवसेंदिवस दुर्लक्षच होत गेले. आणि अखेर दुसरे बाजीराव पेशवे पळून जाऊन वसईला इंग्रजांच्या आश्रयास गेल्यावर त्यांची पत्नी वाराणशीबाई यांनी इंग्रजांविरुद्ध किल्ला लढविण्याचा शेवटचा क्षीण प्रयत्न केला. परंतु दिनांक १० मे १८१८ या दिवशी कर्नल प्रॉथर हा इंग्रज सेनापती किल्ल्यावर गेला वाराणशीबाईला त्याने जबरदस्तीने किल्ल्यावरून काढून पुण्याकडे रवाना केले. त्या दिवशीच वाराणशीबाईच्या रूपाने मराठ्यांची राज्यलक्ष्मी या किल्ल्यावरून अंतर्धान पावली आणि महाराष्ट्र पारतंत्र्यात रुतून पडला !

लोकमान्य टिळकांनी रायगडावरूनच श्रीशिवाजी उत्सवाची सुरुवात करून महाराष्ट्राला स्वातंत्र्याची प्रेरणा दिली तेव्हापासून हळूहळू रायगडाला पुन्हा थोडेफार महत्त्व मिळू लागले आणि राष्ट्राला स्वातंत्र्य मिळाल्यापासून तर त्याच्या पूर्व–दिव्यकालाची आठवण कृतज्ञतेने लोक पुन्हा पुन्हा करू लागले आहेत या अशा आठवणीतून पुढच्या यशासाठी तयारी करायची असते त्यासाठी छत्रपती शिवरायाच्या स्मृतीची आणि ती पवित्र स्मृती अहर्निश जपणाऱ्या रायगडाची सदोदित आवश्यकता आहे

□ □

# १० : लोहगड  मावळातील एक किल्ला

पुण्याहून मुंबईस जाताना सुमारे छप्पन्न किलोमीटरवर (म्हणजे सुमारे पस्तीस मैलांवर) मळवली स्टेशन आहे. या स्टेशनाच्या उत्तरेला कार्ल्याची कोरीव लेणी आहेत, तर दक्षिणेला भाज्याची लेणी, भाजे गाव आणि त्यानंतर लोहगड किल्ला आहे. भाज्याहून लोहगड आणि विसापूर हे दोन किल्ले दिसतात. लोहगड आणि विसापूर ही नावे बहुधा बरोबरीनेच येतात. कारण दोन्ही किल्ले अगदी जवळ जवळ आहेत.

खुद्द लोहगडाचा चढण सुरू होण्यापूर्वी अनेक टेकड्या ओलांडाव्या लागतात गड जवळ उभा असलेला दिसतो; पण नाइलाजाने, वळणे घेत, टेकड्यामागून टेकड्या ओलांडतच गड जवळ करावा लागतो. विसापूरच्या बाजूने चढावे लागते. प्रत्येक चढण संपली की आपण विसापूर किल्ल्याकडे चाललो आहोत आणि लोहगड लांब जातो आहे असे वाटते पण आपण जात असतो मात्र लोहगडाकडच !

लोहगडाच्या पूर्वकडून जाणारी वाट मागे टाकून दक्षिण अंगाने आपण चालू लागलो की काही वेळात गडाच्या पायथ्याशी असलेल्या लोहगावी येऊन पोहोचतो. लोहगाव काही फारसे मोठे नाही येथील शेतकरी आसपासच्या टेकड्यावर नाचणी, वरी वगैरे पिके पिकवतात हेच त्याचे उत्पन्न.

खुद्द लोहगडाची चढण येथून सुरू होते. साधारणपणे अर्धा डोंगर चढून गेले की गणेश दरवाजा लागतो. लोहगडाला एकावर एक असे अनेक दरवाजे आहेत त्यापैकी गणेश दरवाजा हा पहिला

दरवाजा. दरवाज्याच्या दोन्ही बाजूना भव्य आणि भक्कम बुरूज आहेत बुरुजाच्या आतल्या अंगाने फिरण्यासाठी तटाला लागून गोलाकार वाट आहे पहाऱ्याच्या जागा आहेत. यानतर नारायण दरवाजा, हनुमान दरवाजा, महा दरवाजा, असे निरनिराळे



एक मजबूत दरवाजा, लोहगड


दरवाजे आहेत. यापैकी हनुमान दरवाजा हा मूळ बाधणीचा आहे. बाकीचे दरवाजे मागून नाना फडणिसानी बाधलेले आहेत लोहगडाइतकी मजबूत द्वाररचना क्वचितच दुसऱ्या किल्ल्यावर आढळेल नारायण आणि हनुमान या दोन दरवाजामध्ये दोन भुयारे आहेत. मराठी राज्य असताना या भुयाराचा कोठारासारखा उपयोग होई नाचणी आणि भात हे पदार्थ या भुयारात साठवून ठेवीत.

दरवाजातून आत शिरल्यावर प्रथम मशिदीसारखी एक इमारत दिसते. या इमारतीत एक थडगे आहे. ते औरगजेबाच्या मुलीचे आहे, असे सागतात. ही इमारत मोडकळीस आली आहे. तिच्या शेजारी असलेली सदर अगदी पूर्णपणे नष्ट झाली आहे. यापुढे

लोहारखान्याची जागा होती, तीचीही पडझड झाली आहे

मशिदीच्या मागच्या बाजूस एक टेकडी आहे तिच्या उजव्या बाजूस एक इमारत होती, ती मोठी सदर. या सदरेच्या मागच्या बाजूस चार गुहा आहेत. तसेच पाण्याचे एक टाकेही आहे सदरेच्या उजव्या बाजूस दोन कोठ्या आहेत एक खालच्या बाजूस आहे तर दुसरी वरच्या बाजूस आहे

येथून आणखी वर गेले म्हणजे एक मोठे आवार लागते येथे एक बंदिस्त जागा दिसते या ठिकाणी एक कबर आणि एक थडगे दिसते कबर ही शेख उमर या अवलियाची, तर थडगे शेख मुजावरचे असावे उमरशहा बाबा, हाजीमलगबाबा आणि पुण्याच्या



थडगी, लोहगड

शनिवारवाड्यासमोरील शेखसल्ला हे तिन्ही संत एका काळचे असावेत शेख उमरच्या दर्ग्याच्या समोर पूर्वेस विसापूर किल्ला आहे, विसापूर किल्ल्याचा सर्व सपाट भाग आणि तट येथून दिसतो ज्या टेकडीवर गुहा आणि टाकी आहेत त्या टेकडीवर एक मोठे तळे आहे इंग्रजांनी जेव्हा हा किल्ला जिंकला, तेव्हा नानांनी लोहगडावर पाठविलेला खजिना या तळ्यात असावा असे त्यांना

वाटले त्यासाठी तळ्याला उताराच्या बाजूने भगदाड पाडून त्यातून पाणी काढून टाकण्यात आले त्यामुळे हा तलाव आज कोरडा आहे इंग्रजांना तेथे धन मिळाले किंवा नाही याचा उल्लेख मिळत नाही

गडाच्या पश्चिमेला विंचूकाटा हा भाग आहे. या ठिकाणी डोंगराची एक लांब सोंड पुढे आली आहे ही सोंड म्हणजे साडे तेराशे मीटर लांब आणि छत्तीस मीटर रुंद ( म्हणजे पचेचाळीशे फूट लांब आणि एकशे वीस फूट रुंद ) अशी नैसर्गिक दगडी भिंत आहे दगडावरची माती निघून गेल्याने ते आता उघडे पडले आहेत या सोंडेची दोन्ही बाजूंनी तटबंदी केली आहे दोन बाजूच्या तटाच्या भिंती टोकाच्या बुरुजाशी एकमेकास येऊन मिळतात टोकाचा हा बुरुज म्हणजे कडेलोटाचे ठिकाण. सोंडेच्या कमीजास्त रुंदीमुळे तट नागमोड होत गेला आहे. यामुळे वरच्या बाजूने पाहाणाऱ्याला हा भाग विंचवाच्या शेपटीसारखा दिसतो, म्हणून त्याचे नाव विंचूकाटा विंचूकाटा हा जरा खालच्या बाजूस आहे त्यावर जाण्यासाठी एक टप्पा उतरून खाली जावे लागते विंचूकाट्याच्या मध्यभागी एक तळे आहे शत्रूला या विंचूकाट्याचे फार भय असे. याच्या टोकाला दोन लांब पल्ल्याच्या तोफा बसविल्या की गडाच्या घेऱ्यात पाय टाकण्याची काही शत्रूची हिंमत होणे शक्य नव्हते. त्यामुळे बोर-घाट रोखून धरण्यास लोहगडाचा फार उपयोग होत असे

लोहगड कोणी बांधला याचा उल्लेख इतिहासात मिळत नाही. पण तो शिवनेरीएवढाच म्हणजे सुमारे दोन हजार वर्षांचा जुना असावा असे अनुमान काढता येते शिवनेरीच्या परिसरात जशा अनेक गुहा आढळतात तशा लोहगडाच्या अंगावर कितीतरी गुहा

आहेत, शिवाय लोहगडाच्या समोरच्याच डोंगरावर भाज्याची लेणी कोरलेली आहेत.

लोहगड हा बोरघाटाचा संरक्षक किल्ला कल्याण आणि सोपारे या बंदरात उतरलेला माल बोरघाट आणि नाणेघाट यातूनच देशावर यायचा बळकटपणामुळे आणि मोक्याच्या जागी असल्या-मुळे प्रत्येकजण लोहगडावर सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करायचा त्यामुळे लोहगडावर अनेक वेळा सत्तान्तरे झाली.

बहामनी राज्यापासून इंग्रजांच्या काळापर्यंत हा गड अनेक सत्ताच्या हाती आला आणि अनेक सत्ताच्या हातून गेला. इ स. १४९१ मध्ये निजामशाहीचा सस्थापक मलिक अहमद याने बहा-मनी सत्तेकडून हा गड जिंकून आपल्या ताब्यात घेतला. नतर विजापूरची आदिलशाही प्रबळ झाली तिने हा किल्ला निजामशाहा-कडून आपल्या ताब्यात घेतला.

आदिलशाहीनंतर शिवाजी महाराजांचे लक्ष लोहगडाकडे वळले, कल्याणचा सुभेदार खूप मोठा खजिना घेऊन विजापूरला जात होता हा खजिना महाराजानी लुटला या लुटीनतर तुग, तिकोना, राजमाची वगैरे किल्ले महाराजांनी जिंकले. याच वेळी त्यानी लोहगडही जिंकला इ स १६४८ साली आदिलशाहीचा पराभव करून महाराजानी हा गड स्वराज्यात सामील करून घेतला. या-नंतर महाराज कोकणातील लोकांच्या विनंतीवरून तळे घोसाळे हे किल्ले जिंकण्यासाठी तिकडे गेले

इ स. १६६४ मध्ये शिवाजी महाराजानी सुरतेवर स्वारी केली तेथे लूट करून अगणित सपत्ती मिळवली एकूण लूट साडे-आठ कोटी होनाची होती मिळालेली सपत्ती अनेक घोड्यांवर लादण्यात आली ती घोडी नेताजीच्या हाती सोपवून महाराज

स्वराज्यात परत आले सुरतेची लूट लादलेली घोडी घेऊन, चारी बाजूना नजर ठेवीत, दक्षतेने पण वेगाने नेताजी लोहगडावर आला लोहगडावरून ती सपत्ती पुढे राजगडाकडे रवाना झाली.

मिर्झा राजा जयसिगाच्या स्वारीत 'शिवाजीराजानी मिर्झा-राजाशी तह केला तेवीस किल्ले मोगलाना दिले आणि बारा किल्ले स्वत कडे ठेवले मोगलाना तेवीस किल्ल्यात लोहगडाचा समावेश होता यानतर पाच वर्षांनी शिवाजीराजांनी तो पुन्हा हस्तगत केला राजाच्या मृत्यूनतर तो पुन्हा मोगलाच्या ताब्यात गेला

राजारामाच्या पदरी कान्होजी आग्रे नावाचा सरदार होता. पश्चिम किनाऱ्याचे उत्तम सरक्षण करून त्याने सरखेल हा बहु-मानाचा किताब मिळविला होता या कान्होजी आग्र्याने लोह-गडावरून मोगलाना हुसकून लावले आणि गड स्वत च्या ताब्यात घेतला

शाहूच्या कारकीर्दीत कान्होजी आग्रे शाहूला जुमानीनासा झाला शाहूचा प्रधान बहिरोपत पिंगळे हा कान्होजीला वठणीवर आणण्यासाठी गेला कान्होजीने त्याचाच पराभव करून त्याला कैदेत टाकले यानतर बाळाजी बाजीराव आग्र्याच्या स्वारीवर निघाला त्याने आग्र्याशी तहाचे बोलणे करून त्याला वश केले. या वेळी कान्होजीने राजमाची किल्ला स्वत कडे ठेवला आणि बाकीचे किल्ले सोडून दिले. त्यात लोहगड शाहूकडे आला बाळाजी बाजीरावाने मराठी सरदारात आणि राज्यात एकी निर्माण करण्यासाठी एका एका सरदारास मुलूख, जहागीर देऊन त्या त्या मुलुखाचा कारभार त्या त्या सरदाराने पाहावा असे सागितले. या वाटणीत स्वत बाळाजीने जो मुलूख आपल्याकडे ठेवला त्यात

लोहगड होता.

थोरले माधवराव निजामावर चालून गेले, त्याच वेळी निजामाने पुण्यावर स्वारी केली निजाम चाल करून येतो आहे असे कळताच पुणेकराचे धाबे दणाणले घेववेल तेवढी संपत्ती घेऊन पुष्कळ लोक पुणे सोडून गेले त्यापैकी काही सावकार व लोक लोहगडाच्या आश्रयास गेले काही किल्ल्यावर गेले तर काहींनी लोहगडाच्या पायथ्याशी तळ दिला परतु निजामाला या ठिकाणाचा पत्ता लागला त्यावर निजामाने छापा घालून वीस लक्ष रुपयाची जिंदगी लुटली

इ स १७७० त नाना फडणिसानी लोहगड आपल्या ताब्यात घेतला आणि धोंडोपत नित्सुरे याला लोहगडावर अधिकारी नेमले नानाचे लोहगडावर फार प्रेम होते नानानी या गडावर खूप सुधारणा करून घेतल्या. विश्रातीच्या काळात ते येथे येऊन राहात असत इ स १८०० त नाना मरण पावले त्याच्या पश्चात त्याच्या पत्नीने—जिऊबाईने लोहगडाचा आश्रय घेतला

नानाच्या मृत्यूनतर लोहगडाचा कारभारी धोंडोपत नित्सुरे आणि बाजीराव याचे काही जमेना बाजीरावाला लोहगड नित्सुऱ्याच्या ताब्यात ठेवायचा नव्हता आणि नित्सुरे लोहगड सोडण्यास तयार नव्हता बरेच दिवस त्याच्या कटकटी चालल्या होत्या. जनरल वेल्स्लीने मध्ये पडून त्याच्यात तडजोड घडवून आणली. लोहगड नित्सुऱ्याच्या ताब्यातच ठेवला आणि नित्सुऱ्याने बाजीरावाचे स्वामित्व कबूल करावे असे त्याने सागितले काही काळ कटकटी थाबल्या, पण धोंडोपताने पुन्हा कुरापती काढण्यास सुरुवात केली तेव्हा जनरल वेल्स्लीने धोंडोपतावर चालून जाण्याचे ठरविले ज वेल्स्ली आपल्यावर चालून येणार हे

कळताच नित्सुरे हादरला आणि गप्प बसला

पुढे बाजीरावाचे आणि इग्रजाचेही पटेना. बाजीराव तहाप्रमाणे वागत नाही हे दिसताच कर्नल प्रॉथर लोहगडाच्या दिशेने निघाला लोहगडावर सरळ सरळ स्वारी करून तो ताब्यात येण्यास वेळ लागेल हे ओळखून त्याने प्रथम विसापूरावर हल्ला करून तो आपल्या ताब्यात घेतला विसापूर इग्रजाच्या ताब्यात गेल्याचे दिसताच लोहगडाने आपले मरण ओळखले. प्रॉथरला प्रतिकार करण्याचे अवसानच गळून पडले गडावरच्या माणसानी आपण होऊन गड खाली केला बदुकीची एकही गोळी न झाडता लोहगड इग्रजाच्या ताब्यात आला[1] १८१८ पासून १८४५ पर्यंत इग्रजानी आपली शिबदी येथे कायम ठेवली होती. इग्रजाची सत्ता महाराष्ट्रात स्थिर झाल्यानतर लोहगडावरची शिबदी काढून घेण्यात आली

नतरच्या काळात एक प्रेक्षणीय असे जुने ऐतिहासिक ठिकाण एवढेच महत्त्व लोहगडास उरले कार्ले आणि भाजे या प्रसिद्ध लेण्याच्या परिसरात हा किल्ला असल्याने आजही अनेक प्रवासी हा किल्ला पाहायला जातात

□ □

# ११ : सिंधुदुर्ग   शिवरायाची मूर्ती असलेला किल्ला

सिंधुदुर्ग कोकणात मालवणजवळ समुद्रात उभा आहे बेळगाव-पर्यंत रेल्वेने जाऊन त्यापुढे मालवणला जाणारी एस. टी मिळते. पुणे-मुबईहून मालवणला जाणाऱ्या थेट एस. टी च्या गाड्या आहेत. मालवण बदरापासून सुमारे दीड किलोमीटर म्हणजे सुमारे मैलभर चालावे लागते. पुढे साधारण दोनशे मीटर (म्हणजे फर्लांगभर) अतर नावेतून जायचे नेहमी सिंधुदुर्गात जा–ये करणाऱ्या नावा इथे आहेत. नाव किल्ल्याच्या ईशान्य बाजूस असलेल्या महाद्वाराजवळ येऊन थाबते हे महाद्वार मालवणच्या बाजूस आहे.

लाबून महाद्वार एकदम नजरेत येते पण दुरून दिसते तसे ते दर्शनी नाही किल्ल्याचा तट दोन्ही अगानी आत वळतो. या दोन तटांच्या मधील चिचोळ्या भागातून पुढे गेले की समोर महा-दरवाजा दिसतो, शत्रूचा हल्ला झालाच तर त्याची झळ दरवाजाला लागू नये म्हणून ही अशी रचना असते.

सिंधुदुर्ग बाहेरून तेवढा भव्य दिसत नाही पण त्याचा घेर सुमारे तीन किलोमीटर (म्हणजे जवळ जवळ दोन मैल) आहे, तर त्याचे क्षेत्रफळ सुमारे वीस हेक्टर (म्हणजे सुमारे अठ्ठेचाळीस एकर) आहे या बेटाचा आकार उचसखल असल्याने किल्ल्याचे बाधकामही तसेच करावे लागले पुष्कळ ठिकाणी त्याची टोके बाहेर आली आहेत. त्यामुळे फायदा असा होतो की प्रसगी शत्रू एखाद्या ने ठरविले लाच तर दुसऱ्या टोकावरून त्यावर फारच चांगला म तो.

पाणी स्वच्छ आहे या विहिरीच्या शेजारीच शंकराची पिंडी आहे इथे जवळच आणखी दोनतीन विहिरी आहेत एकीचे नाव दूधबाव, दुसरीचे नाव दहीबाव, तर तिसरीचे नाव साखरबाव खाऱ्या पाण्याच्या समुद्राने वेढलेल्या जमिनीवर गोड्या पाण्याच्या विहिरी असाव्यात हे केवढे आश्चर्य ! ही निसर्गाची किमया ! दुर्गातील लोकांचे जीवन या पाण्यावरच उभे आहे. या पाण्यावरच ते भाजीपाला पिकवितात

इथून जवळच जुन्या राजवाड्याची जागा दिसते. आज राजवाड्याचे फक्त काही अवशेष शिल्लक आहेत या राजवाड्याच्या जागेच्या पश्चिमेला भगवतीदेवीचे देऊळ आहे या देवळाच्या पाठीमागे दर्याबुरुज आहे या बुरुजावर उभे राहिले की खाली भला मोठा वळणावळणाचा खडक दिसतो समोर दहा मीटर उंचीचा तट असल्यानेच केवळ आत पाणी शिरत नाही पण इतकी वर्षे समुद्राच्या लाटा आपटून आपटून इथला सुमारे आठ ते दहा मीटर म्हणजे सुमारे पंचवीसतीस फूट लांबीचा तट पडला आहे भरतीच्या वेळेला पाणी किल्ल्यात शिरते आणि ओहोटीच्या वेळी ओसरून जाते पावसाळ्यात तर विचारायलाच नको !

दर्याबुरूजावरून खाली उतरून आता आपण दक्षिण तटाव जाऊ सिंधुदुर्गाच्या तटावर चढण्यासाठी दर दीड-दोनशे हाताव जिने ठेवले आहेत या जिन्याची संख्या पंचेचाळीस भरते त्यामुळे कुठूनही तटावर चढता येते. तटाची रुंदी कुठे चार मीटर तर कुठे त्याहूनही जास्त अर्धवर्तुळाकृती बुरुजाच्या ठिकाणी ही रुंदी खूपच वाढते सिंधुदुर्गाला एकूण बेचाळीस बुरूज आहेत दोन बुरुजातील अंतर सुमारे छत्तीस मीटर ते एकशेवीस मीटर (म्हणजे ४० ते १३० यार्ड) भरते या बुरुजामध्ये तोफाच

ऱ्यासाठी भोके ठेवली आहेत.

पश्चिमेच्या जिन्याने आता आपण खाली येऊ या ठिकाणी तटाला एक चौकोनी छिद्र आहे या छिद्रातून पलीकडे किनाऱ्या-वर उतरता येते. किनाऱ्यावर सगळी वाळू पसरली आहे. राणीच्या समुद्रस्नानाची जागा म्हणून हे स्थान प्रसिद्ध आहे ही राणी म्हणजे कोल्हापूरच्या ताराबाई. शाहूमहाराज दक्षिणेत आले तेव्हा त्या त्याच्या भयाने इकडे पळून आल्या होत्या. सहा महिने थे राहिल्या होत्या

या जागवरून परत यताना वाटत दोन मळीव चुन्याचे ढीग दिसतात किल्ल्याच्या बाधकामाला वापरून उरलेला हा चुना आहे आज या चुन्याचा अभेद्य खडक बनला आहे

आता किल्ल्यातील सगळ्यात महत्त्वाची गोष्ट पाहायची हिली आणि ती म्हणजे शिवरायाच्या पावलाचे आणि हाताचे . हे ठसे किल्ल्याच्या ईशान्य भागातत आहे दरवाजातून आत रताच उजव्या बाजूच्या बुरुजावरील घुमटीत उजव्या हाताचा आ आणि अलिकडे तटावरील घुमटीत आहे चुन्यात उठवलेला व्या पायाचा तळवा

महाराज आपल्या गुणी कामगारानी उभारलेली वास्तू निरखत रत असतील आपल्या मनातील दुर्ग जसाच्या तसा प्रत्यक्षात भा राहिलेला पाहून त्याचा ऊर अभिमानाने आणि कारागिराच्या तुकाने भरून आला असेल सिद्दीच्या जजिऱ्याच्या तोडीला तोड रा जजिरा उभा केल्याचे समाधान महाराजाच्या मुखावर ळकत असेल स्वराज्यातील तो पहिला जजिरा पहाताना खाली ल्या चुन्यात त्याचे पाऊल सहजपणे उमटले असेल कामावरच्या रागिराने ते कौतुक पाहिले असेल आणि ते कौतुक अमर

करण्यासाठी त्याने ते पाऊल तसेच वाळू दिले असेल आणि म त्यावर घुमटी उभारली असेल आज आपले केवढे भाग्य की आपण छत्रपतींच्या पावलाचा ठसा पाहू शकतो ! त्या शहाण्य कारागिराने आपल्या त्या कृतीने महाराष्ट्रावर केवढे उपका करून ठेवले आहेत !

हाताचा ठसा हा साधारणपणे छातीएवढ्या उंचीवर आहे. तो उतरता आहे पाची बोटे पसरलेली आणि चांगली लांबसड आहेत मात्र गेली सव्वातीनशे वर्षे किल्ला पाहायला येणाऱ्यांन त्या ठशात आपले हात ठेवून ठसा अगदी पुसट करून टाक आहे

पायाच्या ठशाचे मात्र तसे नाही तो तटावर आहे. त्याव सुमारे एक मीटर उंचीची घुमटी आहे या घुमटीचे प्रवेशद्वार सुमारे पचवीस सेंटीमीटर उंच आणि वीस सेंटीमीटर रुंद (म्हण दहा इंच उंच आणि आठ इंच रुंद) असे चिंचोळे आहे. आत तों घालून पहाता येत नाही अडचणीच्या जागी असल्याने त्या छायाचित्रही घेता येत नाही.

जंजिरा घेण्यासाठी महाराजांनी सिद्दीबरोबर अनेक वेळा लढाय केल्या, पण त्यांना यश आले नाही. मोगलांनी सिद्दीला केलेल मदत, सिद्दीचे समुद्रावरील वर्चस्व आणि अलिप्त राहून इंग्रजान केलेली मदत यामुळे सिद्दी अजिंक्य राहिला सिद्दीला तोंड द्याय तर आपण आरमारी क्षेत्रात प्रगती केली पाहिजे, हे महाराजा ओळखले. ‘ज्यास अश्वबल त्याची पृथ्वी, त्याचप्रमाणे ज्याच्य जवळ आरमार त्याचा समुद्र,’ हे शिवाजीमहाराजांनी मनोम जाणले. ही दूरदृष्टी बाळगणारे शिवाजीमहाराज हे तत्काली एकमेव हिंदी राजे होते, असे म्हटले तर त्यात मुळीच अतिशयोक्ती

होणार नाही. महाराजानी आपले आरमार तयार करविले. आरमाराचे नेतेपण दर्याखान आणि दौलतखान या दोघावर त्यानी सोपविले आता त्या आरमाराच्या रक्षणासाठी एक बुलंद ठाणे महाराजाना हवे होते. उत्तरेस जंजिरा आणि दक्षिणेस गोवा या दोन किल्ल्याची उदाहरणे महाराजाच्या डोळ्यासमोर होतीच. जंजिऱ्याच्या जोरावर व्यापार वाढतो आणि त्यासाठी लढाऊ आणि व्यापारी आरमार पाहिजे हे राजानी जाणले त्या दृष्टीने महाराजाची नजर समुद्रकिनाऱ्यावर फिरू लागली.

कोकणात मोहिमेवर फिरताना महाराजानी समुद्राचे दर्शन घेतले. महाराज कोकणात मालवणजवळ आले महाराजाबरोबर कोकणातील स्थानिक माहितगार मंडळीही होती. या मंडळींत कृष्ण सावंत देसाई आणि भानजी प्रभु देसाई हे प्रमुख होते. महाराज मालवणच्या किनाऱ्यावर उभे होते. समोर अफाट सागर पसरला होता. महाराजाची शोधक नजर सागरावरून फिरत होती महाराजाची नजर एका ठिकाणी स्थिर झाली मालवण-पासून अंदाजे कोसभर अंतरावर भर समुद्रात महाराजाना एक बेट दिसले. ते पाहून महाराजाचे कुतूहल जागृत झाले महाराजानी आपल्याबरोबरच्या मंडळींना बेटाचे नाव विचारले बेटाचे नाव होते कुरटे बेट.

कुरटे बेटावर जाऊन येण्याची महाराजाना इच्छा झाली. माहितगार मंडळींना बरोबर घेऊन महाराज बेटावर दाखल झाले बेटावर ते खूप भटकले. बेटाच्या मध्यावर गोड पाण्याचा झरा पाहून ते थक्कच झाले. 'चहूकडे खारे पाणी असताना हे अमृतासारखे गोड पाणी म्हणजे ईश्वराची अगाध देणगीच' असे महाराजाना वाटले

# १२ : जंजिरा एक अजिंक्य जलदुर्ग

शिवाजीमहाराजासून तो थेट नाना फडणिसापर्यंत जंजिरा किल्ला जिंकण्याच्या अनेक मोहिमा मराठ्यानी केल्या, पण जंजिरा शेवटपर्यंत अजिंक्यच राहिला.

एक प्रसंग. मध्यरात्र उलटून गेली. सर्वत्र अंधारच अंधार होता. डोळ्यात बोट घातले तरी काही दिसत नव्हते दर्या शांत होता. तटावरचे पहारेचौक्या शांत होत्या शिपाई पेंगाळले होते. सर्वत्र वातावरण शांत होते अंधारातून दोन लहानग्या होड्या तटाच्या दिशेने पुढे पुढे सरकत होत्या. त्यांची हालचाल इतक्या शांतपणे चालली होती की तटावरील पेंगुळलेल्या पहारेकऱ्याना त्यांची कल्पनासुद्धा येऊ शकली नाही

होड्या हळूहळू पुढे सरकत तटाला भिडल्या ! आतील माणसांनी बरोबर आणलेल्या शिड्या तटाच्या भिंतीला लावल्या. शिड्या पक्क्या लागल्याची त्यांनी खात्री केली. किल्ल्यावर चढून जाणाऱ्या जवानाची वाट पहात होड्यातील मंडळी होड्यात बसून राहिली !

वेळ क्षणाक्षणाने जात होता. प्रत्येक मोलाचा क्षण काळसागरात उडी घेत होता. डोळ्यात जीव आणून होड्यातील मंडळी जाणाऱ्या शिपायाची वाट पहात होती. पहाट होत आली तरी कुणी येण्याचे चिन्ह दिसेना. शेवटी होडीतील मंडळी कंटाळली. निराश झाली. दिवस उगवेपर्यंत थांबण्याची सोयच नव्हती. वरच्या हबशी सिद्दींना चाहूल लागली तर सर्वनाश होणार हे ओळखून निराश झालेल्या मंडळींनी तटाला लावलेल्या शिड्या काढल्या आणि

आपल्या होड्या किनाऱ्याकडे हाकारल्या. ते कधी आले, कुठून आले, परत केव्हा गेले ते कुणाला म्हणजे कुणालाही कळले नाही. शत्रूला त्यांचा सुगावाही लागू शकला नाही.

१६७५ च्या ऑगस्टमध्ये मोरोपतानी जंजिऱ्याची मोहीम सुरू केली. त्या मोहिमेतील हा प्रसंग सुरुवातीला होड्यावर आणि तराफ्यावर तोफा चढवून जंजिऱ्याच्या तटबंदीवर चौफेर मारा करण्यात आला, पण जंजिऱ्याच्या अभेद्य तटबंदीपुढे तोफाचा उपयोग झाला नाही. शेवटी मोरोपतानी हा धाडसी डाव टाकण्याचे ठरविले


अलिबाग येथे लाय पाटील नावाचा कोळ्याचा एक नायक होता जंजिऱ्याला शिड्या लावण्याचे काम मोरोपतानी त्याच्यावर सोपविले जिवावर उदार होऊन लाय पाटलाने काम स्वीकारले आणि पुरेही करून दाखविले वर सांगितलेला प्रसंग तो हाच मोरोपत आपल्या सैनिकासह वेळेवर हजर राहू न शकल्याने एवढे मोठे धाडस पाण्यात गेले. जंजिऱ्याची ही मोहीम फसली.

महाराजानी लाय पाटलाच्या धाडसाचे कौतुक केले त्यानी पाटलाला पालखीचा सन्मान देऊ केला. पाटलाने नम्रतेने तो नाकारला महाराजानी पाटलाला होडी बांधून दिली आणि होडीला नाव दिले 'पालखी.'

लाय पाटलाने जिवावर उदार होऊन ज्या किल्ल्याच्या तटाला शिड्या लावण्याचे काम पत्करले तो जंजिरा होताच तसा जबरा. लाय पाटलाच्या धाडसाचे महाराजानी कौतुक केले ते त्यासाठीच. महाराजांच्या लेखी त्याचे धाडस महत्त्वाचे होते, त्याच्या प्रयत्नाला आलेले अपयश त्याचे नव्हते!

असा हा इतिहासात गाजलेला जंजिरा किल्ला कुला-

जिल्ह्यात मुरुड गावाजवळ आहे. मुरुडच्या खाडीतच तो उभा आहे किल्ल्याच्या सर्व बाजूनी आहे. रात्रंदिवस गरजणारा अथांग दर्या ! किल्ल्यात जाण्यासाठी मुरुडची खाडी ओलांडावी लागते त्यासाठी इथे शिडावर चालणाऱ्या बोटी आहेत. या बोटी खाडीतुन किल्ल्यात जा–ये करतात



प्रवेशद्वार, जंजिरा

जंजिऱ्याचे प्रवेशद्वार पूर्वदिशेला आहे त्यामुळे बोटीने जाताना ..जला जावे लागते समुद्राला ओहोटी असली तरच त्याच्या प्रवेशद्वाराशी नीट उतरता येते. भरतीच्या वेळी होडी किल्ल्याच्या पायऱ्याना स्पर्श करते, पण ती एका जागी थाबू शकत

नाही. लाटावर हेलकावे घेत रहाते मग उतरणाऱ्याने होडी पाय-रीला लागली रे लागली की उडी मारायची पावसाळ्यात तर पाणी प्रवेशद्वाराच्या कमानीत शिरून सुमारे पाच–साडेपाच फूट उंच होते आतल्या देवडीपर्यंत लाटांचे सपके बसतात.

महाद्वारातून आत शिरले की डाव्या हाताला आणखी एक उपद्वार आहे या उपद्वारातून आत शिरले की आपण किल्ल्यात प्रवेश करतो इथे उजव्या हाताला पचायतन पीराची एक खोली आहे पूर्वी या जागी रामपचायतन होते. याच ठिकाणी सिद्दीच्या राजघराण्यातील काही कबरीही आहेत.

किल्ल्याच्या मध्यभागी दारुगोळ्याचे कोठार आहे आणि त्याच्या पश्चिमेला खजिन्याची कोठी आहे किल्ल्यात एकदा दोन तलाव आहेत. एक आहे किल्ल्याच्या दक्षिण भागात व दुसरा आहे वायव्य भागात. दक्षिण बाजूला असणाऱ्या तलावातील पाणी अगदी हिरवेगार आहे इथे राहाणारे लोक हे पाणी पिण्यासाठी वापरतात असे सांगितले तरी विश्वास बसणार नाही. य तळ्याला लागूनच एक इमारत आहे ती इमारत म्हणजे सुरुल खानाचा वाडा होय किल्ल्यात तीन मोहल्ले आहेत एक कोळी महार वगैरे लोकांचा आहे, आणि बाकीचे दोन मुसलमानांचे आहेत

बालेकिल्ल्यामध्ये सुमारे साठ मीटर म्हणजे (सुमारे दोनशे फूट) उंचीवर एक चारखणी वाडा आहे याला म्हणतात सुरुल खानाचा वाडा सुरुलखान हा येथील पहिला नवाब या वाड्याच्या खालच्या बाजूला कोळीवाडा आहे त्या ठिकाणी जुन्या पद्धतीच्या शिल्पाचे अवशेष दिसतात किल्ल्याचा मूळ देव सिद्ध होता.




सुरुलखानाचा वाडा, जंजिरा

आता आपण तटाच्या कडेने फेरी मारू ... काही ठिकाणी आतून जिने ठेवले अ... प्रचंड आहे. त्याला एकूण एकोणतीस ...

...ा पिरम- ...न स्वत त्याची ...गळे दारूच्या नशेत ... सैन्याने त्यांना कापून ...विला

दोन बुरुजामधील अंतर नव्वद फूट आहे. प्रत्येक बुरुजाला कमानी आहेत आणि प्रत्येक कमानीत तोंड बाहेर काढलेली तोफ आहे यापैकी ज्या तोफा पितळी आहेत, त्या युरोपियन बनावटीच्या आहेत. तर ज्या लोखंडी आहेत त्या देशी बनावटीच्या आहेत कलालबांगडी, चावरी, आणि लांडाकासम या तीन प्रसिद्ध तोफा इथे पाहायला मिळतात ध्वज उभारण्याच्या जागेजवळ जी तोफ दिसते तिचे नाव कलालबांगडी तिच्याच शेजारी दुसरी चावरी आणि तिसरी लांडाकासम



जजिरा किल्यावरील तीन अजस्र तोफा ·
र कलाल बांगडी, मधली चावरी, शेवटची लांडा कासम

र आले की समोर कासाबेटावरचा पद्मदुर्ग
जिऱ्याचा पाडाव करण्यासाठी शिव-
न पश्चिमेला आल्यावर जजिऱ्याचा

दर्या दरवाजा आहे त्याच्याजवळच धक्का आहे कितीही भरती आली तरी हा धक्का पाण्याखाली जात नाही शत्रूच्या वेढ्यातून निसटण्याच्या कामी सिद्दीला अनेक वेळा या दर्या दरवाजाचा उपयोग झाला आहे.

जजिऱ्याच्या जागी पूर्वी एक मेढेकोट होता राजापुरीला मुख्यत कोळ्यांची वस्ती होती. लुटारू आणि चाचे यांचा या कोळ्यांना फार त्रास होई तेव्हा या लुटारूंना तोंड देण्यासाठी राजापुरीच्या निजामी ठाणेदाराची परवानगी घेऊन कोळ्यांनी एक मेढेकोट उभारला मेढेकोट म्हणजे मोठाले ओंडके जमिनीत एकापुढे एक रोवून बंदिस्त केलेली जागा. कोळी आता मेढेकोटात राहू लागले राम पाटील हा या कोळ्यांचा म्होरक्या होता तो महत्त्वाकांक्षी होता मेढेकोटाचा आश्रय मिळताच आपण राजे झालो असे त्याला वाटले त्याने ठाणेदाराला मेढेकोटात पाऊल घालण्यास बंदी केली. शेवटी त्याचे पारिपत्य करण्यास निजामशहाने पिरमखान नावाच्या सरदाराला पाठविले.

पिरमखान चतुर होता सरळसरळ हल्ला केल्यास राम पाटील आपल्याला दाद देणार नाही हे त्याने ओळखले. त्याने आपली गलबते खाडीत नांगरून ठेवली आपण दारूचे व्यापारी आहोत, असे सांगून त्याने राम पाटलाच्या लोकांना फसविले. पिरमखानाने त्यांना खूप दारू पाजली राम पाटलासाठीही काही दारूच्या बाटल्या पाठविल्या राम पाटील खूष झाला. पिरमखानाने मेढेकोट बघण्याची इच्छा दर्शविताच त्याने स्वत त्याची गलबते मेढेकोटास आणून लावली. रात्री सगळे दारूच्या नशेत बेशुद्ध होऊन पडले असता पिरमखानाच्या सैन्याने त्यांना कापून काढले आणि मेढेकोटावर ताबा मिळविला.

पिरमखानानंतर त्याच्या जागी बुऱ्हाणखान आला. मेढेकोटाच्या जागी मजबूत किल्ला बांधण्याची कल्पना प्रथम या बुऱ्हाणखानाच्या डोक्यात आली त्याने बादशाहाची परवानगी घेऊन बांधकाम सुरू केले. १५६७ ते १५७१ या काळात इथे हा सध्याचा बुलंद जलदुर्ग उभा राहिला. बुऱ्हाणखानाचे स्वप्न साकार झाले त्याने या किल्ल्याचे नाव ठेवले मेहरूब (चंद्रकोर) जंजिरा हा शब्द अरबी भाषेतील जझीरा या शब्दावरून रूढ झाला आहे त्याचा अर्थ आहे बेट.

इ. स १६१७ त सिद्दी अंबर हा बादशाहाकडून स्वतंत्र जहागिरदारीची सनद घेऊन आला. जंजिरा संस्थानचा मूळ पुरुष समजला जातो तो हा सिद्दी अंबर,

हे सिद्दी मूळचे ॲबिसीनियातील. व्यापाराच्या निमित्ताने ते कोकण किनाऱ्याला आले पोर्तुगिजांचा विजय होत होता, तोपर्यंत त्यांचा व्यापार चांगला चालला. पुढे त्यांनी बहमनी राज्यात नोकरी पत्करली दणकट प्रकृती, मूळची शूर वृत्ती यामुळे याही क्षेत्रात ते मागे राहिले नाहीत त्यांनी मोठमोठ्या हुद्द्याच्या जागा मिळविल्या. जंजिरा बांधणारा बुऱ्हाणखान त्यांच्यापैकीच एक सिद्दी किल्ला बांधल्यापासून ते भारत स्वतंत्र होईपर्यंत इथे सिद्दींचीच सत्ता होती. १६१७ पासून तीनशे तीस वर्षे त्यांनी जंजिरा आणि आसपासच्या प्रदेशावर राज्य केले. अनेकांनी जंजिरा घेण्याचे प्रयत्न केले, पण जंजिऱ्याचा हा सिद्दी सगळ्यांना पुरून उरला

शिवरायांनी आपल्या कारकीर्दीत सिद्दीला झुकून हलविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले; पण त्यांना यश आले नाही. ३१ जुलै १६५७ रोजी शिवरायांनी रघुनाथ बल्लाळ सबनीस आणि

निळोपंत याना फौजा देऊन जजिऱ्यावर पाठविले. 'दंडा राजपुरी येथील हबशी घरातील उदीस जैसा–तैसा!' हा विचार महाराजाच्या मनात नेहमीच घोळत होता रघुनाथपंतानी तळे-घोसाळे काबीज करून थेट राजापुरीवर धडक मारली तेथील आसपासच्या भागातील सिद्दीच्या फौजाचाही पराभव केला परतु शेवटी तह झाला

इ स १६५९ मध्ये महाराजानी शामराज नीळकठ याना जजिऱ्याच्या मोहिमेवर पाठविले सिद्दी खैर्यतखानाने विश्वास दाखवून शामराजपतास किल्ल्यात भेटीस बोलाविले भेटीस आल्यावर विश्वासघाताने त्याना कैद केले. 'पुन्हा जजिऱ्याच्या वाटेला जाणार नाही' असे त्याच्याकडून वचन घेतले आणि मग त्याना सोडून दिले स्वराज्याच्या पेशव्याने शत्रूच्या कपटाला बळी पडावे आणि स्वराज्याच्या अब्रूला काळिमा फासणारे वचन देऊन खालच्या मानेने परतावे, हे अर्थातच महाराजाना आवडले नाही. त्यानी शामराजपताचे पेशवेपद काढून घेतले आणि त्या जागी नरहरी आनदराव याना पेशवा नेमले त्यानाही वर्षाच्या आत काढून महाराजानी त्याच्या जागी मोरोपताची नेमणूक केली

१६६९ सालच्या मे महिन्यात परत जजिऱ्यावर मोहीम आखण्यात आली. मराठी सेनेने जिद्दीने सिद्दीच्या मुलखात जोरात धडक मारली मराठ्याच्या हल्ल्याची प्रखरता सहन न होऊन दडा राजपुरीत असलेला सिद्दी तिथून जजिऱ्यात गेला. जजिऱ्यापुढे मात्र मराठ्याचे काही चालेना राजापुरीभोवती तटबदी उभारून, जागोजाग चौक्या–पहारे बसवून मराठ्यानी हल्ल्याची तीव्रता वाढविली त्यातच भर म्हणून जजिऱ्यापासून जवळच कासा बेटावर पद्मदुर्ग बाधण्यात आला. एका जजिऱ्याचा पाडाव

करण्यासाठी त्याच्याच शेजारी सिद्दीच्या हल्ल्याना तोंड देत असताना हा दुसरा जजिरा बाधण्यात मराठी सेनेला यश आले. आता सिद्दीची धडगत दिसेना मराठ्याच्या हल्ल्याने तो हैराण झाला जजिरा महाराजाना देण्यास सिद्दीफत्तेखान तयार झाला ! महाराजाच्या इतक्या वर्षांच्या प्रयत्नाना यश येऊ पहात होत. जजिरा स्वराज्यात येऊ बघत होता !

...पण नाही ! स्वराज्याच्या नशिबात, मराठ्याच्या दैवात जजिरा नव्हता महाराजाची इच्छा पुरी होणार नव्हती जजिरा महाराजाना देऊ करण्यास तयार झालेला सिद्दी फत्तेखानच तुरुगात पडला सिद्दी सबूळ, सिद्दी कासीम आणि सिद्दी खैर्यत या तीन शूर वीरानी जजिऱ्याचा कारभार आपल्या हाती घेतला आणि जजिरा शौर्याने लढविण्यास सुरुवात केली त्यानी औरगजेबाचे स्वामित्व मान्य करून त्याच्याकडे मदत मागितली. सिद्दीच्या मदतीला मोगल आले मोगल आरमाराने मराठ्याची पन्नास गलबते नष्ट केली मराठ्याची किनाऱ्यालगतची गावे जाळली

हातातोंडाशी आलेला जजिरा गेलेला पाहून महाराज कष्टी झाले. मोहीम मात्र चालूच राहिली १६७२ च्या मार्च महिन्यात होळी पौर्णिमेच्या दिवशी पद्मदुर्गावरील लोक दारू पिऊन धुद झाले आहेत, शत्रूविषयी अगदी गाफील आहेत, असे पाहून सिद्दी कासिम आणि सिद्दी खैर्यत यानी पद्मदुर्गावर हल्ला चढविला मराठ्याचा दारूखाना पेटला सिद्दी कासीम शिडया लावून सैन्यासह तटावर चढला. मराठ्यानी निकराचा प्रतिकार केला पण आधी बेसावध असल्याने त्याचा काहीही उपयोग न होऊन पद्मदुर्ग शत्रूच्या ताब्यात गेला

यानतर झाली ती सुरुवातीला सागितलेली मोरोपताची मोहीम.

मोरोपतांच्या मोहिमेनंतर १६७८ च्या जुलै महिन्यात महाराजांनी परत जंजिऱ्यावर स्वारी केली. मराठ्यांच्या हल्ल्यापासून आपल्या आरमाराचे रक्षण व्हावे म्हणून सिद्दी कासीम आपले आरमार घेऊन मुंबईला गेला. महाराजांनी माजगाव येथील सिद्दीचे आरमार जाळून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु पोर्तुगिजांच्या विरोधामुळे तो प्रयत्न फसला १६७८ च्या डिसेंबरातही महाराजांनी पुन्हा जंजिरा घेण्याचा प्रयत्न केला या वेळी सिद्दी कासीम मुंबईहून आरमार घेऊन जंजिऱ्याच्या मदतीस आल्याने मराठ्यांना वेढा उठवावा लागला

महाराज आणि सिद्दी यांतील संघर्ष अखेरपर्यंत चालू राहिला. मोगल, पोर्तुगीज, इंग्रज वगैरेंनी सिद्दीला वेळोवेळी साहाय्य केल्याने महाराजांच्या प्रयत्नांना यश आले नाही तसेच अफझलखान, शाहिस्तेखान, मिर्झाराजांची स्वारी, आग्र्यातील बंदिवास वगैरे अनेक अतिशय अवघड प्रसंगांतून जावे लागल्याने जंजिऱ्याकडे लक्ष देण्यास महाराजांना हवा तेवढा वेळ मिळाला नाही. आपण दर्यावर्दीपणात मागे आहोत ही सिद्दीचा पराभव करण्यातील मोठी अडचण आहे, हे ओळखून महाराजांनी आपली सागरी सत्ता बळकट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांना म्हणावे तसे यश आले नाही. अखेरपर्यंत जंजिरा जिंकल्याचे समाधान महाराजांना मिळू शकले नाही

छत्रपति शिवरायांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाची फूस मिळाल्याने सिद्दी मराठी राज्यात धुमाकूळ घालू लागला पनवेल-पासून ते चौलपर्यंतचा किनारा त्याने उद्ध्वस्त केला संभाजी-राजांनी सिद्दीचा पाडाव करण्याचा निश्चय केला. दर्यासारंग दौलतखानाच्या मदतीने त्यांनी दीडशे गलबतांचे आरमार सज्ज

करून दादजी रघुनाथ याच्या हाती मोहिमेची सूत्रे दिली.

दादजी रघुनाथने १६८२ साली जजिऱ्याला वेढा दिला महिनाभर त्याने तोफांचा भडिमार चालू ठेवला जजिऱ्याचा तट जागोजागी कोसळला पण सिद्दी नमला मात्र नाही दादजीने भेदनीतीचा अवलंब करून बघितला, पण तो फसला नंतर मात्र सिद्दी कासीमने जोर करून मराठी सैन्याला खाडीतून पळवून लावले या पराभवाने संभाजीराजे संतापले सिद्दीचा समाचार घेण्याचा निर्णय घेऊन संभाजीराजानी त्याच्यावर जातीने चाल केली सिद्दी कासीमनेही कडेकोट तयारी केली त्या कासीम बहादुराने जजिरा शर्थीने लढविला संभाजीराजाबरोबर वीस हजार फौज होती सव्वाशे मराठी गलबते तयार होती महिनाभर सारखा भडिमार करून जजिऱ्याची सारी तटबंदी संभाजीराजानी ढासळून टाकली पण अखेर खवळलेल्या समुद्रापुढे त्याचे काही चालेना तेव्हा संभाजीराजे आपल्या सहकाऱ्याना म्हणाले, "जजिरा समुद्रात असल्यामुळे जमिनीवरून त्यावर नीटसा मारा लागू पडत नाही ना? मग घाबरता काय? सुमारे सातशे मीटर रुंद आणि सत्तावीस मीटर खोल (म्हणजे चोवीसशे फूट रुंद आणि नव्वद फूट खोल) तर सारी खाडी. राजापूरची माती घ्या आणि बुजवून टाका ही सारी खाडी, म्हणजे आपले पायदळ नेऊन जजिरा जमिनदोस्त करून टाकू." रामाने समुद्रावर सेतू बांधून लंकेवर स्वारी केली त्यातलाच हा प्रकार!

संभाजीराजाच्या आज्ञेप्रमाणे काम सुरू झाले मराठी सैन्य राजापुरीच्या डोंगरावरील दगड आणून खाडीत टाकू लागले अर्धापाऊण खाडा हा हा म्हणता भरून निघाली थोड्याच दिवसात संपूर्ण खाडी भरून निघाली असती जजिऱ्यापर्यंत स्थलमार्ग

तयार झाला असता पण मराठ्यांचे दुर्दैव आड आले स्वराज्या-वर औरंगजेबाचा हल्ला आला. संभाजीराजांना तिकडे जावे आणि जंजिऱ्याची मोहीम अर्धवटच राहिली

पुढे पेशव्यांनीही जंजिरा घेण्यासाठी खूप प्रयत्न केले. १७१६ साली कान्होजी आंग्र्यांनी जंजिऱ्यावर हल्ला चढविला बाळाजी विश्वनाथानेही कान्होजी आंग्र्यांना हवे ते साहाय्य दिले पण तरीही त्यांना सिद्दीला तिथून हलविता आले नाही.

१७४६ च्या स्वारीत तानाजी सुर्वे यांनी सिद्दीला ठार केले. सिद्दी रहमान घाबरला त्याने आपल्या बारा महालांपैकी सहा महाल पेशव्यांना नजराणा म्हणून दिले; पण जंजिरा सोडला नाही. १७५५ या नंतरच्या काळात पेशव्यांनी पुन्हा जंजिऱ्यावर स्वारी केली या वेळी त्यांनी फिरंग्यांचीही मदत घेतली सिद्दीची कोंडी करून सगळे त्याच्या शरणागतीची वाट पाहत थांबले पण सिद्दीने सगळ्यांवर मात केली सगळ्यांचा डोळा चुकवून तो मुंबईला पळून गेला. इंग्रजांनी त्याला आरमारी मदत दिली. इंग्रजांच्या हस्तक्षेपामुळे पेशव्यांना माघार घ्यावी लागली

नाना फडणीसांनीही आपल्या कारकीर्दीत जंजिरा घेण्याचा प्रयत्न केला नानांचा विश्वास शक्तीपेक्षा युक्तीवर अधिक होता जंजिऱ्याचा वारस बाळूमियां याला हाताशी धरून जंजिरा मिळविण्याचा त्यांचा डाव होता परंतु सिद्दी अब्दुल्लानंतर बाळू-मियाला डावलून सेनापती सिद्दी जोहारने गादी बळकावल्याने नानांचा हा डाव फसला.

अनेक हल्ल्यांना तोंड देत जंजिरा शेवटी अजिंक्य राहिला. भारत स्वतंत्र होईपर्यंत सिद्दीचा हा जंजिरा कुणालाही घेता आला नाही जंजिऱ्याचा इतिहास पाहिला की आठशे मीटर

लांबीचा, अडीच किलोमीटर परिघाचा म्हणजे अर्धा मैल लाबीचा, दीड मैल परिघाचा आणि एकोणीस बुरुजाचा असा हा वर्षानुवर्षे सागराशी, वाऱ्यापावसाशी झगडत आपले अभंगत्व टिकवून ठेवणारा जजिरा जर शिवाजीमहाराजांच्या ताब्यात आला असता तर त्याचा इतिहास किती बदललेला दिसला असता असा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९३
क्र. 29223

# १३ : अहमदनगर   एक प्रचंड भुईकोट किल्ला

महाराष्ट्रात काही भुईकोट किल्ले आहेत त्यापैकी अहमदनगरचा भुईकोट किल्ला हा एक प्रसिद्ध किल्ला आहे

अहमदनगरच्या सभोवती डोंगर आहेत त्यामुळे या किल्ल्याला जणू काही डोंगराचाच प्रचंड असा नैसर्गिक तट लाभलेला आहे अहमदनगर शहर आणि भिंगार उपनगर याच्या मध्यभागी हा किल्ला डौलाने उभा आहे. दौंड–मनमाड लोहमार्गावरील अहमदनगर स्टेशनापासून सीना नदी ओलांडून पूर्वेला सुमारे तीन किलोमीटरवर म्हणजे दोन मैलावर हा किल्ला आहे.

या किल्ल्याच्या भोवती भव्य असा खंदक खोदलेला आहे. पूर्वी तो पाण्याने तुडुंब भरलेला असायचा; पण हल्ली मात्र त्यात जंगल वाढलेले आहे हा खंदक कोठे सुमारे सत्तावीस मीटर ( म्हणजे सुमारे नव्वद फूट ) तर कोठे सुमारे चौपन्न मीटर ( म्हणजे सुमारे एकशेऐंशी फूट) रुंद आहे. त्याचा परीघ सुमारे सतराशे मीटर ( म्हणजे सुमारे छप्पनशे फूट) आहे.

या किल्ल्याचा तट संपूर्ण दगडी असून त्याची बांधणी फारच भक्कम आहे तटाची रुंदी सुमारे दोन मीटर आणि उंची सुमारे तेहेतीस मीटर आहे. इ. स १५५९ ते १५६३ या चार वर्षांत हजारो मजूर या तटाच्या बांधणीसाठी खपले तटाला चोवीस बुरुज आहेत त्या बुरुजामधून, खंदकाखालून दूरवर गेलेली भुयारे खोदलेली आहेत

परभणीजवळील पाथरी येथील भैरव भट कुलकर्णी हा दुर्गादेवीच्या दुष्काळात पोट भरण्यासाठी कर्नाटकात गेला होता. तेथे

त्याला बहमनी सरदाराने बाटवून मुसलमान केले. भैरवभट आणि त्याचा मुलगा तमाभट याना अहमदशाहाबलीच्या शिकारखान्यात बहिरी पक्ष्याच्या सरक्षणाची कामगिरी दिली होती भैरवभटाला नाव मिळाले मलिक हुसेन आणि तमाभट बनला मलिक अहमद! मलिक हुसेनच्या कर्तबगारीने पुढे त्याला हजार स्वाराची मनसब-दारी मिळाली नतर तेलंगणाची मामलत आणि निजाम उल् मुल्क या किताब हुसेनला मिळाला


मलिक अहमद यालाही जुन्नर आणि बीड येथील जहागिरी मिळाली, मल्लिक हुसेन हा मोठा कर्तबगार आणि मुत्सद्दी होता त्याने बहमनी राज्याचा प्रधान महमद गवान याला ठार मारून बहमनी राज्याची प्रधानकी स्वतःकडे घेतली. मलिक अहमद याने सन १४८५ च्या सुमारास जुन्नर भागात स्वतःचे निजामशाही राज्य स्थापन केले

इ. स १४८९ मध्ये बेदरच्या शाहाने या निजामशहावर बीड बाजूने हल्ला केला. इमामपूरच्या घाटात घनघोर लढाई झाली' त्या युद्धात निजामशाहाला जय मिळाला ती विजयाची जागा बिंकर–भिंगार जवळ होती म्हणून त्या ठिकाणी अहमद निजाम-शाहाने एक स्मारक तळ उभारला

दिनाक २८ मे १४९० रोजी अहमद निजामने त्या जागी मोठा विजयोत्सव केला आणि एक छोटासा राजवाडा बाधून त्याला नाव दिले कोटबाग निजाम ! त्या काळचा योगच असा होता की राजा, प्रधान, काजी आणि सेनापती या चौघाचीही नावे 'अहमद' अशीच होती म्हणून या राजवाड्याभोवती वसलेल्या राजधानीला नाव दिले गेले अहमदनगर '

पुढे या अहमदनगराचे वैभव अगदी बगदाद-बसऱ्याप्रमाणे व्हावे—

या जिद्दीने तेथील इमारती भव्य, मजबूत आणि सुंदर बांधल्या गेल्या पण कोटबाग निजामचा तट मात्र मातीचाच होता. याच तटातील राजवाड्यात इ. १५०८ मध्ये अहमद निजामशाहा मरण पावला त्यानंतर बऱ्याच वर्षांनी सलाबतखान या प्रधानाने मूळचा हा 'कोटबाग-निजाम' भक्कम दगडी तटाचा बांधून त्याचा भुईकोट किल्ला बनविला



किल्ले अहमदनगर

या किल्ल्याच्या चोवीस बुरुजांपैकी अरबी बुरुजानजीकच याचे मुख्य प्रवेशद्वार आहे त्या प्रवेशद्वाराच्या दरवाजाला मोठमोठे लगरी खिळे ठोकलेले आहेत हत्तींनी जर या दाराना धडक

दिली तर खिळे हत्तीच्या मस्तकात शिरत आणि हत्तीची पीछे-हाट होई.

अरबी बुरुजाखेरीज नारगी, राज, छज्जा दौलतखानी, आतष-खानी, शहा, रहमानी आणि हुसेनी किंवा सोंड बुरुज (यालाच फत्ते बुरुजही म्हणतात ) असे बरेच बुरुज पाहाण्यासारखे आहेत चोवीस बुरुजाना अशीच वेगवेगळी नावे आहेत. या बुरुजाचा प्रचडपणा, भक्कमपणा आणि त्याची बाधणी पाहून आपण थक्क होतो फत्ते बुरुजावर किल्ल्याचे मुख्य निशाण डौलाने फडकत असते

खंदकावर जो झुलता पूल आहे त्यावरून किंवा आता सैन्याने बाधलेल्या पुलावरून किल्ल्याच्या आत जाता येते.

तटाची उत्तर बाजूची एक भित, जी पुन्हा बाधून काढलेली दिसते ती या किल्ल्याची एक मोठी आठवणीची गोष्ट आहे

अहमदनगरच्या हुसेन निजामशाहाची मुलगी चादबिबी हिचे लग्न विजापूरच्या सुलतान अली आदिलशहा याच्याशी मोठ्या थाटात झाले. त्यावेळी अहमदनगरच्या किल्ल्यात तयार केलेली मुलुखमैदान नावाची प्रचड तोफ नजराणा म्हणून दिली गेली

अली आदिलशाहा मरण पावल्यावर चादबिबी आपल्या माहेरी अहमदनगरास परत आली. तिने निजामशाहीच्या पडत्या काळात राज्य सावरण्याची खटपट केली. तिने इ. स. १५९४ त बहादुर-शाहा निजामास गादीवर बसवून स्वत: कारभार केला.

दिल्लीपती अकबराला ही गोष्ट कळाली तेव्हा त्याने अहमद-नगर काबीज करण्यास आपला मुलगा मुराद याला मोठ्या फौजेसह पाठविले. मुरादने १५९६ मध्ये नगरवर हल्ला केला.

लढाईला तोंड लागले. चांदबिबी आपल्या सैनिकाना उत्तेजन

देत किल्ल्यात फिरत होती तिच्या उत्तेजनाने सैनिकाना स्फूर्ती येत होती ते प्राणपणाने किल्ला लढवीत होते.

मुरादच्या सैन्याचा जोरही काही कमी नव्हता. तरीसुद्धा किल्ला हस्तगत होत नव्हता. एका स्त्रीविरुद्ध आपण विजय मिळवू शकत नाही ? धिक्कार असो आपल्या पराक्रमाचा मुराद स्वतःवरच चिडत होता वारंवार सैनिकाना जोराने हल्ला करण्याच्या आज्ञा तो देत होता त्याचे सैनिकही त्वेषाने लढत होते मालकाच्या पदरात यश घालण्यासाठी धडपडत होते. अखेर एके दिवशी सध्याकाळी मुरादच्या सैनिकानी यश मिळवले किल्ल्याच्या तटाला खिंडार पडले ! आता विजय आपलाच ! उद्या सकाळी या खिंडारातून आपले सैन्य किल्ल्यात घुसेल. हा हा म्हणता किल्ला आपल्या ताब्यात येईल ! मुराद सुखस्वप्ने रगवीत होता त्याच्याबरोबर त्याचे सैनिकही !

इकडे किल्ल्यात काय अवस्था होती ? किल्ल्यातले सैनिक खरोखरच काळजीत पडले होते प्रत्येकाला मनोमन खात्री वाटत होती. उद्या सकाळी या खिंडारातून मोगली सैन्य किल्ल्यात शिरणार थोपवून थोपवून किती वेळ त्यांना थोपविणार ? एक तास, दोन तास फार तर तीन तास ! मग ? मग काही नाही ! फक्त पराभव ! पूर्ण शरणागती !

शरणागती ? किल्ल्याच्या तटाला खिंडार पडले म्हणून पराभव ? का ? यावर काहीच उपाय नाही का ? आहे, उपाय आहे ! कोणता ? मोगली सैन्य चालून येण्याच्या आत हे खिंडार बुजवून टाकायचे ! होत्याचे नव्हते करून टाकायचे !

पण, पण हे कसे शक्य आहे ? एका रात्रीत एवढे मोठे खिंडार कसे बुजविणार ?

छे ! असा नुसता विचार करण्यात वेळ घालवून उपयोग नाही ! आता कृतीच करायला पाहिजे किल्ल्याच्या संरक्षणाचा हाच एक उपाय आहे ही एकमेव संधी आहे ही संधी दवडून चालणार नाही !

चांदबिबी उठली. तिने सैनिकाना जमवले. त्यांना आपला विचार सांगितला त्या निराशेच्या वातावरणातही सैनिकाचे चेहरे आनंदाने फुलले

गवंडी आले, पाथरवट आले खिंडार बुजविण्याचे काम सुरू झाले स्वत चांदबिबी कामावर देखरेख करीत होती रात्र सरत होती खिंडार कमी कमी होत होते कामगाराचे हात वेगाने काम करीत होते किल्ल्यातील प्रत्येक सैनिकाच्या तोंडावर आता प्रखर आत्मविश्वास दिसत होता झुजण्याची जिद्द दिसत होती.

दुसरे दिवशी मोगल सैन्य उठले ते विजयाची स्वप्ने रंगवीतच सगळ्या सैनिकानी तयारी केली इषारा झाल्यावर सगळे सैनिक निघाले ...किल्ल्याकडे....काल सध्याकाळी पडलेल्या खिंडारातून आत घुसायला

सगळे सैनिक अगदी तयारीनिशी किल्ल्याजवळ आले. राणीच्या सैनिकाचा प्रतिकार सुरू झाला मोगल सैनिक समोर बघतात तो काय– खिंडार कुठे आहे ? खिंडार गायब ! सैनिकाचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना ! त्यानी डोळे चोळून परत पाहिले, पण समोरच्या तटाची भिंत जशीच्या तशी तिच्यावर निजामशाहाची फौज लढाईसाठी सिद्ध स्वत चाँद सुलताना हाती तरवार घेऊन फौजेला हुकूम देत उभी आहे

मुरादला बातमी गेली. तो चकितच झाला. त्याने स्वत आघाडीवर येऊन खात्री केली. आता मात्र मुरादला पटले – ही

चादबिबी सामान्य नाही ! हिचे सैनिक सामान्य नाहीत. तटाला पडलेले खिंडार एका रात्रीत बुजविण्याची ही जिद्द जोपर्यंत याच्याजवळ आहे तोपर्यंत आपला विजय होणे शक्य नाही.

मुरादने आपल्या सैन्याला मागे फिरण्याची आज्ञा दिली लढाई संपली मुरादने चादबिबीशी तह केला आणि खाली मान घालून तो दिल्लीला परतला !

चादबिबीने मोठ्या हिमतीने अहमदनगरच्या निजामशाहीचे रक्षण केले ती कर्तृत्ववान होती तिने अनेक मजबूत इमारती बाधल्या तिचा महाल, खलबतखाने, भिस्तबाग, फराहबाग वगैरेंच्या अष्टकोनी इमारती अजूनही मजबूतपणे उभ्या आहेत.

चादबिबीचा शेवट मात्र त्यावेळच्या निजामशाही सरदारानी फारच वाईट केला. तिचा खून झाला तिचे प्रेत तेजाबाच्या राजणात टाकून जाळून टाकले गेले. चादबिबीचे नाव मात्र नगरच्या इतिहासात आणि किल्ल्याच्या स्मारकात कायमचे कोरले गेले

शूर चादबिबीने नगरजवळ शहा डोंगरावर एक भव्य अष्टकोनी दगडी महाल बाधलेला आहे. तो अद्यापही आहे. तेथून देवगिरी किल्ल्यावरील दिवा दिसतो असे म्हणतात चादबिबीची अशी अनेक स्मारके अहमदनगरला आहेत नगरच्या इतिहासात चादबिबीला महत्त्वाचे स्थान आहे.

अहमदनगरच्या किल्ल्यात तोफाचे ओतीव काम चालत असे. ‘चुलबिरुबीखान’ नावाच्या ओताऱ्याने विजापूरला दिलेली प्रसिद्ध ‘मुलुख मैदान’ तोफ आणि ‘धूळधाण’ नावाची तोफ येथेच तयार केली अहमदनगरची निजामशाही राखण करणारा काळचा पत्तराचा पहारेकरी म्हणजे हा किल्ला. तो बाधण्यात अनेक कारागिरानी आपली कला ओतली आहे.

इ. स १६३६ मध्ये अहमदनगरची निजामशाही समाप्त झाली. नतर स्वत औरंगजेबाने १६४० मध्ये या किल्ल्याची डागडुजी केली १६५० मध्ये शिवाजीमहाराजानी अहमदनगरवर हल्ला केला दिल्ली दरवाज्यातून प्रवेश करून त्यांनी हे आठपेठ नगर आणि कोट तट पाडून मोगलाना माती चारली हत्ती, घोडे आणि बरेचसे द्रव्य शिवाजीला येथे मिळाले


छत्रपती शाहू राजानी नगर ही राजधानी करण्याचे ठरविले होते १७५९ मध्ये नगरचा किल्लेदार कवि जग यास राशीनची जहागीर देऊन फितुरीने सदाशिवराव भाऊसाहेब यानी हा किल्ला ताब्यात घेतला. १७९७ मध्ये शिंद्यानी या किल्ल्याचा ताबा मिळविला ता. १२ सप्टेंबर १८०३ रोजी हा किल्ला इग्रज सेनापती जनरल वेलस्ली याने पेशव्याकडून घेतला त्याचे स्मारक म्हणून त्याने एक तोफ किल्ल्याबाहेरील पूर्व बाजूच्या मैदानात चबुतऱ्यावर ठेवून तिच्याखाली तसा शिलालेख कोरून ठेवला आहे.

नगरच्या किल्ल्यात अनेक ठिकाणे अशी आहेत की त्याचा शोध प्रख्यात इजिनियरानाही अद्याप लागलेला नाही. उदाहरणार्थ पाण्याचे नळ, भुयारे, भिंती, गुहा, इत्यादी.

नगर किल्ल्यातील पूर्वीच्या काही इमारती अद्यापही कायम आहेत उदाहरणार्थ सध्या मिलिटरीची स्टेशन स्टाफ ऑफिसेसची इमारत ! मात्र चादबिबी राहात होती तो गगनमहाल, निजामाचा सोन महाल, मुल्क आबाद, मीनामहाल, रूपमहाल वगैरे बऱ्याच इमारतींचे आता केवळ भग्नावशेष शिल्लक आहेत

गगा, जमुना, शक्कर, मच्छली वगैरे नावाच्या अनेक विहिरी या किल्ल्यात आहेत. त्याना भरपूर, स्वच्छ आणि गोड पाणी

सतत असते बीड (चपावतीनगर) येथील खजाना विहिरीमधून सव्वाशे किलो मीटरवरून (सुमारे ८० मैलावरून) पाण्याचे प्रचंड भुयारी नळ पूर्वी नगरला आणले होते. पूर्वी या अहमदनगर राजधानीत पाणीच पाणी होते.



अहमदनगर किल्ल्याचे प्रचंड बुरुज

या किल्ल्यात पूर्वी अनेक लोकाना तुरुगवास घडला. राजकीय बड्या लोकाचा तुरुग म्हणूनही या किल्ल्याची प्रसिद्धी आहे

इ. स. १६३६ मध्ये अहमदनगरची निजामशाही समाप्त झाली नतर स्वत. औरंगजेबाने १६४० मध्ये या किल्ल्याची डागडुजी केली १६५० मध्ये शिवाजीमहाराजानी अहमदनगरवर हल्ला केला दिल्ली दरवाज्यातून प्रवेश करून त्यानी हे आठपेठ नगर आणि कोट तट पाडून मोगलाना माती चारली हत्ती, घोडे आणि बरेचसे द्रव्य शिवाजीला येथे मिळाले


छत्रपती शाहू राजानी नगर ही राजधानी करण्याचे ठरविले होते. १७५९ मध्ये नगरचा किल्लेदार कवि जग यास राशीनची जहागीर देऊन फितुरीने सदाशिवराव भाऊसाहेब यानी हा किल्ला ताब्यात घेतला १७९७ मध्ये शिद्यानी या किल्ल्याचा ताबा मिळविला ता १२ सप्टेंबर १८०३ रोजी हा किल्ला इग्रज सेनापती जनरल वेलस्ली याने पेशव्याकडून घेतला. त्याचे स्मारक म्हणून त्याने एक तोफ किल्ल्याबाहेरील पूर्व बाजूच्या मैदानात चबुतऱ्यावर ठेवून तिच्याखाली तसा शिलालेख कोरून ठेवला आहे.

नगरच्या किल्ल्यात अनेक ठिकाणे अशी आहेत की त्याचा शोध प्रख्यात इजिनियरानाही अद्याप लागलेला नाही. उदाहरणार्थ पाण्याचे नळ, भुयारे, भिती, गुहा, इत्यादी

नगर किल्ल्यातील पूर्वीच्या काही इमारती अद्यापही कायम आहेत. उदाहरणार्थ सध्या मिलिटरीची स्टेशन स्टाफ ऑफिसेसची इमारत ' मात्र चादबिबी राहात होती तो गगनमहाल, निजामाचा सोन महाल, मुल्क आबाद, मीनामहाल, रूपमहाल वगैरे बऱ्याच इमारतींचे आता केवळ भग्नावशेष शिल्लक आहेत

गगा, जमुना, शक्कर, मच्छली वगैरे नावाच्या अनेक विहिरी या किल्ल्यात आहेत. त्याना भरपूर, स्वच्छ आणि गोड पाणी

सतत असते. बीड (चंपावतीनगर) येथील खजाना विहिरीमधून सव्वाशे किलो मीटरवरून (सुमारे ८० मैलावरून) पाण्याचे प्रचंड भुयारी नळ पूर्वी नगरला आणले होते. पूर्वी या अहमदनगर राजधानीत पाणीच पाणी होते.



अहमदनगर किल्ल्याचे प्रचंड बुरुज

या किल्ल्यात पूर्वी अनेक लोकाना तुरुंगवास घडला. राजकीय बड्या लोकाचा तुरुंग म्हणूनही या किल्ल्याची प्रसिद्धी आहे.

मूर्तिजा निजामाची आई खुजाहुमायून येथील तुरुगातच ठार झाली स्वत मूर्तिजा निजामही याच तुरुगात ठार झाला इ स. १७७८ मध्ये पेशव्याचे कारभारी मोरोबादादा फडणीस याना पेशव्यानी बडखोर म्हणून याच किल्ल्यात कैदेत ठेवले होते नाना फडणीसानाही याच किल्ल्यात बदिवास घडला तुळोजी आग्रे, नतरच्या काळात महायुद्धातील जर्मन व बोअर लोक युद्धकैदी म्हणून येथे ठेवले होते

अलीकडच्या काळात या किल्ल्यात लष्कराच्या सोयीसाठी अनेक नव्या इमारती बाधल्या आहेत भारताचे श्रेष्ठ नेते १९४२ च्या ‘ चलेजाव ’ चळवळीच्या प्रसगी इग्रजानी या किल्ल्यात कैदेत ठेवले होते त्याच्या आठवणी या किल्ल्यात जपून ठेवल्या आहेत सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, शकरराव देव वगैरे पुढाऱ्याना १९४२ मध्ये सरकारने याच नगरच्या किल्ल्यात ठेवले होते पडित जवाहरलाल नेहरू त्या काळी याच किल्ल्यात कैदेत होते तेव्हा त्यानी ‘ डिस्कव्हरी ऑफ इडिया ’ (भारताचा शोध) हे पुस्तक येथेच लिहून काढले त्यानी स्वत लावलेले आणि वाढविलेले डाळिबाचे झाड आजही येथे पाहायला मिळते.

असा हा अहमदनगरचा किल्ला. हा भुईकोट किल्ला हल्लीच्या काळात सुद्धा डौलात उभा आहे महाराष्ट्रातील काही जुने भुईकोट किल्ले भुईसपाट झालेले आहेत परतु नगरचा किल्ला मात्र महाराष्ट्राचे भूषण म्हणून अजून टिकलेला आहे.

या किल्ल्याच्या फत्ते बुरुजावरून तिरगी झेंडा डौलाने सतत फडकत असलेला नगर शहराच्या पचक्रोशीतून पाहून प्रत्येक माणसाची छाती अभिमानाने फुलून जाते. हा किल्ला पाहण्यासाठी दूरदूरचे लोक मुद्दाम येतात “ पूर्व दिव्य ज्याचे त्याना रम्य भावी काळ ” हाच सदेश जणू काही हा किल्ला सतत देत असतो.

□ □

# १४. सज्जनगड — समर्थांचे विश्रांतिस्थान

रामदासाचा मुक्काम एकाच ठिकाणी क्वचित असे ते नेहमी फिरते असत कधी चाफळला तर कधी शिवथर घळीत. कधी शिंगणापूरच्या रानात तर कधी चंद्रगिरीच्या डोंगरात शिवाजी महाराजाना वाटे, समर्थांनी आता निवान्तपणे एका ठिकाणी राहावे. एकदा समर्थ चाफळ येथे असताना शिवाजी महाराज चाफळला गेले रामरायाच्या दर्शनानंतर शिवाजी महाराज समर्थांना म्हणाले, "महाराज, आता चाफळास राहाण्याऐवजी सातान्याजवळ परळीचा किल्ला आहे, तिथं आपण नित्य राहावं अशी विनती आहे."

समर्थ म्हणाले, "परळीला राहायला जायच तर चाफळची व्यवस्था कोण पहाणार ?"

शिवराय म्हणाले, "आम्ही पाहू !" लगेच महाराजानी दत्ताजी त्रिमल वाकनीस याना बोलावून घेतले आणि चाफळच्या उत्सवाची आणि नित्याच्या कार्यक्रमाची व्यवस्था केली. मग शिवरायाची विनती समर्थांनी ऐकली

समर्थ चाफळहून निघाले. ते हत्तीवर बसले. माहुताचे काम कल्याणस्वामींनी आपणाकडे घेतले बरोबर अनेक मंडळी होती. अशा तऱ्हेने मोठ्या थाटात समर्थ रामदासस्वामींनी परळीच्या किल्ल्यात प्रवेश केला. शिवरायानी किल्ल्यावर समर्थांच्या राहाण्याची वगैरे व्यवस्था केली होतीच सन १६७६ च्या सुमारास समर्थ परळीच्या किल्ल्यावर राहायला आले या निमित्ताने अनेक संत सज्जनाचा मेळा परळीच्या किल्ल्यावर

जमला. शिवाजी महाराजाच्या सूचनेप्रमाणे गडावर सगळी व्यवस्था होत होती. गडावर अनेक कार्यक्रम झाले रंगनाथस्वामी, जयरामस्वामी, उद्धवस्वामी, वेणाबाई, अक्का, कल्याणस्वामी या सान्याची कीर्तने झाली सगळ्याच्या आग्रहावरून आणि समर्थांच्या सूचनेवरून शिवरायानीही थोडा वेळ कीर्तन केले. शेवटी समर्थांनी कीर्तन केले. या सुमारास समर्थांना भेटायला अनेक संत-सज्जन परळीच्या किल्ल्यावर येत, त्यामुळे किल्ल्याचे नाव पडले सज्जनगड.

यानतर समर्थांचे राहाणे सज्जनगडावरच असे. चैत्रात राम-नवमीच्या उत्सवापुरते ते चाफळला जात. सज्जनगडावर शिष्य आणि सेवेकरी मिळून पचवीस तीस माणसे नित्य असत बाराही महिने समर्थांना भेटायला अनेक मडळी येत. शिवाजी महाराजही [illegible] मधून अधून सज्जनगडावर यत.

साताऱ्याच्या नैर्ऋत्य दिशेला सुमारे दहा किलो मीटरवर (म्हणजे सुमारे सहा मैलावर) परळी हे गाव आहे. ये[illegible]न उरमोडी ही नदी वाहते. या गावापासून अगदी निकट परळीचा किल्ला आहे. त्याची समुद्रसपाटीपासून उची समारे [illegible] तीन हजार फूट ) आहे. परळीचा किल्ला सर्व बाजूंनी [illegible] डोंगरांनी वेढलेला आहे गडाच्या पश्चिम दिशेला खेड–चिपळूण या कोकणातील गावाकडे जाण्याचा रस्ता आहे उत्तरेला महाबळेश्वर, प्रतापगड, रायगड याच्याकडे जाण्याचा रस्ता आहे. दक्षिणेस चाफळकडे जाण्याचा मार्ग आहे. परळीच्या ईशान्येस सुमारे दहा किलोमीटरवर (सुमारे सहा मैलावर) साताऱ्याचा अजिमतारा किल्ला आहे असा परळीचा किल्ला मोक्याच्या ठिकाणी वसलेला आहे.

या किल्ल्याचे अगदी जुने नाव म्हणजे आश्वलायन गड. येथे अश्वलायन ऋषीचा आश्रम होता, अशी दतकथा आहे. आश्वलायन गडाचा अपभ्रश होऊन हे नाव झाले अस्वलगड. कदाचित जुन्या काळात येथील रानात काळीकाळी अस्वलेही असतील परळी गावाच्या जवळचा म्हणून हा परळीचा किल्ला. पुढे समर्थ रामदास येथे राहू लागल्यापासून त्याला नाव मिळाले सज्जन गड सातान्याहून एस् टी. ने आपण परळीस आलो. येथील श्रीराम-मदिरातील श्रीरामाचे दर्शन घेऊन गडावर जायला निघू गडाची चढण सुमारे दोन किलो मीटर (दीड मैल) आहे गड चढण्या-साठी समर्थ सेवा मडळाने पायऱ्या बांधलेल्या आहेत वाटेत विश्रातिस्थानेही आहेत अर्धाअधिक गड चढून गेल्यावर समर्थांचे पट्टशिष्य कल्याण याचे मदिर लागते. हे मदिर समर्थसेवा मडळाने बाधले आहे येथून वाऱ्याने समर्थांची छाटी उडाली आणि ती पकडण्यासाठी कल्याणस्वामींनी उडी घेतली. येथून वर नजर टाकली की रामघळ दिसते समर्थ या घळीत बसून राम-रायाचे चितन करीत

पुढे चालू लागल्यावर एका बाजूने मारुतीरायाचे व दुसऱ्या बाजूला गोमातेचे मदिर लागते. नतर लागतो पूर्व दरवाजा. याच्या पुढे महादरवाजा त्यातून आत शिरताच दोन्ही बाजूना देवडचा आहेत. येथे एका बाजूला हनुमान आणि दुसऱ्या बाजूला वराह याच्या मूर्तींची स्थापना भगवान श्रीधर स्वामींनी केली आहे हे दोघे म्हणजे गडाचे जणू काही द्वारपालच. उजव्या बाजूच्या भितीत फारसी भाषेत कोरलेला एक शिलालेख आहे.

दरवाजातून वर गेल्यावर डाव्या हातच्या बुरुजापाशी आगलाई देवीचे देऊळ आहे समर्थांना अगापूरच्या डोहात दोन मूर्ती

सापडल्या एक प्रभु रामरायाची त्या मूर्तीची स्थापना समर्थांनी चाफळ येथे मंदिर बांधून केली दुसरी मूर्ती देवीची. तिची स्थापना समर्थांनी सज्जनगडावर केली तीच ही आगलाईची मूर्ती ही महिषासुरमर्दिनीची मूर्ती चतुर्भुज चार हाताची आहे हातात आयुधे असून तिने एका हाताने महिषाची जीभ ओढून धरली आहे. व डावा पाय महिषावर रोवलेला आहे आगलाईचे मूळचे मंदिर स्वत समर्थांनी बांधलेले होते समर्थ सेवा मंडळाने त्याचा जीर्णोद्धार केला आहे देवळाच्या आतल्या अंगाला बसण्याचा ओटा आहे देवळासमोरील बुरूज हे एक उच्च ठिकाण आहे मंदिरातील ओट्यावर देवीसमोर बसून समर्थ चिंतन करीत आणि बुरुजावर बसून समोरचा निसर्ग खासच पाहात असतील!

परत रस्त्यावर आले की उजव्या बाजूला दोन कबरी आहेत समर्थांचे शिष्य बनून दोन मुसलमान गडावर राहिले होते. त्यांचा शेवट समर्थ असतानाच झाला त्यांच्या या कबरी आहेत

येथून मठाकडे जायला निघाल्यावर उजव्या बाजूला 'पेठेतील मारुती' आहे या मंदिराजवळ पूर्वी बाजार पेठ होती आणि आताही उत्सवाच्या दिवसांत येथे दुकाने थाटतात, म्हणूनच असू हा 'पेठेतील मारुती' मारुतीरायाच्या मागील बाजूला पिण्याच्या पाण्याचे तळे आहे आणि समोरच्या बाजूला 'श्रीधरकुटी'ची प्रशस्त इमारत आहे

आता समोर थोडे चालून गेले की समर्थांचा मठ दिसतो. त्याच्या उजव्या हाताला दिसते ते समर्थांचे समाधिमंदिर मठाची मूळ इमारत शिवरायांनी बांधली समर्थ सज्जनगडावर या इमारतीत राहात आत त्यांचे शेजघर—निजण्या बसण्याची जागा आहे शेजघरात शिवरायांनी समर्थांना दिलेला पितळी खुराचा

पलग आहे पलगावर ठेवलेले समर्थांचे चित्र तजावर मठाचे भीमस्वामी यांनी त्या काळात काढले आहे शेजघरात समर्थांच्या वापरातील अनेक वस्तू जपून ठेवल्या आहेत.

हा जवळ ठेवलेला मोठा हडा पाहा परळी गावाजवळून वाहाणाऱ्या उरमोडी नदीतून या हड्याने कल्याणस्वामी पाणी आणीत जवळच समर्थांची कुबडी, काठी, गुप्ती, वाकडा सोटा, समर्थ वापरीत तो तांब्या, लोटा, विड्याच्या पानाचा डबा, पिकदाणी, वल्कल आणि समर्थांचा फेटा या वस्तू येथून जपून ठेवल्या आहेत


समर्थ एकदा तजावरास गेले होते तेथील एका अंध कारागिराला त्यांच्यामुळे दृष्टी लाभली या कारागिराला समर्थांनी राम, लक्ष्मण, सीता, हनुमान यांच्या मूर्ती करायला सागितल्या. त्या मूर्ती गडावर आणण्यात आल्यावर या शेजघरातील ओट्यावर ठेवल्या या मूर्तींची पूजा समर्थांनी चार दिवस केली आणि समर्थांनी आपली अवतारसमाप्ती केली

□ □

मठाच्या उत्तरेस मुख्य देवालय आहे ज्या ठिकाणी समर्थांच्या पार्थीव देहाचे दहन झाले, त्या जागेवरच मदिर बाधले आहे. हे मदिर छत्रपती सभाजीमहाराजानी बाधविले मदिरात रामदासानी तजावरहून आणलेल्या पचधातूच्या राम, लक्ष्मण, सीतामाई आणि हनुमान अशा मूर्ती आहेत रामरायाच्या डाव्या हातात धनुष्य आहे. उजव्या हातात बाण आहे. मान थोडी उजवीकडे झुकली आहे मदिर बाधून झाल्यावर पितळी सिंहासनावर या मूर्तींची स्थापना झाली जवळच समर्थांची एक धातू मूर्तीही आहे मूर्तीखाली भुयारात समर्थांची समाधी

आहे खाली जायला दगडी जिना आहे. समाधीपुढे येताच आपले हात जोडले जातात आणि मस्तक नम्र होते. समर्थांच्या समाधी मागील कोनाड्यात पितळी पेटीत समर्थांच्या पादुका आहेत. समाधीच्या मुख्य चिन्हाला उभी भेग आहे भक्तांना समाधीची पूजाअर्चा करून श्रीचरणी मस्तक ठेवता येते

समाधीचे दर्शन घेऊन वर मंदिरात यावे आणि रामरायाचे पुन्हा दर्शन करून बाहेर पडावे मंदिराबाहेर अशोक वन आहे. मंदिराबाहेर नैऋत्य कोपऱ्यात मारुती मंदिर आणि वायव्य कोपऱ्यात समर्थ शिष्या वेणाबाईंचे वृंदावन आहे वेणाबाई इ स



सज्जन-गडावरील समर्थांचा मठ


१६७८ मध्ये चैत्री पौर्णिमेला समर्थ असतानाच त्यांच्या चरणी विलीन झाल्या राममंदिरापुढील उत्तर भागात समर्थांच्या दुसऱ्या शिष्या आक्काबाई यांचे वृंदावन आहे समर्थांच्यानंतर



समर्थांच्या शेजघरातील चित्राची चित्रकारानी केलेली प्रतिकृती

सुमारे चाळीस वर्षे त्यानी सज्जनगडावरील मदिराचा कारभार पाहिला

हल्ली गडावरील व्यवस्था 'श्री समर्थ सेवा मडळ' पाहाते. मडळाने भक्तासाठी पाणी, वीज, निवारा याच्या अनेक सोयी केल्या आहेत



समर्थांच्या समाधि-स्थानावरील राममदिर

१६८० च्या चैत्री पौणिमेला शिवसूर्याचा अस्त झाला तर १६८१ च्या माघ वद्य नवमीला समर्थांनी आपला अवतार समाप्त केला त्यापूर्वी सभाजी महाराजानी राज्याभिषेकासाठी समर्थांना आग्रहाने बोलविले होते, पण 'आपणास येणे होत

नाही असे समर्थांनी कळविले आणि दिवाकर गोसावी याना धाडले.

संभाजी महाराजाच्या वधानतर महाराष्ट्रावर कठीण काळ आला इ स १७०० च्या एप्रिल महिन्यात औरगजेबाने परळीलाच तळ दिला तेव्हा परशुराम त्र्यबक देवाच्या मूर्ती घेऊन वासोटा किल्ल्यावर गेले. त्यापूर्वी समाधिमदिराच्या तळघरात जाण्याचा रस्ता त्यानी भित बाधून बंद करून टाकला.

औरगजेबाने सज्जनगड जिकून त्याला 'नवरसतारा' हे नाव




समर्थांनी पूजन केलेल्या राम, लक्ष्मण व सीता यांच्या मंदिरातील मूर्ती

दिले पण त्यानंतर औरगजेबाची पाठ फिरताच थोडयाच काळात मराठ्यानी सज्जनगड पुन्हा ताब्यात घेतला आणि मूर्ती परत आणून त्याची स्थापना केली इ. स. १७०८ नतर शाहू महाराज छत्रपती झाले, तेही समर्थांच्या समाधीच्या दर्शनाला येऊन गेले.

अशा प्रकारे साऱ्या छत्रपतींची श्रद्धा समर्थांवर आणि सज्जनगडा-वर होती

हल्ली सज्जनगडावरील मंदिरात नित्य पूजा, नैवेद्य, करुणाष्टके, आरती भजन, दासबोधाचे पारायण, इत्यादी कार्यक्रम होत असतात बाराही महिने सज्जनगड पाहायला आणि समर्थांच्या समाधीच्या दर्शनाला अनेक लोक येत असतात माघ शुद्ध प्रतिपदा



राममंदिराच्या तळघरातील श्रीसमर्थांची समाधी

ते नवमी हा दासनवमीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर होतो राम-नवमी आणि शिवरात्र या दिवशीही येथे मोठी यात्रा जमते

समर्थांच्या आणि शिवरायाच्या वास्तव्याने पावन झालेली सज्जनगडाची भूमी आजही आपणाला स्फूर्ती देत आहे.

□ □

# १५. देवगिरी यादवांचा अजिंक्य दुर्ग

' सहाशे मण सोने, एक हजार मण चांदी, एक हजार रेशमी कापडाचे गठ्ठे, सात मण मोती, दोन मण हिरेमाणके आणि एलिचपूर प्रांताचा दरसालचा वसूल ' इतकी खंडणी देऊन देवगिरीच्या रामदेवराय यादवाने दिल्लीच्या अलाउद्दीन खिलजीला परत पाठविले. ( इ स. १२९४) दक्षिण प्रांतात खूप संपत्ती आहे असा सुगावा लागल्यामुळे दिल्लीचा अलाउद्दीन खिलजी दक्षिणेत आला. त्याने देवगिरी किल्ल्यावर हल्ला चढविला आणि



दुरून दिसणारा देवगिरी किल्ला

तेथील राजा रामदेवराय यादव याचा पराभव करून मोठी दौलत वसूल केली.

देवगिरीचा किल्ला तसा अत्यंत बळकट आणि कोणत्याही

बलिष्ट शत्रूला अजिंक्य असाच होता. परंतु रामदेवरायाच्या गाफिलपणामुळे,अलाउद्दीनच्या चातुर्यामुळे आणि काही फितुराच्या कारवाईमुळे तो किल्ला अलाउद्दीनच्या स्वाधीन झाला

अलाउद्दीनाने किल्ल्याचा ताबा घेतला नाही. तो फक्त खडणीची सपत्ती घेऊन दिल्लीला परत गेला. देवगिरी किल्ला अत्यत मजबूत आहे, तो अजिंक्य आहे, हे त्याला कळाले होते , म्हणून त्या किल्ल्याचा ताबा घेण्याच्या भानगडीत तो पडला नाही

यानतर कुतुबुद्दीन मुबारकशहा याने इ स. १३१८ मध्ये देवगिरीवर स्वारी करून उरल्यासुरल्या यादवाच्या सत्तेचा शेवट केला त्याने देवगिरीचे कुतुबाबाद असे नाव ठेवून हा प्रदेश आपल्या राज्याला जोडला

यानतर लगेच अमीर खुसरो याने देवगिरीला भेट दिली. त्याने येथील सपन्न बाजारपेठातील उंची कापड, जडजवाहिर आणि फळफळावळ इत्यादींची नोद केली आहे याच जुन्या काळात दक्षिण भारतात येऊन गेलेल्या इब्न बतुता या इतिहासकाराने देवगिरी शहराचे वर्णन केले आहे. तो म्हणतो, ' किल्याच्या पायथ्याशी असलेले हे शहर अतिशय विस्तीर्ण असून रचना आणि महत्त्व याच्या बाबतीत ते दिल्ली राजधानीशी स्पर्धा करणारे आहे ' त्यामुळे मुहम्मद तुघलखाला या शहराचे आकर्षण वाटले असावे त्याने या राजधानीची नगररचना फारच सुदर केली होती, पण ती सर्व कामे अपूर्णच राहिली.

देवगिरी हा दक्षिण देशाचा पहारेकरीच आहे त्याची बैठक शिवलिंगासारखी असून तो शत्रूसाठी प्रलयकारी रुद्रच आहे. त्याच्या आश्रयास असलेल्या राजाला व राज्याला त्याने अजिंक्यपदच दिले होते परतु फितुरीने दगा दिला आणि या किल्ल्याचे हस्तान्तर

अनेक वेळा आले

देवगिरीचा किल्ला हा राष्ट्रकूट राजांनी इ स. ४०० च्या सुमारास डोंगरपहाड कोरून, कडेकपाऱ्या तासून अगदी मजबूत आणि रहस्यपूर्ण रीतीने खोदला असावा

म्हैसूर प्रातातील द्वारावतीपूर किंवा घोरसमुद्र येथील यादव-राजांनी इ स. ११८० मध्ये देवगिरी ही आपल्या मराठी मुलुखाची राजधानी केली. सोन्याचा गरुड असलेले त्यांचे निशाण त्यावर फडकत होते. या किल्ल्याच्या मजबुतीमुळे, त्याच्या आसमतातील सपन्न प्रदेशामुळे आणि राज्याच्या सुरक्षिततेसाठी योग्य त्या सोयीमुळे देवगिरी हे राजधानी करण्यासाठी अगदी योग्य ठिकाण होते. ते मराठी मुलुखाचे मध्यवर्ती शक्तिकेंद्र होते. देवगिरी ही राजधानी करण्यासाठी दिल्लीचा सुलतान मुहम्मद तुघलख याने तर खूपच खटपट केली आणि त्या व्यापात दिल्लीकरांची चांगलीच फजिती झाली

इ स १६०७ मध्ये देवगिरी–दौलताबाद ही निजामशाहाची राजधानी होती. या किल्ल्यावर मध्यतरी मराठ्याचा काही दिवस ताबा होता. देवगिरी म्हणजे दौलताबाद किल्ला खरोखर महाराष्ट्रातील सर्व किल्ल्याचा राजाच आहे. उत्तरेकडील आग्रा, दिल्ली, जयपूर वगैरे ठिकाणच्या भव्य आणि सुदर अशा किल्ल्यां-पेक्षा दौलताबाद–देवगिरीचा हा किल्ला अत्यत कणखर आणि रहस्यमय रचनेचा असल्यामुळे तो जिंकून घेणे म्हणजे काळ्या फत्तरावर डोके आपटून प्राण देणे होय, असा अनेक शत्रूना अनुभव आला.

या किल्ल्याची रचना आणि खोदकाम आहेच तसे गूढ आणि अजब ! डोंगर कोरून, कडे तासून, भुयारे खणून, खंदक तयार

करून, गिरीच्या गर्भात शंकराच्या पिंडीच्या आकाराच्या एका कणखर डोंगरावर हा किल्ला उभा आहे. तो दिसायला ओबड-धोबड असला तरी शत्रूचा नाश करण्याला समर्थ आहे. किल्ला कोरणाऱ्या कारागिराची आणि ती योजना तयार करणाऱ्या शिल्पज्ञांची धन्य आहे.


असा हा इतिहासप्रसिद्ध किल्ल्याचा राजा देवगिरी प्रत्यक्ष पाहण्यासाठी मराठवाड्यातील औरंगाबाद शहरापासून सुमारे सोळा किलोमीटर अंतरावर मोटारीने जाता येते. हे सर्व अंतर सपाटीचे आहे

वेरूळच्या वाटेवर देवगिरीच्या रम्य प्रदेशात किल्ल्याच्या पायथ्याशी आपण गेल्यावर रुंद अशा पडक्या तटबंदीला चार कमानीचे भव्य दरवाजे आहेत. त्यांना मक्का, रोझा वगैरे नावे आहेत. किल्ल्याभोवती डोंगरावर तीन मजबूत तटाच्या भिंती आहेत. त्यांना नावे आहेत– बारकोट, मारकोट, काळाकोट

सुमारे नऊ मीटर उंचीच्या भव्य प्रवेश कमानी दरवाजातून किल्ल्याच्या चढणीला सुरुवात केल्यावर जवळच चार मजली 'चांदमिनार' नावाचा मनोरा आपणास दिसतो अलाउद्दीन शहा या बहामनी सुलतानाने जेव्हा हा किल्ला जिंकला, तेव्हा त्याने आपल्या विजयाची आठवण म्हणून हा मनोरा बांधला. या मनोऱ्याच्या पायाजवळच्या ओट्याच्या लांबी रुंदी प्रत्येकी सुमारे बावीस मीटर आहे. पाच मीटर उंचीच्या ओट्यावर हा चांदमिनार उभा आहे यात चाळीस खोल्या असून इस्लामी कलाकौशल्याचा तो एक सुरेख नमुना आहे याची उंची सुमारे सत्तर मीटर ( म्हणजे सुमारे दोनशे फूट ) आहे

चांदमिनारजवळ जुम्मा मशीद नावाची एक इमारत आहे.

तिचे दगडी बांधकाम हिंदूंच्या मूर्ती कोरलेल्या चिऱ्याचे आहे. तेथेच सध्या भारतमाता मंदिर आहे. कालिका मंदिर आणि एक दीपमाळ आहे. सुंदरसा नगारखानाही आहे. जवळच भरपूर लांबी-



चांदमिनार, देवगिरी


रुंदीचा हत्ती हौद आणि तशीच मोठी विहीर सध्या पडिक अवस्थेत दिसते.

दुसऱ्या भक्कम आणि भरपूर रुंद अशा तटबंदीच्या वेशीतून आत गेल्यावर पूर्वीच्या धान्य कोठाराचे अवशेष आणि जुना दारूखाना आपणास दिसतो. यादवराजाच्या वैभवकाळात तेथे भरपूर साठा असायचा. सध्या तेथे कुजट वास येतो आणि पाला-

पाचोळयाचे ढीग दिसतात. अंधारात पाकोळया फडफडतात.

जवळच एका पडक्या बुरुजावर सात मीटर बावीस सेंटिमीटर लांबीची आणि कानाची एक जुनी तोफ आहे. या तोफेच्या कान्याजवळ मेंढयाच्या मुडक्याचे चित्र ओतले आहे. ही मेंढा तोफ 'किल्ला शिकन' नावाची असून ती खास औरंगजेबाने हुकूम देऊन ओतून घेतली होती.

आपण आता पुढे पुढे जात आहोत. ते पाहिलेत का किल्ल्याच्या भोवतालच्या डोंगराचे कडे तासून कसे गुळगुळीत केले आहेत हा कठीण काळा पाषाण इतका गुळगुळीत केला आहे की त्यावरून मुंगी-साप सुद्धा चढून वर येऊ शकत नाही. किती भव्य, किती उंच आणि किती भयंकर तटबंदी दिसते-आहे ही! कमाल आहे की नाही त्या कारागिरांची! या कडयाच्या तटाभोवती सुमारे पंधरा–सोळा मीटर रुंदीचा खंदकही आहे. त्यात नेहमी पाणी भरलेले असते. काय बिशाद आहे शत्रूची की तो या खंदकाला ओलांडून आणि या काळयाकभिन्न उंच गुळगुळीत तटावर चढून वर किल्ल्यात येईल! शक्यच नाही.




खंदक ओलांडण्यासाठी पूल, देवगिरी

आता या खंदकावरील छोटया अरुंद पुलावरून आपण आत

किल्ल्यात जाऊ. हे प्रवेशद्वार छोटेसे असून आत अंधार आहे. त्यातून वर गेल्यावर दोन दगडी हत्ती आणि एक बुरुजासारखी छोटी दीपमाळ आहे तिथे एक तोफही आहे. प्रवेशद्वाराजवळ शत्रू आला तर त्यावर या तोफेचा मारा करीत.

या तोफेच्या पाठीमागील बाजूस 'चिनी महाल' नावाची एक भव्य आणि सुंदर इमारत आहे. ही इमारत आठव्या दर-वाज्याच्या उजव्या बाजूस आहे. आता ती पडक्या स्थितीत असली तरी तिचे भग्नावशेष सुद्धा फारच प्रेक्षणीय आहेत. ही इमारत बांधताना गुलाब पाण्यात चुना मळून तो वापरला होता असे सांगतात आजही या इमार-तीच्या भिंतीवर पाणी शिंपडले तर त्याचा वास गुलाबाच्या फुलाप्रमाणे येतो. या महालात गोवळकोंड्याचा सुलतान औरंग-जेबाचा कैदी म्हणून तेरा वर्षे राहिला होता संभाजीराजाच्या वधानंतर काही राजकैदीही औरंगजेबाने याच महालात ठेवले होते



चिनीमहाल, देवगिरी

चौकातून पुढे अंधारी वाट आहे या अंधाऱ्या वाटेतून वर जावे लागते. तेथे मशाल पेटवून जावे लागते. भुयारी वाटेमधून अंधार आणि चकवे रस्ते आहेत. सहज जर रस्ता चुकला तर खाली खोल खोल खंदकात पडायचा धोका आहे. या फसव्या वाटांमुळे शत्रूचा येथे कंडेलोटही होत असे. बरोबर माहितगार

वाटाड्या घेतल्याशिवाय वर जाताच येत नाही अशा एक, दोन तीन अंधारी, भुयारी, भीतीदायक वाटा संपल्यावर शेवटच्या भुयारी वाटेच्या तोंडाशी एक प्रचंड लोखंडी तवा ठेवलेला आहे. शत्रू जर या भुयारी वाटेत शिरला तर हा तवा त्या वाटेच्या तोंडाशी ठेवून तो तापवीत आणि त्याच्या छिद्रावाटे धूर सोडून. शत्रूला आतल्या आत दम कोंडून मारीत असत. या तव्याची तशी विशिष्ट सोयच केली आहे लखूजी जाधवराव यानी या तव्याच्या भुयारी वाटेने वर जाऊन किल्ला सर केला होता, असा उल्लेख इतिहासात केलेला आहे

तेथून चढून वर गेल्यावर थंड पाण्याची टाकी आहेत. त्यातील कवडी टाके आणि मोती टाके फारच छान आहे. जवळच गणपती मंदिर, नवसाची तोफ आणि मशिदीचे काही अवशेष आहेत.

पूर्वेकडील कोपऱ्यात प्रसिद्ध जनार्दन स्वामींची ध्यानस्थ बसण्याची जागा आहे त्या ओट्याकडे जाताना लहानशा दरवाज्यातून वाकून जावे लागते. आत पाणी आहे त्यातून यावे लागते नंतर तो जनार्दनस्वामींचा ओटा आणि दत्ताचा ओटा आहे. तिथे गंधफुले वाहून लोक दर्शन घेतात जनार्दनस्वामी हे या किल्ल्याचे ठाणेदार होते संत एकनाथाचे ते गुरू होते. त्याना श्रीदत्त प्रसन्न होते असा वीर आणि भक्तश्रेष्ठ पुरुष त्या काळात महाराष्ट्रात दुसरा कोणीच नव्हता.

जनार्दनस्वामींच्या दत्तभक्तीमुळे या भागात त्या काळी शुक्रवारऐवजी गुरुवारची साप्ताहिक सुट्टी सरकारने केली होती. जनार्दनस्वामींबद्दलच्या काही चमत्काराच्या गोष्टी या ठिकाणी ऐकायला मिळतात. एकदा जनार्दनस्वामी ध्यानस्थ बसले होते. तेवढ्यात शत्रूचा हल्ला या किल्ल्यावर झाला. किल्लेदार

ध्यानस्थ ! आता काय करणार ? तेवढ्यात त्याचे शिष्य एकनाथ तयार झाले त्यानी जनार्दनस्वामींचे कपडे चढविले दत्तकृपेने त्याचे रगरूप अगदी जनार्दनस्वामीसारखे झाले. त्यानी हातात शस्त्र घेतले आणि सैन्याला हुकूम केला. त्यानी त्या शत्रूचा हल्ला पिटाळून लावला नाथाची परीक्षा याच किल्ल्यावर झाली. जनार्दनस्वामींच्या त्या पवित्र ठिकाणाचे दर्शन घेऊन आपण पुन वर चढून जातो तेथे बारादरी या नावाचे अतिशय सुदर ठिकाण दिसते इ स १६३६ साली शहाजहान बादशाहा दौलताबाद किल्ल्यावर आला होता. त्याने श्रमपरिहारासाठी ही सुदर बारादरी किल्ल्यावर बांधली

या बारादरीमधून सभोवतालचा भाग अतिशय सुदर दिसतो. तिथल्या हवेमुळे प्रसन्नता वाटते श्रमपरिहार होतो. तेथून डोकावून पाहिले तर मात्र खाली खोल खोल दऱ्यांची भीती वाटते

बारादरी भागातून पुन काही पायऱ्या वर चढून गेल्यावर किल्ल्याचा शिखर भाग आहे त्याला बाळकोट म्हणतात त्या कोटावर धूळधाण नावाची तोफ ठेवलेली आहे ती अवजड, प्रचड आहे ती भयकर तोफ उडवताना बत्तीवाल्याच्या कानठळ्या बसू नयेत म्हणून जवळच पाण्याने भरलेला एक मोठा हौद आहे त्यात तो बुडी मारून बसत असे. या तोफेवर 'श्रीदुर्गा' अशी अक्षरे ओतलेली आहेत.

या उच्च उंच भागावरून आसमत अति-नयनरम्य दिसतो; पण डोळे गरगर फिरतात सभोवतालच्या भागातील जुनी राजधानी दौलताबादचे भग्नावशेष पाहून प्रत्येक माणूस चक्रावून जातो आणि तेथून परत आल्या रस्त्याने उतरत उतरत परत किल्ल्याच्या पायथ्याशी येतो

देवगिरीच्या पायथ्याशी मुख्य द्वारासमोर जनार्दनस्वामींनी आपल्या त्या गुरूची-चांगबोधल्याची-समाधी बांधली. औरंगाबादहून वेरूळकडे जाताना एका बाजूला देवगिरी तर दुसऱ्या बाजूला



जनार्दनस्वामींचे गुरू चांदबोधले यांची समाधी देवगिरीच्या

संत चांदबोधल्यांची समाधी आहे. हे समाधी मंदिर हिंदू पद्धतीच्या बांधणीचे नसून मुस्लिम पीराच्या दर्ग्यासारखे आहे.

एका वेगळ्या प्रकारच्या रचनेमुळे देवगिरी किल्ला प्रत्येकाने समक्ष जाऊन पहावा, असाच तो प्रेक्षणीय आहे.

□ □

ग्रंथालय ठाणे
693
23223
प्रवास

REFBK-0023223